वर्ष–४६

विशेष दिवाळी अंक २०२६

BMAA बृहन्महाराष्ट्र मंडळ

स्वराज्यदीप



सातासमुद्रापार स्वराज्याची कीर्ती

महाराष्ट्र ते अमेरिका-कॅनडा: एक नवा इतिहास

वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

अंक – ११,१२

BMM Executive Committee 2026-28

बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी २०२६-२८



PRESIDENT

Rahul Deshmukh

Portfolio: Marathi Shala

City: Pittsburgh, PA

अध्यक्ष

EXECUTIVE COMMITTEE



Narendra Kalyankar
Vice President

Portfolio:
Karaoke, Gurupith

City: Raleigh, NC



Amit Korde
Secretary

Portfolio:
NA Programming

City: Richmond, VA



Milind Kulkarni
Treasurer

Portfolio:
Podcast, Antarang, Financial Compliance & Audit

City: San Diego, CA



Harshad Annigeri
EC Member

Portfolio:
Uttar Rang, Paurohitya, Tatvadnyan, Jyotish, Lakshvedhi, MANA

City: Detroit, MI



Jyotsna Kurkute
EC Member

Portfolio:
India Programming, Arogya Sampada, Sports

City: Connecticut, CT



Rushikesh Ranade
EC Member

Portfolio:
Yuwa, Social Media, Website and Adhar

City: Toronto, ON, Canada



Sandip Pawar
EC Member

Portfolio:
B-Connect, Samajrang, Tech Admin

City: Calgary, AB, Canada



Ulka Nagarkar
EC Member

Portfolio:
Reshimgathi, Arth Manthan, Marathi Boli Bhasha, Sanskrit Learning, Vaarasa

City: Chicago, IL

BOARD OF TRUSTEES

विश्वस्त मंडळ



Sandeep Dixit
Trustee

City:
Mayfield Village, Ohio



Sunil Suryawanshi
Trustee

City:
Ridgefield, CT



Manjusha Naik
Trustee

City:
West Palm Beach, FL

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यालय संपर्क :-

BMM Treasurer - Milind Kulkarni

16077 Caminito Tomas, San Diego, CA 92128

Ph: 408.600.4486

Email: milind.kulkarni@bmmonline.org

जाहिरातींचे दर: पूर्ण पान: $200 अर्धे पान: $125

पाव पान: $100 अष्मांश पान: $75

Send your payments to: zelle@bmmonline.org

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या महिन्याच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

वृत्ताचा या पुढचा अंक जानेवारी २०२७ मध्ये प्रसिद्ध होईल. त्यासाठी साहित्य पाठवायची अंतिम तारीख: डिसेंबर २०, २०२६

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२६ - २०२८) मताधिकार असलेले सदस्य

अध्यक्ष: राहुल देशमुख , पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया

उपाध्यक्ष: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना

सचिव: अमित कोर्डे, रिचमंड, व्हर्जिनया

कोषाध्यक्ष: मिलिंद कुलकर्णी , सॅनडिएगो, कॅलिफोर्निया

सदस्य: उल्का नगरकर, शिकागो

ज्योत्स्ना कुरकुटे, कनेटिकट

संदीप पवार, कॅलगरी, कॅनडा

ऋषिकेश रानडे, टोरांटो, कॅनडा

हर्षद अण्णेगिरी, डेट्रोइट

नियुक्त सदस्य

माजी अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस

विश्वस्त समिती

अध्यक्ष : सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट

सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा

सदस्य: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र वृत्त संपादक समिती
BMM Vrutta Editorial Team



Rahul Deshmukh
President



Dr. Gautam Pangu
Vrutta Editor



Rushikesh Ranade
Vrutta EC Lead



Vidula Kolhatkar
Vrutta Team



Aparna Kolekar
Vrutta Team



Komal Kulkarni
Vrutta Team



Sheetal Rangnekar
Vrutta Team

अध्यक्षीय मनोगत

दिवाळी विशेषांक • नोव्हेंबर – डिसेंबर २०२६

प्रिय BMM परिवार,
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! प्रकाशाचा हा मंगल सण आपल्या सर्वांच्या जीवनात आनंद, आरोग्य, समृद्धी आणि नवी उमेद घेऊन येवो. ऑक्टोबर महिना BMM परिवारासाठी विविध उपक्रमांनी समृद्ध ठरला. आपल्या 'वृत्त' चा ऑक्टोबर अंक नव्या फ्लिप बुक स्वरूपात वाचकांसमोर आला. मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या शुभेच्छा आजी-आजोबांपर्यंत पोहोचवणारी पत्रलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. अशा उपक्रमांतून भाषा शिकण्याबरोबरच आपल्या नात्यांतील जिव्हाळा आणि संस्कृतीची ओळखही पुढच्या पिढीपर्यंत पोहोचते.

या महिन्यात कोलंबस मंडळाला भेट देण्याची आणि तेथील मराठी शाळेच्या २५ व्या वर्धापन दिन सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. BMM च्या वतीने गिरिजा आणि विनायक पर्वते यांचा त्यांनी मराठी शाळेसाठी दिलेल्या २५ वर्षांच्या सेवेसाठी सन्मान करण्याचा आनंद लाभला. त्यांच्या दीर्घकालीन योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन.

ज्ञान आणि विचारांच्या देवाणघेवाणीसाठी **BConnect** ची नियोजन बैठक, अर्थमंथनचे कृत्रिम बुद्धिमत्ते वरील सत्र आणि भटकंतीचा मध्य युरोप प्रवास वृत्तांत असे उपक्रम झाले. मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांसाठी आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धा, नवरात्र विशेष योगसत्र आणि आरोग्य विषयक मार्गदर्शन यांसारख्या कार्यक्रमांनी शिकणे, खेळणे आणि निरोगी जीवनशैली यांना प्रोत्साहन दिले. शाळा आणि शिक्षणाशी संबंधित उपक्रमांत **Baalbharati Exam** २०२७ ची नोंदणीही सुरू झाली.

समाजसेवा हा BMM च्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. **"Give Back to Karmabhoomi"** या उपक्रमातून स्थानिक पोलीस कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे आणि गरजू संस्थांना त्यांच्या आवश्यकतेनुसार मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. **Westmoreland Food Bank** सोबतच्या मार्गदर्शन सत्रातून परिणामकारक मदत कशी करावी याबद्दल शिकण्याची संधी मिळाली. BMM आधारच्या स्वयंसेवक उपक्रमातून उत्तर अमेरिकेतील गरजूंना वेळ, सहवास आणि मदतीचा आधार देण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतीचे आवाहन ही करण्यात आले.

मराठी चित्रपटांचा आनंद कुटुंबांपर्यंत आणि मंडळांपर्यंत पोहोचवण्यासाठी BMM तर्फे तीन नवीन चित्रपटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्याच बरोबर BMM Convention 2028 च्या तयारीची घोषणा करण्यात आली. सर्वांना सहभागी करून घेणारे, किफायतशीर आणि मराठी भाषा-संस्कृतीला केंद्रस्थानी ठेवणारे अधिवेशन घडवण्याचा आपला संकल्प आहे. उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांना, स्वयंसेवकांना आणि गुणवंतांना अधिक संधी देण्यावरही आपला भर राहील.

BMM चा अधिकृत कम्युनिटी **WhatsApp** ग्रुप , **Baalbharati** नोंदणी, **Kaalnirnay 2027** कॅलेंडरसाठी मागणी सकंलित करणे आणि भारतातील तसेच उत्तर अमेरिकेतील संस्थांशी संपर्क वाढवण्याचे प्रयत्न या सगळ्यांतून संवाद आणि सहकार्याचे नवे मार्ग खुलेहोत आहेत. Toastmasters Youth Leadership Program आणि BMM Sports Talk Show यांसारख्या आगामी उपक्रमांमधून युवकांना आणि क्रीडाप्रेमींना नवी व्यासपीठे मिळतील, अशी आशा आहे.

या सर्व उपक्रमांच्या मागे असलेल्या स्वयंसेवकांचे, मंडळांचे, शिक्षकांचे, वक्त्यांचे, आयोजकांचे आणि सहभागी कुटुंबांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तुमचा वेळ, कल्पना आणि सहकार्य यांमुळेच **BMM** परिवार अधिक जोडला जातो आणि आपले कार्य अधिक अर्थपूर्ण बनते.

सेवेचा दीप उजळू दे, मने जोडू दे आज
मराठी भाषा-संस्कृतीचा, दरवळू दे साज
हात मिळोनी चालताना, वाढो आपुला मेळ
एकीच्या या प्रकाशात, सुखी होवो सगळे

आपल्या घरी आनंदाचे दीप उजळोत आणि आपल्या समुदायात एकोपा, आपुलकी व मराठीपणाचा प्रकाश सदैव राहो.

आपणा सर्वांना दीपावलीच्या आणि नववर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला,
** राहुल देशमुख **
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM)
उत्तर अमेरिका 2026-2028

संपादकीय

नवे रूप, नवा अनुभव, तोच मराठी आत्मा!

सस्नेह नमस्कार!

दिवाळीच्या मंगल प्रकाशात, जगभरात पसरलेल्या मराठी माणसांना साहित्याच्या आणि संस्कृतीच्या धाग्यांनी जोडणारा बृहन्महाराष्ट्रमंडळ वृत्ताचा २०२६ चा दिवाळी अंक आपल्या भेटीला आणताना मनापासून आनंद होत आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नव्या अध्यक्षांचे आणि कार्यकारी समितीचे वृत्तातर्फे हार्दिक स्वागत!

त्यांच्या नेतृत्वाखाली मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीची ही वाटचाल नव्या जोमाने होत राहील याची खात्री आहे.
दिवाळी अंक म्हणजे केवळ कथा, कविता आणि लेख यांचे संकलन नसते; तो मराठी मनाच्या विचारांचा, कल्पनांचा आणि आठवणींचा वार्षिक सोहळा असतो. यावेळीही आमच्याकडे उत्तर अमेरिकेबरोबरच जगातल्या वेगवेगळ्या ठिकाणांहून साहित्यकृती आल्या आहेत.
त्यांमधून वाचकांना विषयांचे, विचारांचे, अनुभवांचे आणि भावनांचे वैविध्य अनुभवायला मिळेल अशी आम्हांला खात्री आहे. शिवाय बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या उपक्रमांच्या अनुषंगानेही माहिती, उत्तर अमेरिकेतल्या युवा पिढीचे साहित्य, शब्दकोडे, व्यंगचित्रं असा सर्व खजिनाच आपल्याला या अंकात वाचायला मिळेल.
याशिवाय यंदा अंकालाआम्ही नवा साज, नवी मांडणी आणि नवा वाचनानुभव देण्याचा प्रयत्न केला आहे. डिजिटल रूपाची सहज उपलब्धता जपताना अंकाला आम्ही मुद्रित स्वरूपातही वाचकांच्या हातात पोहोचावा असा आमचा प्रयास आहे. दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेत अकातल साहित्य निवांतपणे वाचण्याचा,एकदा वाचून झालेला अंक वेळ मिळेल तसा पुन्हा पुन्हा चाळण्याचा आणि संग्रही ठेवायचा आनंद वाचकांना या अंकातून मिळावा अशी इच्छा आहे.

वृत्ताचा हा आणि सगळेच अंक तुमचे आहेत आणि ते अधिकाधिक वाचकाभिमुख करायचा आमचा प्रयत्न असतो. म्हणनूच तुमचं मत आमच्यासाठी महत्वाचं आहे. तुमच्या प्रतिक्रिया, सूचना आणि अपेक्षा जरूर कळवत रहा. तुमच्या सहभागातूनच आमचे पुढील अंक अधिक समृद्ध आणि आशयघन होत राहतील.

दिवाळीच्या प्रकाशाची ही ज्योत अशीच घराघरांत, मनामनांत आणि पिढ्यानपिढ्यात तेवत राहो!
सर्व लेखकांना, वाचकांना आणि आमच्या प्रायोजकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

कळावे,
लोभ असावा,
वृत्त संपादक समिती

बालभारती



छत्रपतींची गोष्ट

सेवेची ठाई तत्पर – हिरोजी इंदलकर

प्रसंग मोठा बाका होता. महाराज आग्र्यात औरंगजेबाच्या कैदेत अडकले होते. स्वराज्याचा कारभार जिजाऊ माँसाहेब राजगडावरून सांभाळत होत्या. स्वराज्याचे सरनौबत नेताजी पालकर यांनाही मुघलांनी अटक केली होती. आदिलशहा आणि मिर्झा राजे स्वराज्यावर डोळा ठेवून होते.

अशा कठीण काळातही रायगड आणि सिंधूदुर्ग या किल्ल्यांचे बांधकाम सुरूच होते. या किल्ल्यांच्या बांधकामाची जबाबदारी महाराजांच्या एका निष्ठावान मावळ्यावर होती –हिरोजी इंदलकर. संकटांची पर्वा न करता ते किल्ल्यांचे काम नेटाने पुढे नेत होते.

पण स्वराज्यातील २३ किल्ले आणि चार लाख होनांचा मुलुख तहानुसार मुघलांना द्यावा लागला होता. स्वराज्यात जेमतेम एक लाख होनांचा मुलुख उरला होता. त्यामुळे येणारा महसूल अत्यंत तुटपुंजा होता. एक दिवस बांधकामासाठीचे पैसे संपले. आता किल्ल्याचे काम थांबणार, असे दिसू लागले.

महाराज अजूनही मुघलांच्या कैदेत होते. त्यांच्या सुटकेची आशा धूसर झाली होती. ते सुखरूप परत येतील की नाही, याचीही खात्री नव्हती.

अशा संकटाच्या काळात हिरोजींनी धीर सोडला नाही. बांधकामाचा दर्जा कुठेही कमी न करता त्यांनी काम सुरू ठेवले. त्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीचे दागिने विकले.

काळ पुढे सरकला. महाराज औरंगजेबाच्या कैदेतून आपल्या बुद्धिचातुर्याने सुखरूप सुटले. राजगडावर जाऊन त्यांनी जिजाऊ माँसाहेबांची भेट घेतली. त्यानंतर ते रायगडावर आले. किल्ल्याचे बांधकाम पाहून ते प्रसन्न झाले. हिरोजींनी पत्नीचे दागिने विकून बांधकाम सुरू ठेवल्याचे त्यांच्या कानावर आले.

महाराजांनी हिरोजींना बोलावून विचारले, “तुझ्या कामगिरीवर आणि समर्पणावर मी अतिशय खूश आहे. तुला काय हवे ते माग.”

हिरोजी म्हणाले, “महाराज, तुम्ही रोज रायगडावरील जगदीश्वराच्या मंदिरात दर्शनाला जाता. तुमचा पाय माझ्या मस्तकावर पडावा, अशी माझी इच्छा आहे. मंदिरात माझ्या नावाची एक पायरी बसवण्याची परवानगी द्या.”

आयुष्यात अनेक किल्ले जिंकून आणि बांधून ही स्वतःचे नाव कुठल्याही किल्ल्यावर कोरू न देणाऱ्या शिवाजी महाराजांनी हिरोजींना ही परवानगी दिली. आजही त्या मावळ्याची पायरी जगदीश्वराच्या मंदिराच्या दारात आहे. त्यावर लिहिले आहे

“सेवेची ठाई तत्पर – हिरोजी इंदलकर.”

हीच खरी स्वराज्यसेवा आणि समर्पण! हिरोजीं सारख्या मावळ्यांच्या सेवेतूनच स्वराज्य उभे राहिले. अशाच प्रेरणेने आपल्या BMM च्या सर्व स्वयंसेवकांचे कार्य बहरत राहो.

सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

राहुल देशमुख
पिट्सबर्ग,पेनसिल्व्हेनिया
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM)
उत्तर अमेरिका २०२६-२०२८



Bank of Maharashtra

VALID TILL 30th Sep'26



ATTRACTIVE FCNR DEPOSIT RATES

Secure & grow your foreign currency savings with Bank of Maharashtra

US DOLLARS

6.15%	6.25%	6.60%
3-4 Years	4-5 Years	5 Years Only

SAFE & SECURE
Deposits are held with a trusted Indian Bank

ATTRACTIVE RETURNS
Earn higher interest rates on your foreign currency

FLEXIBLE TENOR
Choose tenor that suits your financial goals

FCY [USD] LOAN
Avail loan against your FCNR(B) deposit

WHY CHOOSE FCNR DEPOSITS?

- Deposit in Foreign Currency, Earn in Foreign Currency
- Repatriable principal and interest
- Hedge against currency fluctuations
- Ideal for NRIs, PIOs & OCIs
- Loan facility available against FCNR(B) deposits

LEGEND LOAN FACILITY ON FCNR(B) DEPOSIT (USD) VIA IFSC BANKING UNIT

Under this facility, your FCNR(B) deposit is lien-marked in favour of our IFSC Banking Unit, GIFT City. Based on the lien, we will extend a foreign currency loan to you against a prescribed margin. You continue to earn interest on your FCNR(B) deposit while paying interest and applicable fees on the loan, thereby enhancing your overall return on your capital.

ILLUSTRATION: SPECIAL LOAN AGAINST FCNR(B) DEPOSITS

SCHEME FEATURES

- Flexible Tenure Options (Min 3 years and max 5 years)
- Tax Exempt & Fully Repatriable Funds
- Loan Multiplier (Up to 9x Initial Deposit)

SCHEME ILLUSTRATION



Customer Deposit **USD 100,000** (9x loan)

Maximum Loan **USD 900,000**

Total FCNR Deposit **USD 1,000,000**

LOAN INTEREST RATE (IBU)

TENOR	ROI (p.a.)
3 Years	5.85%
Above 3 Years up to 5 Years	6.00%

KEY BENEFITS

- Enhanced returns through FCNR(B) deposit leveraging strategy
- Attractive effective yields compared to standalone deposits
- USD-denominated investment, mitigating INR exchange rate risk
- Fixed Loan Rate ensures zero interest rate risk

SPECIAL FCNR(B) DEPOSIT RATES & OVERALL EFFECTIVE YIELD

PARTICULARS	3 YEARS (6.15%)	4 YEARS (6.25%)	5 YEARS (6.60%)
Customer Contribution	USD 100,000	USD 100,000	USD 100,000
Loan Amount	USD 900,000	USD 900,000	USD 900,000
Total FCNR Deposit	USD 1,000,000	USD 1,000,000	USD 1,000,000
FCNR Deposit Rate (p.a.)	6.15%	6.25%	6.60%
Loan Interest Rate (p.a.)	5.85%	6.00%	6.00%
ANNUALISED RETURN	9.77%	9.76%	14.81%

The 5-year tenure offers the highest effective yield, making it the most rewarding option for customers seeking enhanced USD returns.

LOCK-IN PERIOD 1 YEAR

Note: Interest rates are per annum (p.a.) and compounded half-yearly. Illustration above is indicative. Actual results may vary based on exact tenor, compounding frequency and other applicable charges as per scheme terms.

SYMBIOSIS
INTERNATIONAL (DEEMED UNIVERSITY)

॥वसुधैव कुटुम्बकम्॥

Pune | Nashik | Bengaluru | NOIDA | Hyderabad | Nagpur | Dubai (UAE)

A legacy of **50+**years



"Promoting International Understanding through Quality Education"

Represented by



Dr. Rajiv Yeravdekar
MD, Ph.D, FRCPS (Glasgow) FRCOG (London)
Provost,
Faculty of Medical & Health Sciences
SIU

- Law
- Design
- Management
- Medical & Health Sciences
- Computer Studies
- Media & Communication
- Humanities & Social Sciences
- Education
- Engineering

Please visit: www.siu.edu.in

scan to know more

QS World University Rankings 2027: 655th Globally, 19th in India

Times Higher Education Sustainability Impact Ratings 2026: 301 – 400 in the world, 6th in India

Ministry of Education: Category - I University

NAAC A++

NIRF National Institutional Ranking Framework: 24th in the University Category, 7th in Law Category, 11th in Management Category, 46th In Engineering Category

संकल्पना : गौतम पंगू रेखाटन: शीतल रांगणेकर





Where Your Journey Begins.

KOTIBHASKAR
Infrastructures & Developers Pvt. Ltd.
आम्ही मनात घर करतो

Discover your perfect home.
We believe in creating living spaces that are more than just a place to stay they are the foundation for your future.



JOURNEY SO FAR

43+ Years of legacy

120+ Completed projects

32+ Lakhs sq. ft. developed area

2200+ Happy customers

020-25654110 | +91 9134 616161, +91 9134 717171
sales.pune@kotibhaskar.com | www.kotibhaskar.com

EPIC QUEST TRAVEL

अद्भुत स्थळे. अविस्मरणीय क्षण.

आइसलँड

अग्नी आणि बर्फांची भूमी

9 दिवस
20 ऑगस्ट ते 28 ऑगस्ट 2027

आमचा विशेष ग्रुप टूर – महाराष्ट्रीयांसाठी आदर्श

धबधबे • हिमनद्या • फियोर्ड्स • ज्वालामुखी प्रदेश
निर्जन गावे • उष्ण पाण्याचे झरे • लाव्हा क्षेत्रे • रम्य समुद्रकिनारे
आणि बरंच काही...



प्रवासातील वैशिष्ट्ये


अद्भुत धबधबे


भव्य हिमनद्या


गायझर्स आणि उष्ण पाण्यांचे झरे


रम्य समुद्रकिनारे


सुंदर फियोर्ड्स


ज्वालामुखी प्रदेश आणि लाव्हा क्षेत्रे


निर्जन गावे

यात्रेमध्ये समाविष्ट आहे

- व्यावसायिक चालकासह खाजगी लक्झरी मोटरकोच
- निवडक आणि उत्तम दर्जाची हॉटेल्स (नाश्ता समाविष्ट)
- अमेरिकेतून येणारे आमचे टूर डायरेक्टर – संपूर्ण प्रवासात मराठीतून मार्गदर्शन
- सामान्य पर्यटनस्थळांमध्ये नसलेली, आमच्या वैयक्तिक अनुभवावर आधारित विशेष ठिकाणांची भेट
- सर्व नियोजित पर्यटन उपक्रम व प्रवेश शुल्क
- दररोज संध्याकाळी प्रवास समूहासोबत खास सामाजिक वेळ
- प्रत्येक जोडप्यासाठी डिजिटल फोटो आणि व्हिडिओ पॅकेज (ड्रोन फोटोग्राफीसह)
- सर्व वयोगटांसाठी सुयोग्य नियोजन – प्रत्येकासाठी काही ना काही
- दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणासाठी **शाकाहारी पर्याय** आगाऊ बुकिंग आणि विशेष आहारांची सोय (दुपारचे आणि रात्रीचे जेवण समाविष्ट नाही)

प्रवासाच्या तारखा

शुक्रवार, 20 ऑगस्ट 2027 ते
शनिवार, 28 ऑगस्ट 2027

प्रति व्यक्ती
$2,899.00
(ड्रेहेरी राहणीवर आधारित किंमत)

यामध्ये समाविष्ट नाही

- आपल्या शहरातून आइसलँडला जाण्याचे विमानप्रवास (आवश्यक असल्यास बुकिंग मदत उपलब्ध)
- कोणतेही ऐच्छिक / अतिरिक्त पर्यटन उपक्रम
- दररोजचे दुपारचे आणि रात्रीचे जेवण
- चालकसाठी टिप

आजच आपली जागा निश्चित करा!
मर्यादित जागा उपलब्ध!

412-680-0650
Call / WhatsApp

shailesh@epicquesttravel.com

www.epicquesttravel.com

अनुक्रमणिका

विज्ञान संस्कृती आणि समाज

पावलांनी शोधलेली विकासाची वाट (मोहना प्रभुदेसाई जोगळेकर) ११
FASD एक छोटीशी ओळख (आरोही अत्रे) १३
कुत्र्याच्या छत्र्या अवकाशात (आशिष महाबळ) १५
विठ्ठल – महाराष्ट्राच्या उपास्य दैवताची ओळख (अमित भावे) १८
संख्यांमध्ये दडलेली जादू शोधणारे मराठी गणितज्ञ दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर (संग्राम देशपांडे) २०
आपल्या समाजाचे दुःखद वास्तव: जेव्हा शिक्षण अंधश्रद्धेवर मात करण्यात अपयशी ठरते (प्राजक्ता बडगुजर) २३

शब्दरंग

अचानक (सुधा दीक्षित) २६
अज्ञात आरोपी (श्रीपाद टेंबे) २८
आठवणींच्या अंगणात अजूनही पेटलेली दिवाळी (वीरेंद्र सुधा प्रदिपराव सोनावणे) २९
खुर्चीची गोष्ट (उमेश वानखेडे) ३१
झेंडूची फुलं (डॉ. प्रियदर्शन मनोहर) ३३
नऊवारीचा उबदार पदर (अपर्णा भूषण काळे) ३५
पोळीचा लाडू (प्राजक्ता करंबेळकर) ३६
POW – प्रिझनर ऑफ वॉर (डॉ. शिरीष कीर्तने) ३८
एक नितांत सुंदर गाणे (शिल्पा कुलकर्णी) ४०
कर्तव्य पथाच्या वारीत आपण सारेच वारकरी (सुहास बेलापूरकर) ४२
रॉंग नंबर (प्रा.विकास येसादे) ४३

रंग मराठी उत्तर अमेरिकन माणसाचे

९/११ इतिहास आणि वर्तमानाच्या दोन पिढ्या (गौतम पंगू) ४५
जोडी विजोड (सुधीर धर्माधिकारी) ४६
भाषा शिकताना: माणूस समजताना (प्रसाद पुरोहित) ४७
मिशिगॅडरी (डॉ. ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर) ४८
स्वस्तिक की हाकेनक्रॉईझ? (शिरीन म्हाडेश्वर) ५०
चित्रांची दुनिया ५२
ह्यूस्टन महाराष्ट्र मंडळ ५४
डेलावेर व्हॅली मराठी मित्र मंडळ (DVMMM) ५७
कॅलगरी मराठी असोसिएशन(CMA) ५९
शब्दकोडे ६१
डिजिटल पुरवणी ६३



पावलांनी शोधलेली विकासाची वाट

यावर्षीच्या भारत भेटीत माझ्या २१ वर्षांच्या लेकीने; गाव, समाज आणि पर्यावरणासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या आशुतोष जोशी या युवकाचं काम पाहावं असं मला वाटत होतं. सुदैवाने सगळी गणितं जमली आणि आम्ही गुहागरजवळच्या निसर्गाच्या कुशीत दडलेल्या आशुतोष जोशीच्या मूळ गावी म्हणजे नरवणला पोचलो. दोन पदयात्रांनंतर तो गावात स्थिरावला आहे. गावाचा विकास, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणाचा तोल सांभाळण्यासाठी तो काम करतो आहे. इंग्लंडमध्ये शिक्षण आणि नोकरी केल्यानंतर आशुतोष भारतात परतला, तेव्हा त्याने गावाकडे केवळ भूतकाळ म्हणून पाहिलं नाही. गावातल्या माणसांकडे, त्यांच्या कौशल्यांकडे आणि उपलब्ध साधनांकडे वेगळ्या नजरेने पाहण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच 'धरा' उभं राहिलं. गावातल्या पारंपरिक कौशल्यांकडे नव्या नजरेने पाहण्याचा प्रयत्न त्याने केला. गावातल्या एका तरुणाची सुतारकामाची आवड लक्षात घेऊन छंदालाच रोजगाराचं साधन करण्याची कल्पना मांडली आणि वास्तवात आणली. लाकूड, नारळाची करवंटी अशा गोष्टींचा उपयोग करून विविध वस्तू तयार करणं, त्यांना बाजारपेठ मिळवून देणं म्हणजे गावातल्या कौशल्याला थेट अर्थव्यवस्थेशी जोडणं. इतकंच करून आशुतोष थांबला नाही. निसर्गाशी ओळख करून देणाऱ्या सहली तो आयोजित करतो त्यामुळे गावातल्याच लोकांना, तरुणांना, स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारे रोजगाराचं साधन मिळालं आहे. फणसाच्या तळलेल्या गऱ्यांना दरवर्षी प्रचंड मागणी असते. त्यातून अनेक स्त्रियांना हंगामी काम मिळतं आहे.

नरवणला आम्ही नदीचं काम पाहिलं. नदीत गाळ साचून राहिल्यामुळे वर्षानुवर्षं पावसाळ्यात गावात पाणी भरतं. नाम संस्थेच्या मदतीने आशुतोषने नदी स्वच्छ करण्याचं काम केलं. नरवणची जिल्हा परिषद शाळा आम्ही पाहिली. मुलांना केवळ अभ्यासक्रमापुरतं शिक्षण न देता आपल्या गावाशी आणि निसर्गाशी जोडण्याचा प्रयत्न इथे केला जातो. कचरा व्यवस्थापन, शेती, स्थानिक पर्यावरण, गावातली साधनसंपत्ती, पारंपरिक कौशल्यं ह्यांची ओळख करून दिली जाते, अभ्यासक्रमातील पुस्तकांच्या पलीकडचं जग विद्यार्थ्यांना प्रयत्नपूर्वक दाखवलं जातं. शिक्षिका पद्मजा दिवाडकर या इथे स्वखुषीने विनावेतन काम करतात.

माझी लेक हे सगळं पाहत होती. मला अनुवादाच्या दिवसांत भेटलेली माणसं आठवत होती. ज्याच्या लेखांचे मी अनुवाद करत होते, ज्याच्या पदयात्रेतल्या माणसांच्या कथा वाचत होते, त्याचं काम त्या दिवशी आमच्यासमोर प्रत्यक्ष सुरू होतं. आम्ही तिथे असताना नदीचा गाळ नाम संस्थेच्या मदतीने उपसून तिला वाहती करण्याच्या कामात आशुतोष मग्न होता.

इंग्लंडला शिक्षण घेऊनही तिथेच न राहता तो का परत आला आणि चालण्याची उर्मी का निर्माण झाली असावी? लंडनला असताना महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करत आहेत हे त्याच्या वाचनात आलं. तेही का? तर एक युरोपीयन छायाचित्रकार त्यावर माहितीपट करत होता आणि आशुतोष त्यावर संशोधन करत होता म्हणून. या गोऱ्या माणसाला एवढ्या आत विदर्भ, मराठवाड्यात जाऊन काम करावंसं वाटलं पण आपण इथलेच असून आपल्याला या वास्तवाची माहिती नाही हे बघून आशुतोष अस्वस्थ झाला. कोकणात त्याने हे कधीच ऐकलं नव्हतं. कदाचित म्हणूनच त्याला भारतात परतायची ओढ लागली आणि त्यानंतर चिपळूणमधल्या पुराच्या अनुभवाने त्याच्या विचारांना एक दिशा मिळाली. आशुतोषची या विषयाला धरूनच पहिली पदयात्रा सुरु झाली. अरबी समुद्र ते बंगालचा उपसागर.

१८०० किलोमीटरची पदयात्रा! या प्रवासात त्याने अनेक गावं ओलांडली. चालताना, आरामशीर गाडीच्या काचांमधून न दिसणारं एक भयंकर वास्तव त्याला अस्वस्थ करत होतं. ती होती माणसांच्या डोळ्यातली 'हतबलता'. आभाळाकडे शून्य नजरेने डोळे लावून बसलेला शेतकरी, पाण्यासाठी मैलोनमैल उन्हात चालणाऱ्या बाया, आणि तळाला गेलेल्या, कोरड्याठाक विहिरीत आशेने डोकावणारी पोरं! त्यांच्याकडे पाहून निसर्गाच्या या रौद्र रूपापुढे माणूस किती क्षुद्र आणि लाचार आहे याची जाणीवच त्याला हतबल करुन टाकायची. त्यांच्या कोरड्या पडलेल्या ओठांवर आणि भेगाळलेल्या टाचांवर मूक आक्रोश होता. 'पाऊस पडेल का?' या प्रश्नाचं उत्तर ना त्यांच्याकडे होतं, ना आशुतोषकडे. जा जरा पूर्वेकडे हे पुस्तक म्हणजे अशा अनुभवांची नोंद आणि पुढे आशुतोषकडून घडणाऱ्या कामाची नांदी.

१८०० किलोमीटरच्या त्याच्या पदयात्रेबद्दल मी माझ्या 'अभिव्यक्ती' युट्युब वाहिनीसाठी त्याची मुलाखत घेतली. त्यापूर्वीच 'जा जरा पूर्वेकडे' हा अरबी समुद्र ते बंगालचा उपसागर पदयात्रेवरचा अनुवाद तयार होता पण त्याने तो प्रसिद्ध केला नव्हता. मूळ इंग्रजी पुस्तक Journey to the East हे मात्र तेव्हा उपलब्ध होतं. मुलाखतीनंतर, त्यावेळी चालू असलेल्या त्याच्या रेवस ते रेड्डी कोकण पदयात्रेवरील इंग्रजी लेखांचे अनुवाद करशील का? असं त्याने मला विचारलं. त्याला फेसबुकसाठी हे लेख मराठीत करून पाहिजे होते. मराठी लेखांना भरघोस प्रतिसाद मिळाला.

एकीकडे मी रोज त्याच्या चालू असलेल्या रेवस ते रेड्डी कोकण पदयात्रेबरोबर मनाने प्रवास करत होते; दुसरीकडे त्याच्या १८०० किलोमीटर पदयात्रेत गुंतून गेले होते. वर्तमानातला त्याचा प्रवास अनुवादत असतानाच भूतकाळातला प्रवासही माझ्यासमोर उलगडत होता. गावं, माणसं, त्यांच्या अडचणी, निसर्गाशी त्यांचं नातं, बदलत जाणारं ग्रामीण जीवन या सगळ्यातून आशुतोष स्वतःलाच विचारत असलेले प्रश्न आणि त्याच्यासमोर आलेले प्रश्न विचारांना चालना देणारे आहेत.

"तुम्हाला विकास नको आहे का?" कोकण किनारपट्टीवर पायी चालताना आशुतोषला हा प्रश्न अनेकदा ऐकायला मिळाला. गावात रोजगार नाही, मुलांना काम नाही, आजारपण आलं की शहर गाठावं लागतं, शेतीतून पुरेसं उत्पन्न नाही. मग एखादा कारखाना आला, नोकऱ्या मिळाल्या तर त्याला विरोध का करायचा? ह्या प्रश्नांभोवती फिरणारी भव्या नावाच्या वृद्धाची गोष्ट. आयुष्यभराची गरिबी, घराची आणि शेतीची झालेली वाताहत, कुटुंबातलं आजारपण आणि गावात वैद्यकीय सुविधांचा अभाव, या सगळ्याचा सामना त्याने केला होता. त्यामुळे उद्योग आला, रोजगार मिळाला, रस्ते झाले तर तो विकासच, असं त्याला वाटत होतं. आशुतोषने त्याचं म्हणणं मन लावून ऐकलं. त्याला विकास नको आहे असं नव्हतं. उलट गावात रोजगार निर्माण व्हावा, मुलांना शिक्षण आणि संधी मिळाव्यात, लोकांचं जीवनमान सुधारावं, हेच त्यालाही हवं होतं. पण त्याचा प्रश्न वेगळा होता. विकास झाला, पण त्याची किंमत कोण मोजतं आहे? कोकणात चालताना त्याला या प्रश्नाची अनेक उत्तरं मिळत गेली. कुठे शेतजमीन विकली गेली होती, कुठे जुन्या घरांच्या जागी मोठमोठे बंगले आणि रिसॉर्ट्स उभे राहिले होते, मोकळ्या जागा, खारफुटी, क्रीडांगणं आणि मासे वाळवण्याच्या जागा नष्ट झाल्या होत्या. कालपर्यंत स्वतःच्या जमिनीत शेती करणारा माणूस आज त्याच भागात उभ्या

राहिलेल्या प्रकल्पात मजूर म्हणून काम करत होता. एका ठिकाणी आशुतोषला भेटलेलं वृद्ध दाम्पत्य आपल्यालाही अस्वस्थ करून जातं. रस्त्याच्या कडेला मिळणारं लाकूड गोळा करून त्यातून दिवसाला सत्तर-ऐंशी रुपये कमावणं, एवढाच त्यांच्या जगण्याचा आधार होता. मोठ्या प्रकल्पांच्या, विकासाच्या आणि गुंतवणुकीच्या चर्चेला त्यांच्या आयुष्यात जागाच नव्हती. हातावर पोट असणारी ही माणसं. ह्या प्रवासात आशुतोषला परिस्थितीला कसंबसं तोंड देणाऱ्या व्यक्ती भेटल्या तसंच आयुष्याला वेगळं वळण देऊ पाहणाऱ्याही. शहरात भरपूर राबायचं, कसेबसे दिवस रेटायचे आणि तुलनेने हातात उरायचं काहीच नाही. गावात परतल्यावरही तसा पैसा कमी मिळाला तरी आपल्या माणसांमध्ये राहण्याचं, समाधानाने जगण्याचं सुख अनुभवता येतं हे समजलेला तरुण. म्हणजे प्रगतीची व्याख्या कुठे चुकली? पैसा आला म्हणजे जीवनमान सुधारलं, असं आपण सहज मानतो. पण मानसिक समाधान, मोकळा वेळ, कुटुंब, समाज आणि निसर्गाशी असलेलं नातं ह्याचा आपण विचारच करत नाही. पण गावात राहायचं असेल तर रोजगाराचं काय? हा मुद्दा आहेच. गावात शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील हेही खरंच.

एका गावात शेतकऱ्याशी बोलताना आशुतोषसमोर पुन्हा तोच प्रश्न आला. रासायनिक कारखाना आला तर नोकऱ्या मिळतील, म्हणून तो त्याबाजूने होता. आशुतोषने त्याला विरोध केला नाही. "रोजगार हवा आहेच," हे त्याने मान्य केलं. पण त्या शेतकऱ्यालाच विचारलं, 'रासायनिक घटकांचा शरीरावर विपरीत परिणाम करणारा, आजार निर्माण करणारा कारखाना हाच रोजगाराचा एकमेव मार्ग आहे का? आपल्या परिसरात उपलब्ध असलेल्या साधनांवर, उत्पादनांवर आणि कौशल्यांवर आधारित रोजगार निर्माण करण्याचा विचार करता येणार नाही का?' मोठा कारखाना म्हणजेच रोजगार, ही कल्पना आपण इतकी घट्ट धरून बसलो आहोत की छोटे उद्योगही मोठा बदल घडवू शकतात, हे विसरतो.
विकास म्हणजे जुनं नाकारून नव्याचा अवलंब नाही. जुन्या नव्याचा संगम साधणं म्हणजेही विकासच आहे. आशुतोषला भेटलेले जाधव आजोबा याचं उत्तम उदाहरण. खाडी, खारफुटी, झाडं, पाण्याचे बांध, जुन्या शेतीच्या पद्धती, कोणत्या जमिनीत काय पिकतं, पाणी कुठे अडवायचं, निसर्गातला बदल कसा ओळखायचा, याबद्दल ते इतक्या सहजपणे सांगतात की अनुभवाचं विद्यापीठ आपल्यासमोर उभं ठाकतं. पर्यटनाचंही तसंच. कोकणाकडे समुद्र आहे, सह्याद्री आहे, खाड्या आहेत, धबधबे आहेत, किल्ले, लेणी, मंदिरे, स्थानिक खाद्यसंस्कृती आणि गावचं साधं जीवन आहे. मग पर्यटनासाठी गावाचा चेहरामोहरा बदलून मोठमोठे रिसॉर्ट्स उभे करण्यापेक्षा गावाचं अस्सलपणच पर्यटनाची ताकद करता येणार नाही का? पण पर्यटनाच्या नावाखाली निसर्गच नष्ट झाला तर? हेच तर सध्या आपण सगळीकडे पाहतो. फोटो आणि चित्रीकरणासाठी वाढणारी गर्दी, reels करण्याचा हव्यास, प्लॅस्टिक, आवाज, ड्रोन, रस्त्यांचा विस्तार यामुळे अधिवासावर परिणाम होतो हे कोणी लक्षातच घेत नाही. कोकणाला विकास नको असं नाही; पण विकासासाठी जमीन, जंगल, नदी, समुद्र आणि गावच गमवावं लागणार असेल तर थोडं थांबून स्वत:लाच विचारायला हवं. विकास हवा, पण कसा? मोठ्या प्रकल्पातून हजार नोकऱ्या मिळणं हा विकासाचा एक मार्ग आहे. पण हजार गावांमध्ये छोट्या छोट्या संधी निर्माण होऊन हजारो कुटुंबांना आपल्या गावातच सन्मानाने जगता आलं, तर तो विकास कमी महत्त्वाचा आहे का?
विकास करताना माणूस आणि निसर्ग दोघांनाही बरोबरीने चालता येईल का, याचं प्रत्ययकारी दर्शन आशुतोषच्या कामातून होतं. ३००० किलोमीटर पायी चालत आशुतोषने भारत पाहिला, ग्रामीण जीवन, आणि तिथल्या लोकांचा रोजचा संघर्ष पाहिला. आणि त्यातूनच आता कायमचं नरवणला परतून नरवण गावात रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध करुन देण्याचा ध्यास त्याने घेतलेला आहे. एका गावाचं पाऊल आशुतोषमुळे अर्थपूर्ण विकासाच्या वाटेवर पडलं आहे.

मोहना प्रभुदेसाई जोगळेकर
शार्लट, नॉर्थ कॅरोलिना







FASD

एक छोटीशी ओळख

मंडळी, 'FASD' हा शब्द आधी कधी ऐकलाय का? FASD म्हणजे 'फीटल अल्कोहोल स्पेक्ट्रम डिस ऑर्डर'. खूप मोठा मेडिकल शब्द आहे. म्हणूनच यापुढे मी त्याला फक्त 'FASD' असं म्हणणार आहे. 'FASD' म्हणजे काय? तर एखादी बाई प्रेग्नन्ट असताना तिनं मद्यपान केलं, तर बाळाच्या मेंदूमध्ये काही बदल होतात, आणि त्या बदलांचा, शारीरिक आणि मानसिक समूह, म्हणजेच 'FASD'.

या विषयावर लिहायला बसल्यावर, मला खूप अवघडल्यासारखं वाटलं. तुम्हाला कळेल का, मी काय सांगतेय ते.. हा किचकट विषय मी नीट समजावू शकेन का? आणि या विषयासंबंधात एक जागरूकता निर्माण करण्याचा माझा उद्देश आहे, तो सफल होईल का?

कारण, FASD ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. यावर बरंच संशोधन झालंय, पण उपचार नाहीत. माझ्या कामाच्या आणि आयुष्याच्या अनुभवातून मी FASD असलेल्या अनेक मुलांना जवळून पाहिलंय. त्यांच्या लक्षणांचं वेळेवर निदान झालं असतं, तर ते आज आहेत त्यापेक्षा कितीतरी अधिक यशस्वी झाले असते. FASD हे नाव अनेकांनी ऐकलेलंही नसेल. पण खरं सांगते, FASD मुळे अनेक कुटुंबं उद्धस्त झालेली आहेत. FASD असलेल्या मुलांचं पालनपोषण करताना योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक पालक वेगळे झाले आहेत. तसंच, या मधून जाणाऱ्या मुलाचं बरंच नुकसानही झालं आहे. याला अनेक कारणं आहेत.
पण मूळ समस्या ही आहे, की या विषयाबद्दल जागरूकता अजिबात नाही आणि त्याच प्रकारे निदान करण्याच्या सोयी सुद्धा उपलब्ध नाहीत.
म्हणूनच, मला मिळालेल्या संधीचा उपयोग करून, मी तुमच्यासमोर हा विषय मांडायचा प्रयत्न करणार आहे.

व्यवसायाने मी pediatric occupational therapist आहे. लहान मुलांचे 'occupation' म्हणायचं तर ते दिवसभर जे काही करतात, जसं की खेळणं, शिकणं आणि स्वतःची काळजी घेणं हे त्यात येतं. जर एखाद्या मुलाला त्याचं 'occupation'
व्यवस्थित करायला काही अडचण येत असेल, तर Occupational therapists त्यांना मदत करतात. यासाठी आम्ही त्यांची शारीरिक क्षमता, त्यांच्या इंद्रियांच्या मदतीने माहिती समजून घेण्याची पद्धत म्हणजेच Sensory Processing, त्यांचे आजूबाजूचे वातावरण या गोष्टींची चाचणी करतो. यामुळे मुलांना त्यांच्या गरजा आणि कौशल्यांनुसार मदत मिळते.

मी जेव्हा ऑक्युपेशनल थेरपीमध्ये काम करायला सुरुवात केली, तेव्हा मला FASD म्हणजे काय, हे अजिबात माहीत नव्हतं. लहान मुलांच्या विकासावर मी अनेक वर्षं काम केलं आणि आता मला कळतंय, की मी अशा काही मुलांबरोबर काम केलं, ज्यांना FASD असण्याची शक्यता आहे. त्या मुलांचं 'वेगळं' वाटणारं वर्तन मला तेव्हा समजलं नाही.

FASD या दुर्बलतेमध्ये चेहऱ्यावरील काही ठळक वैशिष्ट्ये आढळतात. त्यामध्ये विशिष्ट लहान डोळे, नाक आणि तोंडामधली जागा सपाट असणं किंवा वरचा ओठ खालच्या ओठाच्या तुलनेत बारीक असणं अशी काही लक्षणं आहेत. डॉक्टर्स या चेहऱ्यावर दिसणाऱ्या वैशिष्ट्यांच्या आधारे हे निदान करू शकतात. पण काही वेळा फक्त एवढ्याच लक्षणांवर आधारित निष्कर्ष काढता येत नाही. अशा वेळेला, एक वैद्यकीय पथक एकत्र येतं ज्यात एक neurosychologist, स्पीच थेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट काही चाचण्या करतात, आणि त्यावर आधारित हे निदान होऊ शकतं. संशोधनाने हे कळलं आहे की, pregnancy दरम्यान मद्यपानाचं कोणतंही सुरक्षित प्रमाण नाही.

शारीरिक वैशिठ्यांच्या व्यतिरिक्त, वर्तन, आचरण आणि वागणुकीतही काही समस्या आणि आव्हानं या मुलांमध्ये दिसून येतात. रोजच्या आयुष्यात येणाऱ्या वेगळेपणामुळेच या मुलांकडे लक्ष जातं.

उदाहरणार्थ: टेबलाकडे धावणारं आणि त्यावर न भिता उडी मारणारं लहान मूल, गाडी चालू असताना खिडकी उघडून अर्धांग बाहेर काढून हेलिकॉप्टरला हात दाखवणारं मूल. लहान-सहान आवाजाने पटकन त्रस्त होऊन कानावर हात ठेवणारं मूल. उगाच काही कारण नसताना सारखं चिडणारं किंवा मारणारं मूल....
या सगळ्यांच्या वागणुकी पलीकडे जाऊन त्यांची चिकित्सा करण्याची नितांत गरज आहे.

जर अशा मुलांना आपण नावं ठेवली किवा bad parenting ला जबाबदार धरलं, तर त्यांची आणखीनच हानी होईल.
मेंदूचा एखादा भाग जेव्हा हवा तसा विकसित होत नाही, तेव्हा जरी त्याचं वय जास्त असलं, तरी काही गोष्टी त्यांना उमजतच नाहीत. आणि हे मेंदूच्या कुठल्या भागावर परिणाम झाला आहे त्यावर अवलंबून असतं.
मी असे बरेच लोक पाहिले आहेत, ज्यांच्यात FASD मुळे मानसिक आजार आहे, पण तो कुणालाच समजलेला नाही. त्यामुळे त्यांना वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये ठेवलं गेलं. त्यांना समाजात कधीच चांगलं जगता आलं नाही, किंवा त्यांच्या आयुष्यावर त्यांचा ताबा राहिला नाही. आणि हो, मी असेही बरेच लोक पाहिले आहेत, ज्यांच्यात FASD आहे, आणि ते पालक, संशोधक आणि शिक्षक म्हणून चांगलं काम करत आहेत. त्यांच्या वाट्याला योग्य मदत, सेवा आणि परिवर्तन आलं, आणि त्याचे चांगले परिणाम आपल्याला दिसताहेत.

मला असं वाटतं, की आता आपण डोळे उघडून पाहावं आणि FASDला एक अपंगत्व म्हणून स्वीकारायला हवं. इतर अपंगत्वांप्रमाणेच, FASD असलेल्या लोकांनाही मदत आणि योग्य त्या सुधारणा मिळाल्या, तर ते समाजात मानाचं आणि स्वावलंबी जीवन जगू शकतात.

आपण, पालक, आणि या विषयाचा अभ्यास करणारे असे सगळ्यांनी, या संधीचा फायदा घ्यायला हवा. आपण सरकार, सामाजिक संस्था, शिक्षण देणाऱ्या संस्था आणि नोकरी देणाऱ्या लोकांना या लोकांच्या अपंगत्वाबद्दल नीट माहिती देऊन समजावून सांगायला हवं. त्यांना समाजात सामावून घ्यायला हवं आणि त्यांना मदत करायला हवी. कारण ही लोकं प्रेमळ, कलावंत, मिळूनमिसळून राहणारी, कल्पक, निष्ठावान आणि खूप हुशार आहेत.
आपण, पालक म्हणून, एकमेकांना साथ देण्याची संधी गमावू शकत नाही. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, pregnant असलेल्या बायकांना योग्य माहिती आणि आधार देण्याची खूप गरज आहे. अनेक मेडिकल
professionals आहेत ज्यांना FASD विषयी फारशी माहिती नाही. त्या लोकांपर्यंत ही माहिती पोचणं अत्यंत गरजेचं आहे. बराच वेळ आधीच वाया गेला आहे. ठोस काहीतरी करण्याची वेळ आली आहे.

–आरोही अत्रे
हॅमिल्टन, ऑंटारिओ

साऱ्या जणांचे काय ?

दिवस सरले, सरतातच! महिने अन वर्षे ही सरली त्यात काय नविन ?
पण स्मृतीतल्या त्या न सरलेल्या क्षणांचे काय ?

दसरा झाला, दिवाळी गेली, केले उत्सव मौजे ने सारे प्रसंगी करतच गेलो, नाही का ?
पण पंचांगा बाहेर घडलेल्या त्या सणांचे काय ?

श्रम पडले, निभावले! डोंगरही उचलले कधी, सर्वच करतात वेळ आली की!
पण मागे सांडलेल्या त्या मोत्यांच्या कणांचे काय ?

डावपेच जिरले, लढाया संपल्या, कधी युद्धे ही जिंकली, जय पराजय चालूच असतो!!
पण मनातल्या मनात घोंघावणाऱ्या त्या रणांचे काय ?

रोज स्नान तर होतेच, रंगरंगोटीही घडते कधी, चार चौघांसारखा योग्य दिसण्याचा यत्न, अजून काय?
पण तरीही काही ओरखडे उरलेच, शिवाय हळव्या त्या व्रणांचे काय ?

ओल्या पापणीला सोबत म्हणून अस्फुट हास्यही मिरवले होय! अगदी तुमच्यासारखंच
नाहीतर या मखमली गाळात बुडालेल्या आपुल्या साऱ्या जणांचे काय ?

– सचिन श्री.
सिनसिनाटी, ओहायो

इरादा (वृत्त भुजंगप्रयात)

तिचे ध्यान नाही प्रयत्नांत नाना
किती हे इशारे तिला आकळेना
खरे प्रेम माझे प्रियेला कळेना
तिचा बंध माझ्या दिलाशी जुळेना

जरा ध्यान दे गं पुरे हा बहाणा
घरंदाज मी आणि माझा घराणा
पुरे लागले वेड, होतो शहाणा
नको अंत पाहू तुझा मी दिवाणा

तुला साथ देईन सृष्टी अखेरी
तुझे प्रेम ठेवीन माझ्या तिजोरी
तु देशील का गं मनाला उभारी
तुझ्यावीण माझी कहाणी अधूरी

पुरी होत नाही मनाची पिपासा
तुझा एक होकार येता जरासा
मिळे आज माझ्या मनाला दिलासा
जगाया मिळाला इरादा पुरेसा

– धनाग्रज
अबूधाबी, संयुक्त अरब अमिराती

कुत्र्याच्या छत्र्या अवकाशात

आपल्या पायाखालच्या मातीत एक अख्खं साम्राज्य आहे, ज्याची आपल्याला जेमतेम ओळख आहे

पावसाळ्यातली पहिली छत्री

जूनचा पहिला चांगला पाऊस पडला की दुसऱ्या दिवशी सकाळी अंगणाच्या कोपऱ्यात, कुंडीच्या कडेला, नाहीतर जुन्या लाकडी खोडावर छोट्या पांढऱ्या छत्र्या उगवलेल्या दिसतात. आपण त्यांच्याकडे बघतो आणि म्हणतो, 'कुत्र्याच्या छत्र्या.' नाव उच्चारतानाच त्यात थोडी तुच्छता असते. कुत्रे जिथेतिथे पाय वर करून आपला कार्यक्रम उरकतात तिथे या उगवतात असं वाटल्यामुळे कदाचित हे नाव पडले असणार. खाण्यासारखी असेल तर ती अळंबी आणि बाकीच्या सगळ्या कुत्र्याच्या छत्र्या. दोन दिवसांनी ती छत्री गळून पडते आणि आपण तिला विसरून जातो.

पण एक क्षण थांबून विचारा. ती छत्री कोणत्या प्रजातीची होती? विषारी होती की खाण्याजोगी? जमिनीखाली तिचं जाळं किती पसरलेलं होतं? आपल्यापैकी बहुतेकांना याचं उत्तर देता येणार नाही आणि खरी गंमत पुढे आहे. प्रयोगशाळेतल्या शास्त्रज्ञालाही ते केवळ नुसतं बघून सांगता येणार नाही.

'आहे मनोहर तरी' मधली एक आठवण

सुनीता देशपांडे यांच्या 'आहे मनोहर तरी' मध्ये अळंब्या विषयीची एक आठवण येते. धामापूरच्या आजी मृग नक्षत्राच्या आधी पडवीची मातीची भिंत सारवून ठेवत आणि चार-पाच दिवसांत ती भिंत पांढऱ्याशुभ्र अळंब्यांनी फुलून जाई, जणू फुलांची साडी नेसल्यासारखी. बीजाणू म्हणजे काय हे माहीत नसतानाही अळंब्यांचं पीक घरच्या घरी काढता येतं, हे त्या आजीला ठाऊक होतं.

त्याच आठवणीत दुसरी एक समजूतही आहे. जंगलात उगवणाऱ्या छत्र्या विषारी असतात, कारण त्यांच्यावर सापाची थुंकी पडलेली असते, असं त्यांना सांगितलं गेलं होतं.

ही समजूत ऐकून हसू येतं. पण ती कुठून आली असेल? साप आणि या छत्र्या दोन्ही पावसाळ्यात, झाडाझुडपांच्या सावलीत सापडतात. दोन गोष्टी एकत्र दिसल्या की त्यांचा संबंध जोडणं माणसाला सहज जमतं. आणि काही छत्र्या खरोखर विषारी असतात, हे अनुभवाने माहीत होतं. मग विषाचं कारण काय? ते कोणालाच माहीत नव्हतं. म्हणून सापाची लाळ.

अशा समजुतींना अंधश्रद्धा म्हणून बाजूला सारणं सोपं आहे. पण त्यांचं खरं मूळ अज्ञानात नसतं. ते माहितीच्या अभावात असतं. जिथे विश्वसनीय माहिती नसते, तिथे कथा जागा भरतात. आणि बुरशीच्या बाबतीत माहितीचा अभाव आजही कल्पनातीत आहे.

विषारी छत्र्यांविषयी बुरशी शास्त्रज्ञांमध्ये एक जुनी कोटी आहे. there are two types of mycologists: those who are bold and those who are old. जर एखादा बुरशीतज्ज्ञ धाडसी बनून ही छत्री खाऊन पाहू, ती छत्री खाऊन पाहू असे करत असेल तर तो म्हातारा होतच नाही.
या विनोदातून एक गंभीर गोष्ट अधोरेखित होते: रानातली छत्री खाण्याजोगी आहे की जिवावर बेतणारी, हे ठरवणं आजही तज्ज्ञांसाठी सोपं नाही.

आकडे काय सांगतात

प्राणी आणि वनस्पती यांच्या बरोबरीचं तिसरं मोठं सजीव साम्राज्य म्हणजे बुरशीचं (fungi/कवक). मशरूम म्हणजे बुरशीची फळं. या फळांमधून बीजाणू पसरतात. पण बुरशीचं साम्राज्य वनस्पतींपेक्षा प्राण्यांच्या अधिक जवळचं आहे. बुरशी स्वत:चं अन्न बनवत तर नाहीतच, पण अन्न मिळवण्याची तिची पद्धतही निराळीच. विकरे(enzymes) बाहेर टाकून ती आधी अन्नाचं विघटन करते आणि मग त्यातून पोषक द्रव्यं शोषून घेते.

आजपर्यंत शास्त्रज्ञांनी बुरशीच्या सुमारे दीड लाख प्रजातींची रीतसर नोंद केली आहे. पृथ्वीवर एकूण किती असतील, याचा अंदाज वीस लाखांपासून साठ लाखांपर्यंत जातो. म्हणजे नाव आणि वर्णन असलेल्या प्रजाती जेमतेम पाच टक्के. उरलेल्या पंचाण्णव टक्क्यांची आपल्याला ओळखही नाही. ही परिस्थिती खगोलशास्त्रातल्या डार्क मॅटर आणि डार्क एनर्जीच्या अज्ञात स्वरूपाची आठवण करून देते.

सखोल माहिती अजूनच कमी आहे. एखाद्या प्रजातीचा पूर्ण जनुकसंच (genome), म्हणजे तिच्या जीवनाचा संपूर्ण लिखित आराखडा, ज्ञात असेल तरच तिच्या क्षमतांचा नीट अभ्यास करता येतो. अमेरिकेच्या ऊर्जा खात्याचं मायकोकॉझम हे जगातलं सर्वात मोठं बुरशी-जनुक भांडार आहे. सध्या तिथे ४,००० पेक्षाही कमी जनुकसंच आहेत, साधारण ३,२०० प्रजातींचे.

सर्वसंचारी बुरशी

बुरशी म्हटलं की डोळ्यांसमोर शिळ्या भाज्यांवरचा काळपट-हिरवा (किवा पांढरा) थर येतो. पण बुरशी सर्वसंचारी आहे. पावसाळ्यात भिंतीला येणारा कुबट वास बुरशींमुळेच असतो. इडली-डोशाचं पीठ रात्रभर आंबतं, त्या प्रक्रियेत जिवाणूंबरोबर यीस्ट नावाच्या एकपेशीय बुरशीचाही हातभार असतो. पाव फुगवणारी आणि बिअर आंबवणारी हीच यीस्ट. शेतातला करपा, कैरीवरचा काळा डाग, साठवलेल्या धान्यावर येणारी बुरशी, हे सगळे शेतकऱ्याच्या ओळखीचे शत्रू आहेत. जंगलात पडलेलं लाकूड कुजवून मातीत मिसळणारी यंत्रणा बुरशीचीच आहे. ती नसती तर पृथ्वी मृत झाडांच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली असती.

अनेक बुरशी एकपेशीय आणि डोळ्यांना अदृश्य असल्या तरी त्यांचा थर बनल्यावर, किंवा छत्र्यांसारखी फळं आल्यावर त्या आपल्याला दिसू शकतात.

कुत्रेच शोधतात सर्वात महाग बुरशी

नावातली ती तुच्छता एका कारणाने गमतीदार ठरते. जगातली सर्वात महाग बुरशी कुत्रेच शोधून काढतात. इटलीच्या अल्बा भागात जमिनीखाली वाढणारं पांढरं ट्रफल ही ती बुरशी. ती झाडाच्या मुळांशी सहजीवन करत जमिनीखाली राहते, त्यामुळे वरून काहीही दिसत नाही. तिचा वास ओळखायला शिकवलेले कुत्रे घेऊन लोक रानात फिरतात. या वर्षी पांढऱ्या ट्रफलचा भाव किलोला
पाच ते साडे आठ हजार युरोच्या घरात आहे, म्हणजे साधारण पाच ते आठ लाख रुपये. लिलावात एखाद्या मोठ्या तुकड्याची किंमत त्याहून
वर जाते.

एवढी मागणी असूनही पांढरं ट्रफल शेतात पिकवणं आजवर जमलेलं नाही. काळ्या ट्रफलची लागवड जमली, आणि तिचा भाव पांढऱ्याच्या पंचमांश झाला. जमिनीखाली झाडाच्या मुळांशी पांढऱ्या ट्रफलचं नातं नेमकं कसं जुळतं, हे पुरेसं माहीत नाही. माहिती नसण्याची किंमत इथे रुपयांमध्ये मोजता येते.

अवकाशयानात बुरशी?

अंतराळयानं जिथे जोडली जातात त्या खोल्या जगातल्या सर्वात स्वच्छ जागा असतात. हवा सतत फिल्टर केलेली, माणसं नखशिखांत झाकलेली, प्रत्येक पृष्ठभाग निर्जंतुक केलेला. तरीही या खोल्यांमधून आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून वारंवार बुरशी सापडते. पेनिसिलियम, ॲस्परजिलस, रोडोटोरुला, अल्टरनेरिया अशी नावं यादीत पुन्हा पुन्हा येतात. यातलं पेनिसिलियम हे नाव ओळखीचं वाटेल. याच वंशातल्या बुरशीपासून पेनिसिलिन हे जगातलं पहिलं
प्रतिजैविक (antibiotic) मिळालं. लाखो माणसांचे प्राण वाचवणारी ही बुरशी आज अंतराळयानाच्या भिंतीवरची एक चिवट पाहुणी आहे.
ही बुरशी थेट जीवघेणी नसते. पण तिच्याकडे काही कौशल्यं असतात. ती धातू आणि प्लास्टिकवर वाढते आणि हळूहळू त्यांचा पोत बिघडवते. ती बीजाणूंच्या रूपात कोरड्या, उपाशी अवस्थेत वर्षानुवर्षे तग धरून राहते. ती एकत्र येऊन जैवपटल तयार करते, ज्यामुळे त्यावर जंतुनाशकांचा परिणाम कमी होऊ शकतो. आणि बंद हवेच्या अवकाशयानात, जिथे अंतराळवीराची प्रतिकारशक्ती प्रवासामुळे आधीच थोडी ढासळलेली असते, तिथे या गोष्टींना वेगळं महत्त्व येतं.
म्हणून प्रश्न साधा आहे. मंगळाच्या दिशेने निघणाऱ्या यानात कोणत्या बुरशी बसून जाऊ शकतात, आणि त्यांच्यापैकी कोणत्या खरोखर त्रासदायक ठरतील?

आमचा प्रयत्न

हा प्रश्न घेऊन आम्ही एका अभ्यासाला सुरुवात केली. तो नुकताच Astrobiology या शोधपत्रिकेत स्वीकारला गेला आहे. अडचण अशी होती
की प्रत्येक बुरशी प्रयोग शाळेत वाढवून, तिच्यावर उष्णता, किरणोत्सर्ग आणि औषधं आजमावून बघणं हे हजारो प्रजातींसाठी शक्यच नाही. त्याला दशकं लागतील. म्हणून आम्ही वेगळा पवित्रा घेतला. बुरशीच्या ज्या खास क्षमता आपल्याला महत्त्वाच्या वाटतात, त्यामागे कोणती प्रथिनं (proteins) काम करतात, हे काही प्रजातींत आधीच शोधून काढलेलं आहे. उष्णता सहन करणं, किरणोत्सर्गानंतर तुटलेली जनुकं दुरुस्त करणं, बीजाणू बनवणं, जैवपटल तयार करणं, औषधांना दाद न देणं आणि माणसाच्या शरीरात तग धरणं-अशा सहा गुणधर्मांशी संबंधित काम करणारी पंचवीस प्रथिनं आम्ही निवडली. मग १,५५३ बुरशी-प्रजातींच्या संपूर्ण प्रथिन संचात ही पंचवीस प्रथिनं 'कुठे आणि किती सारखी' दिसतात, याचा शोध घेतला.

ही तुलना भाषेच्या उदाहरणाने समजायला सोपी आहे. मराठीतला 'हात', हिंदीतला 'हाथ' आणि संस्कृतमधला 'हस्त' हे शब्द एकाच मुळापासून आलेले आहेत. रूपं बदलली, पण नातं ओळखता येतं. प्रथिनांचंही तसंच असतं. दोन प्रजाती कोट्यवधी वर्षांपूर्वी वेगळ्या झाल्या असल्या, तरी एकाच पूर्वजापासून आलेल्या प्रथिनाचा साचा ओळखू येतो. तो साचा किती टक्के जुळतो, हे मोजता येतं.

प्रत्येक प्रजातीला आम्ही या सहा गुणधर्मांवर गुण दिले. यातून एक क्रमवारी तयार झाली, ज्यात एकाच वेळी अनेक कठीण परिस्थितींत तग धरण्याची क्षमता असलेल्या प्रजाती वर येतात. अंतराळ स्थानकात आणि यान-जोडणीच्या खोल्यांमध्ये प्रत्यक्ष सापडलेल्या प्रजाती यादीच्या वरच्या टोकाला निघाल्या, हा दिलासा देणारा निकाल होता.

एक महत्त्वाचा प्रश्न

पण आमच्या पद्धतीला मर्यादाही आहेत. आम्ही जी पंचवीस प्रथिनं निवडली, ती बुरशीच्या ज्या शाखांचा अभ्यास सर्वात जास्त झाला आहे त्यांतून आली. कारण दुसरा पर्यायच नव्हता. आता निकाल पहा. जैवपटल आणि रोगकारकता या दोन गुणधर्मांची प्रथिनं बुरशीच्या जुन्या, दूरच्या शाखां मध्ये जवळजवळ सापडलीच नाहीत. याचा सोपा अर्थ असा काढता येईल की त्या शाखांमधल्या बुरशींना ही कौशल्यं नाहीत. पण तो अर्थ चुकीचा असण्याची शक्यता मोठी आहे. आमचं मोजमापाचं साधन ओळखीच्या आकाराचीच प्रथिनं ओळखू शकतं. वेगळ्या वाटेने उत्क्रांत झालेलं तेच काम करणारं प्रथिन त्या साधनाला दिसणार नाही.

आकडेही गोष्ट अजून स्पष्ट करतात. जुळणीची अट कडक ठेवली, तर १,५५३ पैकी ६६ टक्के प्रजातींत काही ना काही धोकादायक गुणधर्म दिसतो. तीच अट सौम्य केली, तर हाच आकडा ९९.७ टक्क्यांवर जातो. म्हणजे'किती टक्के बुरशी धोकादायक आहेत' या प्रश्नाचं उत्तर मोठ्या प्रमाणात आपण ठरवलेल्या अटीवर अवलंबून आहे. ग्लोमेरोमायकोटा नावाच्या, वनस्पतींच्या मुळांशी सहजीवन करणाऱ्या गटातल्या २४ प्रजातींपैकी फक्त सहा प्रजातींत ठळक जुळणी मिळाली, आणि ती एकाच प्रथिनाशी. न सापडणं हा नसण्याचा पुरावा नाही.

माहिती अपुरी असताना आमचं साधनही 'इथे काहीच नाही' असं उत्तर देऊ शकतं. फरक एवढाच की ही पोकळी आम्ही मोजू शकतो,दाखवू शकतो, आणि ती भरण्याची दिशा सांगू शकतो.

शेवटी

आतापर्यंतचा सगळा भर धोक्यावर होता. पण बुरशी उपयोगीही आहे. चंद्रावर आणि मंगळावर बुरशीच्या जाळ्यापासून स्वतःची डागडुजी करणाऱ्या भिंती बांधण्याची कल्पना नासामध्ये तपासली जात आहे. ती गोष्ट पुन्हा कधीतरी.
पुढच्या पावसाळ्यात अंगणातली छत्री दिसली, तर तिला पायाने उडवू नका. ती एका अफाट, जुन्या आणि जवळजवळ अपरिचित साम्राज्याची एक छोटी खिडकी आहे. आणि कोणास ठाऊक,
जमिनीखाली ति च्या शेजारी काय दडलेलं असेल. त्या साम्राज्याविषयी आपलं अज्ञान कि ती अगाध आहे, हेकळणं ही त्याविषयी काहीतरी माहीत असण्याची पहिली पायरी आहे.

या लेखाचा काही भाग लेखक आणि सहकाऱ्यांच्या Astrobiology मधल्या शोधनि बंधावर आधारि त आहे(bioRxiv,doi:10.64898/2026.08.22.746478).
प्रजातींची यादी तपासण्याचं संकेतस्थळ:

sites.astro.caltech.edu/checkfungalcontam/

आशिष महाबळ,
पॅसाडेना, कॅलिफोर्निया

संस्कृती

सानुनासिक आणि अनुनासिक स्वरांमध्ये
करतो आपण संस्कृतीच्या गप्पा;
पण कधी थोडेसे थांबून विचारतो का,
का आम्ही सगळे एकसुरात नेहमीच म्हणतो, "गणपती बाप्पा"?
संस्कृती म्हणजे काय–तोकडी विजार न घालणे,
की आपले मृग नयनी रूपडे पडद्यामागे झाकणे?
संस्कृती म्हणजे काय–आपल्या जिवलगाचे म्हणणे न ऐकणे,
की फालतू अनामिक भीतीमध्ये कुढत बसणे?
खरं तर संस्कृती म्हणजे मेहंदीचे रंगणे
आणि आपल्या सुहृदांमध्ये ती मिरवणे.
संस्कृती म्हणजे आपल्या नातवासाठी बसस्टॉपवर उगीच ताटकळणे;
संस्कृती म्हणजे "बरा मरे तू?" हे कळकळीने विचारणे.
पेज, मेतकूट आणि थोडे तूप,
आणि जमलेच तर गरम वरण आणि सूप.
आमचा राम असतो आमच्या हृदयात,
आणि शंकर भगवान पाच किलोमीटर उपाशी चालण्यात.
नाकारतो आम्ही दुय्यम संस्कृती रक्षक,
कारण होते आमुचे उत्तम शिक्षक.

रंजन मराठे(आनंदसुत)
डेन्व्हर, कोलोरॅडो

अनमोल ओवाळणी

आज आलीस घरी माहेरी भाऊबीजेस तर रहा ना इथे चार दिवस तरी
गोड घे मानुन पाहुणचार या गरीब भावाचा, आम्ही करू खातिरदारी

रुसू नकोस ग साधीच आणली साडी–चोळी, तुझ्या वहिनीने निवडली
स्वतःसाठी मात्र घेतल्यात बांगड्या, दरवर्षी वन्संकडून मिळते म्हणाली

आर्थिक परिस्थिती पाहून केलेला तिचा हा साडी न घेण्याचा बहाणा
खंडीभरही धान्य झालं नाही, बाप आभाळ काही वेळेवर घडे ओतेना

शिक्षणा अभावी गरीब शेतकऱ्याचं पोर अडाणी शेतकरीच बनला
तू परी सारखी सुंदर व गुणी, कोणी राजकुमार वरून घेऊन गेला

आनंदच आहे ग मला याचा पण संकोच आहे, मी हतबल कर्ताधर्ता
एकटाच एक कुटुंबात माय –बापाविना, खंगलो साऱ्यांचे करता करता

तुला न माहीत हे बाबांची अर्धी शेती होती गहाण आईच्या इलाजासाठी
त्यातभर तू सून धनिकाची व्हावीस म्हणून काढले होते कर्ज लग्नासाठी

पाण्यासारखा पैसा गेला, अर्धी शेती गेली आणि आई पण गेली देवाघरी
तेवढाच पैसा तुझ्या लग्नात गेला आणि तु सुद्धा गेलीस नांदायला सासरी

नंतर दुःख, चिंता भरल्या जीवनाने बाबांचा आत्माही सोडून गेला देह
माझ्यासाठी राहिलं हे छोटं कुटीर, ढीगभर सावरासावर व कष्टचा दाह

लवकर जाते म्हणालीस म्हणून मनात आले सर्व, पण तुला नाही सांगणार
जन्मभर भक्कम तुझ्या पाठीशी मी उभा, ही ओवाळणी नेहमीच राहणार

ज्योत्स्ना काटकर नारनवरे,
केंडल पार्क , न्यू जर्सी



विठ्ठल

महाराष्ट्राच्या उपास्य दैवताची शोधकथा

आठ शतकांहून अधिक काळ चंद्रभागेच्या तीरी वारीचा खेळ मांडणाऱ्या महाराष्ट्र आणि आजूबाजूच्या प्रदेशातील लोकांना आपल्या भक्तिरसात न्हाऊ घालून त्यांना आपल्या निव्वळ दर्शनाने सुखाचे निधान देणाऱ्या विठ्ठलाची शोधकथा खूपच विलक्षण आहे. त्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या इतिहास व भूगोलात डोकावून बरीच माहिती मिळवता येते. भौगोलिक संलग्नतेमुळे या प्रदेशांत कित्येक शतकांपासून सांस्कृतिक एकात्मता आढळून येते. विठ्ठलाच्या निमित्ताने प्रस्तुत लेखात संक्षिप्त स्वरूपात ह्या एकात्मतेचा मागोवा घेऊया.

पंढरपूर ह्या गावाचा उल्लेख होयसळ राजा सोमेश्वर ह्याच्या शके ११५९ मधील शिलालेखात 'पंडरगे' असा आहे यावरून या नावाचे मूळ कानडी असल्याचे स्पष्ट होते. त्यावरूनच 'पांडुरंग' हे क्षेत्रनाम म्हणून प्रथम प्रचलित झाले असावे हे उघड आहे. नामदेवांनी सुद्धा त्यांच्या अनेक अभंगांतून 'पांडुरंग' हा शब्द पंढरपूर ह्या अर्थाने वापरलेला आहे – वाराणसी भागीरथी । पांडुरंगी भीमरथी ।। वाराणसी पंचगंगा । पुष्पावती पांडुरंगा ।।

आश्चर्याची गोष्ट अशी की 'विठ्ठल' ह्या नावाचा मात्र अजून समाधानकारक उलगडा झालेला नाही. 'वीट' किंवा 'विष्णू' या शब्दांवरून 'विठ्ठल' हे नामाभिधान स्पष्ट होत नाही. लिखित स्वरूपात 'पांडुरंग माहात्म्य' स्कंद, पद्म आणि विष्णुपुराण अशा तीन संस्कृत ग्रंथांत आढळते. त्याद्वारे विठ्ठलाचे व इतर स्थानीय देवतांचे वैष्णवीकरण पूर्णत्वास गेलेले दिसून येते. त्या अनुषंगाने विठ्ठलाच्या मूळ रूपापासून महाराष्ट्राचे उपास्यदैवत होण्यापर्यंतची कहाणी खूपच उद्बोधक आहे.
मग विठ्ठलाचे मूळ रूप कोणते? महाराष्ट्रासहित दक्षिण भारतातल्या विस्तृत प्रदेशात पसरलेल्या धनगर व गोपजनीय परंपरेत त्याचे मूळ रूप पाहायला मिळते.
या धनगरी संस्कृतीचा अभ्यास करताना दुर्गा भागवत म्हणतात – कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्रच्या एकात्म संस्कृतीचे प्रतीक म्हणजे विठोबा. ह्या तीन प्रांतांत भाषाभिन्नता असूनही त्यांची संस्कृती एक आहे. विठ्ठल 'कानडा' आहे. तो गवळी असून काळी घोंगडी पांघरलेली आहे.
धनगरांच्या परंपरेत बीरप्पा किंवा विरोबा आणि विठ्ठल ह्या दोन्ही देवांची पूजाअर्चा केली जाते. विठ्ठल-बिरप्पाच्या उपासनेचे एक केंद्र कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली येथे आहे. धनगरांच्या अनेक सुमधुर गीतांतून हे 'सुंबराण' (स्मरण) बघायला मिळते.

कैलासाच्या सांभाचं । सुंबराण मांडलं ।
तवाच्या बा येळंला । इटल बा ब्रमल ।
दोघं जण बंदु गा । बंदु बोलु लागलं ।

ह्या तिन्ही प्रदेशातले यादव म्हणून ओळखले जाणारे गोल्ल-कुरुब म्हणजेच गवळी-धनगर किंवा गोपजन हे विठ्ठलाचे मूळ उपासक होते, असे मानले जाते.
पंढरपूरच्या आसपास आजही कानडी प्रभावाच्या अनेक धनगर वस्त्या दिसून येतात. देवगिरीचे यादव राजघराणेही विठ्ठलाचे भक्त असल्याचे पुरावे आढळून येतात.
तसेच कर्नाटकातील विजयनगरचे राजेही त्याच यादव कुळातले होते, असे काही अभ्यासक मानतात.
विठ्ठलाचे कानडीपण अनेक संतांनी वर्णिलेले आहे. एकनाथ लिहितात.

तीर्थ कानडे देव कानडे । क्षेत्र कानडे पंढरिये ।।
विठ्ठल कानडे, भक्त हे कानडे । पुंडलिक उघडे उभे केले ।।

नामदेव म्हणतात –
कानडा विठ्ठल वो उभा भीवरेतीरी । भक्तांचे आर्त वो जीवा लागले भारी ।।
तर ज्ञानेश्वर लिहितात – कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु । येणे मज लावियेला वेधु ।।
विठ्ठल हे विष्णूचे रूप आहे असे म्हणूनही आपल्या संतांनी हे रूप विष्णूच्या चोवीस अवतारांहूनही निराळे आहे असे म्हटले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात –
बाप रखुमादेवीवरु पंचविसावा । चोविसा मूर्तीवेगळा ।।

विठ्ठलाचा शोध विष्णूच्या चोवीसही अवतारांत घेता येणार नाही असेच त्यांना सुचवायचे आहे. तसेच विष्णुच्या सहस्रनामांत देखील 'विठ्ठल' हे नाव येत नाही.
नामदेव म्हणतात
जो सहस्रांमाजीं न दिसे । चोविसात न भासे ।।
तरीही ह्या सर्वांचे समावेशक रूप म्हणजे विठ्ठल.
तुकाराम लिहितात – तुका म्हणे जे जे बोला । ते ते साजे या विठ्ठला ।।

विठ्ठलाच्या पंढरपूर येथील मूर्तीविषयी अभ्यासकांचे असे मत आहे की अफजलखान किंवा इतर आक्रमणांच्या दरम्यान ही मूर्ती माढा येथे हलवली गेली असण्याची शक्यता आहे. हा धोका टळल्यावर ती पुन्हा पंढरपूर येथे प्रस्थापित करण्यात आली असावी. ह्या घटनेची आठवण म्हणून माढा येथील मंदिरात एक वेगळी मूर्ती स्थापिली आहे. पण सध्या पंढरपूर येथे असणारी मूर्तीच विठ्ठलाची मूळ मूर्ती आहे ह्याबाबत मतैक्य होताना दिसते.

विठ्ठलाच्या ज्या अवतरणकथा परिचित आहेत त्यात महत्त्वाची कथा दिंडीरवनाशी किंवा चिंचवनाशी संबंधित आहे. पंढरपूर गावाबाहेर एक दिंडीरवन आहे जिथे लखूबाईचे मंदिर आहे. ही लखूबाई म्हणजे कृष्णावर रुसल्यामुळे तेथे येऊन राहत असलेली रुक्मिणी असे मानले जाते. आणखी एक प्रसिद्ध कथा म्हणजेच पुंडलिकाची कथा.

पंढरपूरचा विठ्ठल आणि आंध्रमधील तिरुमला येथील वेंकटेश ह्यांच्यात विलक्षण साम्य आढळते हा काही योगायोग नाही. दोघेही विष्णुरूप. एक 'बाळकृष्ण' मानला जातो तर दुसरा 'बालाजी'. वर सांगितलेल्या लखूबाईच्या कथेप्रमाणे वेंकटेशाची पत्नी भृगुने केलेल्या अपमानामुळे चिडून पहिल्यांदा करवीरमध्ये व नंतर तिरूचनूरमध्ये वेगळी राहिलेली दिसते. वेंकटेश हा देखील विठ्ठलाप्रमाणे शस्त्रहीन व मौनी आहे. दोघांच्याही अवतारकथेत चिंचेच्या झाडाचे स्थान आहे.
त्यामुळे आपण असा निष्कर्ष काढू शकतो की वेगळ्या स्थानी नांदत असलेले हे एकाच लोकदेवाचे उन्नयन झालेले दोन आविष्कार आहेत.
धनगरांचा 'विरोबा' हा जो ख्यातनाम देव आहे त्याचे रूपांतर वीरशैव किंवा लिंगायत संप्रदायाच्या 'वीरभद्र' ह्या देवात झाले आहे असे मत प्रसिद्ध अभ्यासक गुंथर सोंथायमर यांनी नोंदवले आहे. आजही कर्नाटकातील अनेक गावांत वीरभद्राची मंदिरे आढळून येतात. बेळगाव जिल्ह्यातील यडूर गाव हे वीरभद्राचे मोठे क्षेत्र आहे. तसेच आंध्रमधील लेपाक्षी हेही एक प्रमुख क्षेत्र मानले जाते. त्यास विरुपाक्ष-विठ्ठल असेही म्हटले जाते. हे विठ्ठलाच्या शैवीकरणाचे उदाहरण आहे असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. विठ्ठलाचे वैष्णवीकरण झाले की शैवीकरण ह्यात न पडता एक गोष्ट अधोरेखित करता येते ती म्हणजे महाराष्ट्र भूमीत ह्या सर्व पंथांचा, संप्रदायांचा सुंदर संगम झालेला दिसून येतो. नाथ संप्रदायाचे दीक्षित आद्य संत ज्ञानेश्वर ह्यांनी व वारकरी संप्रदायातील इतर सर्वच संतांनी हरिहर ऐक्याचा पुरस्कार केला.

ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तीनाथ लिहितात –
विष्णुसहित शिव आणिला पंढरी । केले भीमातीरी पेखण जेणे ।।

तुकोबा म्हणतात –
हरिहरा भेद । नाही, करू नये वाद ।।

रामोपासना करणाऱ्या रामदासांनीही विठ्ठलाचे माहात्म्य जाणले होते. ते लिहितात –
राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एकरूप ।।
संतांनी विठ्ठलाच्या 'मौनस्थ' रूपाचे भरभरून वर्णन केले आहे व ते करताना त्याला 'बुद्धरूपातही' बघितले आहे.

एकनाथ लिहितात.
नाही बोलाचाली मौन धरियेले । कैसे चाळिवलें पुंडलिकें ।।

जनाबाई म्हणतात - होऊनिया कृष्ण कंस वधियेला ।
आता बुद्ध झाला सखा माझा ।।

एकनाथ असेही लिहितात –
नववा बैसे स्थिररूप । तया नाम बौद्धरुप ।।
संत तया द्वारी । तिष्ठताति निरंतरी ।।

नामदेव लिहितात
– गोकुळी अवतारु सोळा सहस्रा वरु । आपण योगेश्वरु बौद्धरूपी ।।
विष्णूचा नववा अवतार बुद्ध व विठ्ठल हे एकरूप असल्याची संतांची धारणा होती. ह्याचे स्पष्टीकरण जरी मिळत नसले तरी एक गोष्ट निश्चित होती की ज्ञानदेव-नामदेवांच्या काळापूर्वी हजार-दीड हजार वर्षे संपूर्ण महाराष्ट्र बुद्धाच्या अनुयायांनी व्यापलेला होता. महाराष्ट्रातल्या ठिकठिकाणच्या पर्वतांमध्ये बौद्ध गुंफा किंवा लेणी विपुल संख्येने आढळून येतात. मराठी संतांनी विठ्ठलाला बुद्ध म्हटले पण जिन मात्र म्हटले नाही. ह्याचे कारण असेही असू शकते की त्याकाळी जैन समाज मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात होता पण बुद्धाचे विष्णूच्या नवव्या अवतारात विलीनीकरण झाले होते. भक्तिमार्गाचे साम्य असलेल्या, जातीपातींची बंधनं झिडकारणाऱ्या वारकरी आणि महानुभाव संप्रदायांत मात्र विठ्ठलाला विष्णुचा अवतार कृष्ण मानण्यावरून मतभेद होते.
विठ्ठलाचे वैदिकीकरण पूर्ण होऊनही त्याच्या उत्क्रांतीचे सर्व टप्पे विविध आदिरुपांतून आजही दिसून येतात. ठिकठिकाणची शिल्पे, मूर्त्या, लेख, लोकगीते, लोककथा, परंपरा याच गोष्टींची साक्ष देतात. हेही तेवढेच खरे की महाराष्ट्र भूमी ही समन्वयाची भूमी आहे आणि श्रद्धेचे, भक्तीचे, समतेचे सर्व प्रवाह चंद्रभागेत विलीन होऊन शेवटी विठ्ठलाशीच येऊन मिळतात. विठ्ठल हेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे आणि इथल्या बहुजनांच्या बंधुभावाचे व सहिष्णुतेचे प्रतीक आहे.

– अमित भावे
गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

संख्यांमध्ये दडलेली जादू शोधणारे मराठी गणितज्ञ
दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर

गणित म्हटलं की आपल्याला कठीण equations, मोठमोठी calculations आणि formulas आठवतात. पण गणित म्हणजे केवळ अशी कठीण गोष्ट नाही. संख्यांमध्ये काही सुंदर patterns, गंमतीदार properties आणि आश्चर्यकारक relationships लपलेल्या असतात. या संख्यांच्या जगात असेच patterns शोधण्यात आपले आयुष्य घालवणारे एक विलक्षण भारतीय गणितज्ञ म्हणजे दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर.

कापरेकरांचा जन्म १७ जानेवारी १९०५ रोजी मुंबई जवळच्या डहाणू येथे झाला. त्यांना लहानपणापासूनच संख्या आणि mathematical puzzles मध्ये विशेष रस होता. त्यांनी पुण्याच्या Fergusson College मधून शिक्षण घेतले आणि १९२९ मध्ये पदवी मिळवली. पुढे त्यांनी महाराष्ट्रातील देवळाली येथे शिक्षक म्हणून काम केले. मात्र शिक्षकाची नोकरी करत असतानाही त्यांचे खरे प्रेम होते ते म्हणजे numbers theory, म्हणजेच अंकांचा अभ्यास.

कापरेकरांकडे आजच्या काळासारखे computers किंवा calculators नव्हते. तरीही ते संख्यांकडे अतिशय वेगळ्या नजरेने पाहत. एखादी संख्या घेऊन तिच्यावर काही साध्या mathematical operations केल्या, तर त्यातून कोणता pattern तयार होतो, हे शोधणे त्यांना आवडत असे. त्यांच्या या जिज्ञासेतून अनेक interesting number concepts जगासमोर आले.

Dattatreya Ramachandra Kaprekar

discovered many interesting properties in recreational number theory.

६१७४ – कापरेकरांचा सर्वात प्रसिद्ध शोध

कापरेकरांचे नाव ऐकल्यावर सर्वात आधी आठवते ती संख्या म्हणजे ६१७४, ज्या संख्येला Kaprekar's Constant म्हटले जाते.
यासाठी कोणतीही चार अंकी संख्या घ्या, पण तिचे सर्व digits सारखे नसावेत. उदाहरणार्थ ३५२४.
Digits मोठ्यापासून छोट्या क्रमाने लावले तर: ५४३२
आणि छोट्यापासून मोठ्या क्रमाने: २३४५
आता वजाबाकी करा: ५४३२ − २३४५ = ३०८७
पुन्हा तीच process: ८७३० − ०३७८ = ८३५२
पुन्हा: ८५३२ − २३५८ = ६१७४
आता ६१७४ वर ही process केली तर: ७६४१ − १४६७ = ६१७४
म्हणजे एकदा ६१७४ मिळाले की आपण कितीही वेळा ही process repeat केली, तरी उत्तर ६१७४ च राहते!

ही एक छोटीशी mathematical trick वाटू शकते, पण त्यामागे संख्यांची अतिशय सुंदर रचना आहे.

Kaprekar Numbers

कापरेकरांनी अशाच प्रकारे काही विशिष्ट संख्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. त्यापैकी एक म्हणजे Kaprekar Numbers.

उदाहरण म्हणून ४५ पाहू.
$४५^2 = २०२५$
आता २०२५ चे दोन भाग करू: २० + २५ = ४५
म्हणजे ४५ चा square केल्यानंतर मिळालेली संख्या योग्य ठिकाणी विभागली, तर त्या दोन भागांची बेरीज पुन्हा ४५ मिळते. म्हणून ४५ ही Kaprekar Number आहे.

आणखी एक example: $२९७^2 = ८८२०९$
आता: ८८ + २०९ = २९७
म्हणून २९७ हीसुद्धा Kaprekar Number आहे.

अशा numbers मध्ये square आणि मूळ संख्या यांच्यातील हा सुंदर connection कापरेकरांनी अभ्यासला.

हर्षद Numbers – संख्यांच्या digits मधली गंमत

कापरेकरांच्या कामातील आणखी एक महत्त्वाची कल्पना म्हणजे Harshad Numbers.
'हर्ष' हा शब्द संस्कृतमधील हर्ष म्हणजे आनंद आणि द म्हणजे देणारा, अशा अर्थाने जोडला जातो. या संख्यांना अशी property असते की त्या संख्येच्या अंकांची बेरीज केल्यावर मिळणाऱ्या संख्येने मूळ संख्येला निःशेष भाग जातो.

उदाहरण घेऊया: १८
१८ च्या digits ची बेरीज: १ + ८ = ९
आणि:
१८ / ९ = २
म्हणून १८ ही Harshad Number आहे.

आता २१ पाहू:
२ + १ = ३
आणि:
२१ ÷ ३ = ७
म्हणून २१ ही सुद्धा Harshad Number.

पण १९?
१ + ९ = १०
१९ ला १० ने पूर्णपणे divide करता येत नाही. त्यामुळे १९ ही Harshad Numbeी नाही.

ही संकल्पना इतकी सोपी आहे की जगभरातील शाळकरी मुलेही वेगवेगळ्या संख्या घेऊन ती स्वतः तपासू शकतात. आणि हेच कापरेकरांच्या mathematics चे वैशिष्ट्य होते – साध्या arithmetic मधून interesting mathematics शोधणे.

स्वयंभू संख्या – Self Numbers

कापरेकरांना numbers मध्ये काही संख्या अशा दिसल्या ज्या इतर संख्यांमधून एका विशिष्ट प्रकारे तयार होत नाहीत. त्यांनी अशा संख्यांसाठी Swayambhu Numbers, म्हणजेच स्वयंभू संख्या, हा शब्द वापरला. इंग्रजीत त्यांना Self Numbers असेही म्हटले जाते.

हे समजून घेण्यासाठी एक सोपे उदाहरण पाहू.

एखाद्या संख्येपासून तिचे अंक आणि ती संख्या यांची बेरीज करूया.
उदाहरणार्थ:

१५ + १ + ५ = २१

म्हणून २१ ही संख्या १५ पासून तयार होऊ शकते.

पण काही संख्या अशा असतात की कोणत्याही धन पूर्णांकात तिचे अंक जोडून ती संख्या तयार करता येत नाही. अशा संख्या म्हणजे Self किंवा Swayambhu Numbers.

यातून एक सुंदर प्रश्न निर्माण होतो – "एखादी संख्या कुठून आली?" आणि काही संख्यांच्या बाबतीत उत्तर असते, "ती दुसऱ्या कोणत्याही संख्येपासून तयार झालेली नाही!"

एक high school teacher, पण जगभर ओळखला गेलेला Mathematician.

कापरेकरांनी Demlo Numbers यांसारख्या इतर number patterns चा देखील अभ्यास केला. संख्यांची रचना, त्यांचे digits, squares आणि त्यांच्यामधील संबंध यामध्ये त्यांना सतत नवीन patterns सापडत असत.

त्यांचे काम पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते – त्यांना mathematics मध्ये नवीन गोष्टी शोधण्यासाठी नेहमी complicated formulas ची गरज भासत नसे. कधी एखादी संख्या लिहायची, तिचे अंक rearrange करायचे, बेरीज-वजाबाकी करायची किंवा square काढायचा आणि मग त्यातून काही नवीन pattern दिसतो का ते पाहायचे.

कापरेकरांचे जीवन विशेष आहे कारण ते मोठ्या university मधील प्रसिद्ध professor नव्हते. ते एक school teacher होते. त्यांनी स्वतःच्या curiosity आणि observation च्या जोरावर mathematics मध्ये स्वतंत्रपणे काम केले.

सुरुवातीला त्यांच्या कामाकडे फार मोठ्या प्रमाणावर लक्ष दिले गेले नाही. मात्र पुढे त्यांच्या number discoveries ची international mathematics community मध्ये चर्चा होऊ लागली. प्रसिद्ध science writer Martin Gardner यांनी १९७५ मध्ये Scientific American मधील आपल्या Mathematical Games column मध्ये कापरेकरांच्या कामाचा उल्लेख केला आणि त्यांच्या संख्यांच्या जगाची ओळख जगभरातील अनेक वाचकांना झाली.

कापरेकरांचे सर्वात मोठे योगदान कदाचित एखादी एक संख्या किंवा एक theorem नसून गणिताकडे पाहण्याची एक पद्धत आहे.

त्यांनी आपल्याला दाखवून दिले की एखादी साधी संख्या देखील एक puzzle असू शकते. तिच्यामध्ये एखादा pattern लपलेला असू शकतो. ६१७४, Kaprekar Numbers, Harshad Numbers, Swayambhu Numbers आणि इतर number patterns हे त्याचे सुंदर examples आहेत.

आज प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात calculator आणि computer आहे. पण कापरेकरांची गोष्ट आपल्याला सांगते की mathematics मधील नवे शोध लावण्यासाठी सर्वात आधी गरज असते ती curiosity ची. म्हणून पुढच्या वेळी एखादी संख्या तुमच्यासमोर आली, तर ती फक्त पाहून किंवा वाचून पुढे जाऊ नका.
क्षणभर थांबा आणि स्वतःला एक प्रश्न विचारा –

"या संख्येमध्ये काहीतरी interesting लपलेलं आहे का?"

कदाचित या एका प्रश्नातून तुमच्यातला छोटासा mathematician जागा होईल. कदाचित तुम्हाला एखादा नवीन pattern सापडेल, एखादा वेगळा प्रश्न पडेल आणि कदाचित त्याच प्रश्नातून एखादा नवीन mathematical discovery देखील जन्म घेईल. कारण प्रत्येक मोठा शोध हा कुठेतरी एका छोट्याशा curiosity पासूनच सुरू झालेला असतो.

आणि आपली खरी शोकांतिका हीच आहे की, गणिताच्या क्षेत्रात ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, असे गणितज्ञ दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर आपल्या महाराष्ट्रात आणि आपल्या मराठी माणसांमध्येच तुलनेने अपरिचित आहेत. पण ही परिस्थिती नक्कीच बदलू शकते. मला आशा आहे की हा लेख वाचल्यानंतर तुम्ही कापरेकरांच्या नावावरच थांबणार नाही, तर त्यांचे ६१७४, Harshad Numbers, स्वयंभू (Swayambhu) Numbers, Kaprekar Numbers आणि इतर number patterns स्वतः शोधून पाहाल.

कारण कापरेकरांना खरी आदरांजली त्यांच्याबद्दल फक्त वाचण्यात नाही; तर त्यांच्यासारखी curiosity मनात ठेवून, साध्या-साध्या numbers कडे नव्या नजरेने पाहण्यात आणि त्यांच्यामध्ये दडलेलं गणित स्वतः शोधून काढण्यात आहे. कदाचित पुढचा कापरेकर कुठेतरी आज एखादी संख्या हातात घेऊन हाच प्रश्न स्वतःला विचारत असेल –
"यात अजून काय लपलं आहे?"

संदर्भ –:

१. https://www.bookganga.com/eBooks/Books/Details/४६३८७६७४१५३३९५२४८०२ स.पं.
देशपांडे सरांनी लिहिलेलं "गणितानंदी कापरेकर" पुस्तक.
२. दिलीप गोटखिंडीकर सरांनी लिहिलेलं "गणक-यंत्र-मानव दत्तात्रय कापरेकर" हे पुस्तक
३. विकिपीडिया वरील काही लेख.



संग्राम देशपांडे
रॅले, नॉर्थ कॅरोलिना

आपल्या समाजाचे दुःखद वास्तव:

जेव्हा शिक्षण अंधश्रद्धेवर मात करण्यात अपयशी ठरते

अंधश्रद्धा हा आपल्या समाजातील नवीन विषय नाही. या विषयावर हजारो लेख, पुस्तके, व्हिडिओ आणि चर्चा उपलब्ध आहेत. तरीसुद्धा अंधश्रद्धा आजही आपल्या समाजात अस्तित्वात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आपले जीवन पूर्णपणे बदलून टाकले असले, तरी आपल्या विचारसरणीत मात्र अपेक्षित बदल झालेला दिसत नाही.

आपला समाज अनेक प्रकारे बदलला आहे. आपल्या कपड्यांमध्ये बदल झाला, खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या, शिक्षणपद्धती बदलली आणि करिअरच्या संधीही बदलल्या. आपण टेलिफोनपासून स्मार्टफोनपर्यंत, सुपरकॉम्प्युटरपासून टॅबलेटपर्यंत आणि आता कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा प्रवास केला आहे. तंत्रज्ञानाने आपल्या जीवनातील जवळजवळ प्रत्येक क्षेत्र बदलून टाकले आहे.

परंतु एक गोष्ट मात्र अजूनही अनेक ठिकाणी तशीच आहे– **आपली विचारसरणी.**

आजही आपल्यापैकी अनेक लोक आपल्या आजी–आजोबांकडून किंवा पूर्वजांकडून आलेल्या अनेक गोष्टी कोणताही प्रश्न न विचारता मान्य करतात आणि त्यांचे पालन करतात.

एक साधा प्रश्न विचारण्याची गरज आहे–

का?

परंपरांना प्रश्न विचारण्याऐवजी आपण त्या जशाच्या तशा स्वीकारतो आणि पुढच्या पिढीकडे पोहोचवतो. ही साखळी सुरू राहण्याचे एक मोठे कारण म्हणजे परंपरांना प्रश्न विचारण्याची भीती. "आपल्या घरात असेच चालत आले आहे", "सगळेच करतात" किंवा "असे केले नाही तर काहीतरी वाईट होईल" या विचारांमुळे अनेक गोष्टींचे परीक्षणच केले जात नाही.

मला सर्वाधिक आश्चर्य वाटते ते म्हणजे अनेक उच्चशिक्षित लोकसुद्धा काही अंधश्रद्धा पुढे नेताना दिसतात.

एक विज्ञान शिक्षक संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांना जीवशास्त्र, मानवी शरीररचना आणि वैज्ञानिक विचार शिकवतो. परंतु घरी आल्यानंतर तोच व्यक्ती मुलीला मासिक पाळीच्या काळात लोणच्याला हात लावू नको, देवाच्या ठिकाणी जाऊ नको किंवा काही कौटुंबिक विधींमध्ये सहभागी होऊ नको, असे सांगतो.

काही कुटुंबे गर्भवती महिलांना ग्रहणाच्या वेळी बाहेर जाऊ नका, असे सांगतात किंवा काही विशिष्ट विधी केल्यास मुलगा होण्याची शक्यता वाढते, अशा समजुती पसरवतात.

मग प्रश्न असा आहे–

जर विज्ञान आपण वर्गामध्ये स्वीकारत असू, तर आपल्या घरामध्ये त्याच वैज्ञानिक विचारांचा उपयोग का करू नये?

मासिक पाळी ही स्त्रीच्या शरीरातील एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे. तरीही अनेक महिलांना त्या दिवसांमध्ये "अशुद्ध" असल्याचे सांगितले जाते.

जर प्रत्येक मनुष्य–ज्यांची आपण पूजा करतो ते देखील–एका आईच्या माध्यमातूनच जन्माला आला आहे, तर जीवन निर्माण करणारी ही नैसर्गिक प्रक्रिया अशुद्ध कशी असू शकते?

शिक्षणाने अशा विचारांना आव्हान द्यायला नको का?

शिक्षण म्हणजे फक्त पदवी मिळवणे नाही. खरे शिक्षण म्हणजे प्रश्न विचारण्याची क्षमता, पुराव्यांचे परीक्षण करण्याची सवय आणि तथ्य व विश्वास यांतील फरक ओळखण्याची बुद्धी.

अनेक अभियंते, डॉक्टर, प्राध्यापक आणि इतर उच्चशिक्षित लोक आजही कोणताही वैज्ञानिक आधार तपासल्याशिवाय काही प्रथा पाळताना दिसतात. याचा अर्थ शिक्षण मिळाले म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन आपोआप विकसित होतोच असे नाही.

माझ्या विचार करण्याच्या क्षमतेमागे एक महत्त्वाची व्यक्ती आहे–**माझी आई.**

मला माझ्या आईचा खरोखर अभिमान आहे.

तिने मला कधीही समाजाच्या दबावामुळे अंधश्रद्धा स्वीकारायला भाग पाडले नाही किंवा कोणतेही विधी फक्त "सगळे करतात म्हणून" करायला सांगितले नाहीत. त्याऐवजी तिने नेहमी मला समजावून सांगितल –
"समाजामध्ये अनेक लोक काही गोष्टींवर विश्वास ठेवतात, पण त्यामागे वैज्ञानिक कारण काय आहे हे समजून घे. दोन्ही बाजू समजून घे आणि त्यानंतर तुला जे योग्य वाटेल तो निर्णय घे."
तिने माझ्यावर कधीही भीती किंवा आंधळा विश्वास लादला नाही. तिने मला त्याहून मौल्यवान गोष्ट दिली–विचार करण्याचे स्वातंत्र्य.
माझ्या मते, हेच खऱ्या पालकत्वाचे लक्षण असायला हवे.

पालकांनी फक्त परंपरा पुढे नेऊ नयेत, तर त्या परंपरांमागील कारणेही मुलांना समजावून सांगावीत. त्यांनी आपल्या मुलांना प्रश्न विचारायला, पुरावे शोधायला आणि स्वतःचे निर्णय घ्यायला शिकवले पाहिजे.

जर प्रत्येक पालक भीती ऐवजी जिज्ञासा वाढवेल, तर पुढची पिढी केवळ आधुनिक शिक्षणच नाही, तर वैज्ञानिक दृष्टिकोनही घेऊन पुढे जाईल.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे परदेशात शिक्षण घेणारे, प्रगत वैज्ञानिक क्षेत्रात काम करणारे किंवा विकसित देशांमध्ये राहणारे अनेक लोकसुद्धा काही वेळा स्वतःला चमत्कार करणारे म्हणवणाऱ्या व्यक्तींवर किंवा **"बाबांवर"** अवलंबून राहतात. प्रत्येक समस्येचे समाधान चमत्काराने मिळेल, असा विश्वास काही लोक ठेवतात. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

जर श्रद्धेच्या नावाखाली एखादी व्यक्ती काही सांगते आणि आपण आपली विचारशक्ती वापरणे थांबवतो, तर अशा शिक्षणाचा उपयोग काय?

लहानपणापासून मी एक गोष्ट पाहत आलो आहे. दर काही वर्षांनी समाजामध्ये एक नवीन "बाबा" किंवा स्वतःला आध्यात्मिक नेता म्हणवणारी व्यक्ती प्रसिद्ध होते. हजारो लोक त्यांच्या मागे जातात, पैसे दान करतात, त्यांच्यासाठी वेळ खर्च करतात आणि असा विश्वास ठेवतात की त्यांच्या समस्या **चमत्कारांद्वारे** दूर होतील.

कल्पना करा, हाच वेळ, पैसा आणि ऊर्जा जर शिक्षणासाठी, नवीन कौशल्ये शिकण्यासाठी, गरिबांना मदत करण्यासाठी, वैज्ञानिक संशोधनाला पाठिंबा देण्यासाठी किंवा स्वतःचे जीवन सुधारण्यासाठी वापरली गेली, तर आपला समाज किती वेगळा असू शकतो?

आणखी एक गोष्ट विचार करायला लावते ती म्हणजे इच्छा पूर्ण झाल्यावर काही लोक देवाला प्रसन्न करण्यासाठी प्राण्यांचा बळी देतात.

एखाद्याला मांसाहार करायचा असेल, तर तो त्याचा वैयक्तिक निर्णय आहे. परंतु एखाद्या प्राण्याच्या हत्येला देवाच्या इच्छेचे नाव देण्याची गरज का आहे, हा प्रश्न आपण विचारू शकतो.

त्याचप्रमाणे, अनेक लोक आपल्या भविष्याबद्दल जाणून घेण्यासाठी ज्योतिषी किंवा पुरोहितांना मोठ्या प्रमाणात पैसे देतात. एखाद्या व्यक्तीला अलौकिक शक्ती असल्याचा दावा केला जात असेल, तर त्या दाव्याचा आधार काय आहे, हे विचारणे चुकीचे नाही.

हे प्रश्न अनादराचे नाहीत. हे प्रश्न तर्क आणि विचारांचे आहेत.
अनेक लोक धार्मिक स्थळांवर सोने, चांदी, दूध आणि मोठ्या प्रमाणात पैसे दान करतात, कारण त्यांना वाटते की यामुळे देव प्रसन्न होईल आणि आशीर्वाद मिळतील. पण आपण स्वतःला एक प्रश्न विचारू शकतो.
जर देवाने हे संपूर्ण विश्व निर्माण केले असेल, तर माणूस त्याला सोने किंवा दूध अर्पण करून आणखी श्रीमंत करू शकतो का?
कदाचित आपण देवाला देऊ शकणारी सर्वात मोठी भेट म्हणजे **दयाळूपणा आणि माणुसकी.**
विधी आणि परंपरांच्या नावाखाली अन्न, दूध किंवा पैसा खर्च करण्याऐवजी आपण एखाद्या भुकेल्या व्यक्तीला अन्न देऊ शकतो, एखाद्या वृद्ध व्यक्तीला मदत करू शकतो,

एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी हातभार लावू शकतो, गरजू कुटुंबाला मदत करू शकतो किंवा एखाद्या रुग्णाच्या उपचारासाठी योगदान देऊ शकतो.
एखाद्या माणसाचे जीवन बदलणारी मदत ही केवळ परंपरा पूर्ण करण्यापेक्षा अधिक अर्थपूर्ण ठरू शकते. अंधश्रद्धा टिकून राहण्याचे एक मोठे कारण म्हणजे अनेक लोक प्रश्न विचारणे म्हणजे अनादर समजतात.
परंतु एखाद्या विश्वासावर प्रश्न विचारणे म्हणजे धर्माचा अपमान करणे नाही.

विज्ञान आणि अध्यात्म हे एकमेकांचे शत्रू असण्याची गरज नाही. श्रद्धा आपल्याला दयाळूपणा, करुणा, प्रामाणिकपणा, शिस्त आणि आशा देऊ शकते. परंतु भीती, आंधळे अनुकरण आणि अंधश्रद्धा यांनी तर्कशक्तीची जागा घेऊ नये.
प्रत्येक परंपरा स्वीकारण्यापूर्वी तिचे आकलन झाले पाहिजे. प्रत्येक विश्वासाला प्रश्न विचारण्याचा अधिकार असला पाहिजे. आणि प्रत्येक दाव्याला शक्य असेल तेथे पुराव्याच्या कसोटीवर तपासले पाहिजे.

आपल्या समाजाने आधीच सिद्ध केले आहे की तो बदल स्वीकारू शकतो. आपण नवीन तंत्रज्ञान स्वीकारले, आधुनिक वैद्यकशास्त्र स्वीकारले आणि वैज्ञानिक शोधांचा स्वीकार केला..

आता आपल्या विचारसरणीलाही आधुनिक करण्याची वेळ आली आहे.

तुम्ही गावात राहता की मोठ्या शहरात, याने फरक पडत नाही. तुमच्याकडे एक पदवी आहे की दहा पदव्या आहेत, यानेही फरक पडत नाही.
खरा शिक्षित व्यक्ती तो नाही ज्याने अनेक प्रमाणपत्रे मिळवली आहेत, तर तो आहे ज्याच्यात प्रश्न विचारण्याचे धैर्य, पुरावे स्वीकारण्याची तयारी आणि सत्य समोर आल्यावर आपले विचार बदलण्याची क्षमता आहे.

आपल्या समाजाचे भविष्य केवळ तंत्रज्ञान बदलल्यामुळे बदलणार नाही.

ते तेव्हाच बदलेल, जेव्हा आपण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भीती आणि न तपासलेले विश्वास पुढे पाठवणे थांबवू आणि त्याऐवजी ज्ञान, विचार, जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन पुढे नेऊ.

मला माहीत आहे की हा लेख प्रत्येक व्यक्तीची विचारसरणी बदलणार नाही. परंतु जर एखाद्या व्यक्तीने हा लेख पूर्ण वाचल्यानंतर स्वतःला एक प्रश्न विचारला–
"मी यावर विश्वास का ठेवतो?"
तर हा लेख लिहिणे माझ्यासाठी नक्कीच सार्थक ठरेल.
कारण प्रत्येक मोठ्या बदलाची सुरुवात एका छोट्याशा प्रश्नाने होते.
आणि कदाचित प्रत्येक अंधश्रद्धेचा शेवटही एका प्रश्नानेच होतो–
"का?"

– प्राजक्ता बडगुजर
रोचेस्टर हिल्स, मिशिगन

संकल्पना : गौतम पंगू रेखाटन: शीतल रांगणेकर





अचानक

शनिवार, ऑक्टोबर २७, १९७३!!
हा दिवस माझ्या आयुष्यातील अनेक संस्मरणीय दिवसांपैकी एक आहे.
१९६७च्या जुलै महिन्याच्या सुरुवातीला भारत सोडून अमेरिकेला, तेही न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरात पाय ठेवला तेव्हाचे दिवस अतिशय वेगळे होते, हे सर्वश्रुत आहे. कोणी भारतीय रस्त्यात दिसायचा अवकाश, मी आपण होऊन जाऊन बोलत असे. पुढे पुढे निरंजन त्यांच्या हॉस्पिटलमधील भारतीय सहकाऱ्यांना घरी बोलवू लागले, तेव्हा कुठे थोडा जम बसल्यासारखं वाटू लागलं. हळूहळू ओळखी वाढत गेल्या.

एअर इंडियामध्ये उच्च पदावर काम करणारे घाटगे आमच्या शेजारी राहत होते. त्यांच्यामुळे त्यांच्या मराठी मित्रांशीही ओळखी झाल्या. त्यापैकी एक आपटे!
आपटे, त्यांचं नाव आता आठवत नाही, हे गृहस्थ मनमोकळ्या स्वभावाचे आणि प्रेमळ होते. एकटेच होते. त्यांची पत्नी जाऊन थोडी वर्षं झाली होती. आपटे जवळपास राहत असल्यामुळे आणि एकटे असल्याने बऱ्याचदा चक्कर टाकायचे.

एकदा असेच आले असताना मला म्हणाले, "उद्या माझ्याकडे पाहुणे येताहेत, दोन दिवस राहणार आहेत. घेऊन येऊ तुमच्याकडे परवा?"
मी म्हटलं, "अहो, त्यात विचारायचं काय, घेऊन या की!"
आपटे हसत म्हणाले, "काशिनाथ घाणेकर आणि इरावतीबाई येताहेत."
मी उडालेच!
"आपटेसाहेब, मी आमच्या काही मित्रमंडळींना बोलवलं तर चालेल का? घाणेकरांना भेटायला? खूष होतील सगळे," विचारल्यावर आपटेसाहेबांनी हसून संमती दिली.
मग काय, आमच्या उत्साहाला पारावार नव्हता. निरंजनने किरपेकर, कवडी आणि पाताळे ह्या आमच्या खास मित्रांना फोन करून, "घाणेकरांना भेटायला या," म्हणून आमंत्रण दिले. कोणी नकार द्यायचा प्रश्नच नव्हता.
आपटेसाहेब गेल्यानंतर माझी धावपळ सुरू झाली. माझ्या दोन लहान मुलींना—राणी, वय वर्षं ५ आणि प्रिया, वय वर्षं ३-सांभाळून काय काय करता येईल, विचार सुरू झाला.
आपटेसाहेबांनी ठरवलेला दिवस, म्हणजे शनिवार, ऑक्टोबर २७, १९७३, उजाडला. आमची उत्साही मित्रमंडळी ठरलेल्या वेळेच्या आधीच हजर!
शरद कवडी निरंजनला म्हणाले, "दीक्षित, घाणेकर म्हणजे पक्के पिणारे. त्यांना त्यांचे स्पेशल ड्रिंक्स लागणार."

आली का पंचाईत!
आमच्या घरी केवळ ऑरेंज ज्यूस हेच ड्रिंक. पुन्हा धावपळ! कवडी आणि निरंजन बाहेर जाऊन 'स्पेशल ड्रिंक्स' च्या दोन बाटल्या घेऊन आले.
त्या दिवशी मी काय स्वयंपाक केला होता, आठवत नाही. पण कुरडया तळून ठेवल्या होत्या, आठवतंय.
आमचं अपार्टमेंट तळमजल्यावर होतं. थोड्याच वेळात आपटेसाहेब, काशिनाथ घाणेकर आणि इरावतीबाई आले. ते तिघं घरात आल्यावर मी घाणेकरांकडे बघतच राहिले.
कसला देखणा माणूस! गोरापान रंग, निळे डोळे!!
इरावतीबाई सौम्यपणे, गोड हसून सर्वांना नमस्कार करून खुर्चीवर बसल्या.
मी पट्कन स्वयंपाकघरात जाऊन तळलेल्या कुरडया टेबलावर ठेवल्या. तिकडे एक दृष्टिक्षेप टाकून काशिनाथ म्हणाले, "हे काय, काही सबस्टॅन्शिअल द्या हो."
कवडी म्हणाले, "मिळेल, सगळं मिळेल."
निरंजन आणि कवडी व्हिस्कीच्या बाटल्या घेऊन आले.
काशिनाथ बघतच राहिले. ते निरंजनला म्हणाले, "अरे, ह्या आपटे साहेबांनी येताना इतकं बजावून सांगितलं मला की दीक्षितांच्या घरी तुमचं 'खास' मिळणार नाही. दीक्षित साधासुधा माणूस आहे."
निरंजन म्हणाले, "घरी आलेल्या पाहुण्याला खूष करायला नको का? घ्या घ्या, संकोच करू नका."
सगळ्यांच्या गप्पा चालू असताना आम्ही चार मैत्रिणींनी जेवणाचे पदार्थ टेबलावर ठेवले. ते पाहिल्यावर काशिनाथ तत्परतेने उठले आणि टेबलावर ठेवलेली एक थाळी उचलून एकेक पदार्थ वाढून घेतला. इरावतीबाईनीही उठून स्वतःची थाळी वाढून घेतली. त्या दोघांचा हा मनमोकळेपणा खूप भावला.
जेवत असताना इरावतीबाई आमच्या मुलींशी, राणी-प्रियाशी, हसतखेळत गप्पा मारत होत्या.

काशिनाथ राणीकडे पाहत म्हणाले, "राणीमा, इकडे ये."
सगळ्यांकडे वळून पुढे म्हणाले, "माझ्या 'दादी माँ' चित्रपटात बीना रॉयचं नाव रानीमा होतं. आता ही माझी राणीमा."
एवढं बोलून त्यांनी आवेशाने त्या चित्रपटातले एक-दोन संवाद साभिनय ऐकवले. इतकं छान वाटलं सगळ्यांना! आम्ही टाळ्या वाजवून त्यांना, "अजून काही संवाद म्हणून दाखवा," म्हणून विनंती केली.
कसलेले अभिनेता ते! बरेच काही संवाद, खणखणीत आवाजात, तेही साभिनय, इतक्या सुंदर रीतीने सादर केले की आम्ही अक्षरशः मंत्रमुग्ध झालो. तो प्रसंग आठवला की आजही त्यांच्या अभिनयाचा प्रभाव जाणवतो.
जेवण झाल्यावर काशिनाथ त्यांची थाळी उचलून बेसिनमध्ये ठेवायला निघाले, तर मी त्यांना म्हटलं, "अहो, मी ठेवते, मला द्या."

ते म्हणाले, "नाही, मी ठेवतो की."
मी विचारलं, "का, कोणाचे उपकार नको म्हणून?"
काशिनाथ पट्कन उत्तरले, "अहो, काय बोलता? प्रत्येक माणूस प्रत्येक क्षणाला असंख्य लोकांच्या उपकाराखाली जगतोय. कोणी टेलिफोन शोधून काढला, कोणी इलेक्ट्रिसिटी शोधली, तर कोणी गाड्या, विमानं शोधलीत. आपल्यावर अगणित लोकांचे उपकार आहेत. विसरून कसं चालेल?"
डॉ. काशिनाथ घाणेकरांचं हे वाक्य माझ्या कायम लक्षात राहिलंय. तेव्हापासून मी, "मला नाही बाई कोणाची मदत घ्यायला आवडत," हा टेंभा मिरवणं थांबवलंय.
जेवल्यानंतर हात धुण्यासाठी त्यांनी "बाथरूम कुठे?" विचारल्यावर मी त्यांना बाथरूमकडे नेलं. चालताना त्यांनी घेतलेल्या ड्रिंक्सचा परिणाम उघड दिसत होता. माझा हात धरून, आवाज चढवून काशिनाथ म्हणाले, "आज भाऊबीज आहे. मला ओवाळल्याशिवाय मी इथून जाणार नाही." मी थोडी घाबरलेच; पण मानेनं होकार दिला.
काशिनाथ हात धुऊन बाहेर आले. आम्हा चार मैत्रिणींकडे पाहून म्हणाले, "चला आता. मला ओवाळा, आज भाऊबीज आहे."
त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर "नाही" म्हणायची हिंमत कोणालाच झाली नाही. आम्ही चार जणींनी त्यांना ओवाळलं. आश्चर्य म्हणजे त्यांनी आम्हा चौघींना डॉलर्स दिले, ओवाळणी म्हणून. मी इरावतीबाईंना विनवलं, "अहो, हे आम्ही नाही घेऊ शकत. त्यांना प्लीज सांगा ना."
इरावतीबाई मिष्कील स्वरात म्हणाल्या, "तुम्हा भावाबहिणींमध्ये मी पडणार नाही."

दिवाळी आली की ह्या अनोख्या भाऊबीजेची आठवण हमखास येते.

शनिवार, ऑक्टोबर २७, १९७३ हाच तो दिवस.....
अचानक मिळालेला भाऊ, हो, अचानक मिळालेला भाऊ!!!!!

सुधा दीक्षित
पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया



- साऱ्या जणांचे काय (सचिन श्री.) १४
- इरादा (धनाग्रज) १४
- संस्कृती (रंजन मराठे) १७
- अनमोल ओवाळणी (ज्योत्स्ना काटकर नारनवरे) १७
- मनात म्हटलं (राहुल ददगाळे) ३२
- पुन्हा नव्याने (डॉ. अनिल रोंघे) ३२
- बापाचं घर (अरविंदा भामरे) ३२
- पाऊस (अंकिता कालें) ५६
- प्रेम! (शुभदा जोशी -पारखी) ५६
- निवांत सांज (चैत्राली काटे-यादव) ५६

अज्ञात आरोपी

'आरोपीचे नाव?'
न्यायालयातील शिपायाने विचारले.
सरकारी वकील उभे राहिले. 'महोदय, आरोपीचे नाव सांगणे अशक्य आहे.'
सभागृहात कुजबुज सुरू झाली. न्यायमूर्ती जोशी यांनी चष्म्याच्या वरून पाहिले.
'अशक्य? आरोपी समोर नाही का?'
'महोदय, आरोपी एक व्यक्ती नाही.'
'मग?'
'आरोपी आहे एक अदृश्य जमाव.'
न्यायालयात क्षणभर भयाण शांतता पसरली. ही कहाणी होती आदित्य कुलकर्णीची. वय अवघे वीस. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला शिकणारा, अभ्यासू, मितभाषी मुलगा. त्याचे जग फार मोठे नव्हते. काही मित्र, आई-वडील आणि पुस्तकांची सोबत. पण एका सकाळी त्याचे आयुष्य कायमचे बदलले. महाविद्यालयाच्या व्हॉट्सॲप गटावर त्याचा एक फोटो व्हायरल झाला. फोटो खरा होता. पण त्यासोबत जोडलेली कथा खोटी होती.
एका मुलीबरोबर उभा असलेला फोटो आणि खाली लिहिलेला मजकूर:
'कॉलेजमधील सर्वांत मोठा फसवा मुलगा.'
कोणी लिहिले? कशासाठी लिहिले? कोणालाच ठाऊक नव्हते. पण सोशल मीडियाला सत्याची गरज नसते. त्याला फक्त वेग हवा असतो.
काही वेळातच लाखो लोकांनी तो फोटो पाहिला. ज्यांनी आदित्यला कधी पाहिले नव्हते, तेही त्याच्यावर निर्णय देत होते.
'अशांना शिक्षा झाली पाहिजे.'
'याचा चेहरा पाहूनच कळतं.'
'अजून माहिती बाहेर येईल.'

प्रत्येक टिप्पणी म्हणजे एक दगड होता. प्रत्येक शेअर म्हणजे एक घाव. प्रत्येक विनोद म्हणजे एक अपमान. आणि हे सर्व करणारे लोक सुरक्षित होते. कारण ते पडद्यामागे होते. आदित्यने सुरुवातीला दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. आई म्हणाली,
'आदित्य, काही दिवसांनी लोक विसरतील.'
पण लोक विसरत नव्हते. उलट, नवीन नवीन खोट्या गोष्टी जन्म घेत होत्या. ज्या मुलीचा फोटो होता, तिने सार्वजनिक निवेदन दिले. 'आदित्य निर्दोष आहे.'
पण सत्याला कोणी शेअर केले नाही. कारण सत्य कधीच व्हायरल होत नाही. सनसनाटीपणा व्हायरल होतो.
एका संध्याकाळी आदित्य वडिलांना म्हणाला, 'बाबा, मी इतका वाईट आहे का?'
वडिलांच्या डोळ्यांत पाणी आले. 'नाही रे.'
'मग सगळे लोक माझा इतका तिरस्कार का करतात?'
त्या प्रश्नाचे उत्तर वडिलांकडे नव्हते. कारण ते लोक आदित्यचा तिरस्कार करत नव्हते. ते एका काल्पनिक प्रतिमेचा तिरस्कार करत होते. त्या प्रतिमेची निर्मिती सोशल मीडियाने केली होती.
काही आठवड्यांनी आदित्यने घरातून बाहेर पडणे बंद केले. त्याचे गुण घसरले. मित्र दूर गेले. फोन वाजला की त्याला भीती वाटू लागली. नवीन संदेश म्हणजे नवीन जखम असायची.
रात्री त्याने डायरीत लिहिले,
'ज्यांनी मला मारले, त्यांना मी ओळखत नाही. आणि ज्यांना मी ओळखतो, त्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचत नाही.'
सकाळी त्याची खोली आतून बंद होती.
न्यायालयात पुन्हा शांतता पसरली होती. सरकारी वकील हळूहळू बोलत होते.
'महोदय, आदित्यचा खून कोणत्याही शस्त्राने झाला नाही. त्याच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या नाहीत. त्याचा खून झाला हजारो टिप्पण्यांनी.'
सभागृहातील अनेकांची नजर खाली झुकली.
'आजचा सर्वांत मोठा धोका असा आहे की लोकांना त्यांच्या शब्दांचे वजन उरलेले नाही. एका क्लिकने ते एखाद्या माणसाच्या प्रतिष्ठेवर, मानसिक आरोग्यावर आणि आयुष्यावर प्रहार करतात.'
न्यायमूर्ती जोशी गंभीरपणे ऐकत होते. निर्णय देताना त्यांनी म्हटले,

'मानवजातीने अनेक शस्त्रे निर्माण केली. पण सोशल मीडियाच्या दुरुपयोगाइतके स्वस्त आणि सर्वत्र उपलब्ध शस्त्र कदाचित दुसरे नाही.'
'या माध्यमाने लोकांना अभिव्यक्ती दिली; परंतु विवेक दिला नाही. परिणामी, आज प्रत्येकाच्या हातात एक व्यासपीठ आहे, पण प्रत्येकाच्या मनात जबाबदारी नाही.'
'आदित्यला मारणारी एक व्यक्ती नाही. त्याला मारणारा तो मानसिक जमाव आहे, जो विचार न करता शेअर करतो, पडताळणी न करता दोषी ठरवतो आणि परिणामांची जाणीव न ठेवता शब्दांचे बाण सोडतो.'
त्या दिवशी न्यायालयाबाहेर पत्रकारांची गर्दी होती. बातमी सोशल मीडियावर झळकत होती. लोक पुन्हा प्रतिक्रिया देत होते.
पण आदित्य ते वाचण्यासाठी जिवंत नव्हता. कदाचित हीच सर्वांत मोठी शोकांतिका होती.

श्रीपाद टेंबे
पुणे, महाराष्ट्र



आठवणींच्या अंगणात अजूनही पेटलेली दिवाळी

दिवाळी जवळ आली की आजही मनाच्या एका कोपऱ्यात हलकीशी हालचाल सुरू होते. बाजारपेठेत दिवे लागतात, घराघरांत साफसफाई सुरू होते, फराळाचा सुगंध दरवळू लागतो आणि आकाशात फटाक्यांचे आवाज घुमू लागतात. सगळं काही तसंच असतं. दिवस तेच असतात, सण तोच असतो, दिवेही तेवढेच उजळत असतात. तरीही मनात कुठेतरी एक प्रश्न शांतपणे उभा राहतो पूर्वीची ती दिवाळी नेमकी कुठे हरवली?

लहानपणी दिवाळी म्हणजे फक्त एक सण नव्हता. ती एक वेगळीच दुनिया होती.
दिवाळीची चाहूल लागली की मन गावाकडे धावायला लागायचं. अजून सुट्टी सुरू झाली नसेल, तरी मनाने आपण आधीच गावात पोहोचलेलो असायचो. कधी निघायचं, कोणासोबत जायचं, गावात गेल्यावर पहिल्यांदा कोणाला भेटायचं, हे सगळं मनात आधीपासून ठरलेलं असायचं. त्या प्रवासाचीही एक वेगळीच ओढ होती. गावाकडे जाणारा रस्ता म्हणजे जणू दिवाळीकडे जाणारा रस्ता वाटायचा.

त्या वेळी दिवाळीची सुट्टी मोठी वाटायची. दिवस मोजण्याची घाई नसायची. आजचा दिवस संपला की उद्या पुन्हा एक नवा दिवस आपला आहे, ही भावना किती सुंदर होती! सकाळ झाली की घरात लगबग, अंगणात धावपळ, नातेवाईकांची ये-जा आणि मुलांचा गोंधळ. दिवस कसा जायचा, हे कळायचंच नाही. पण तरीही सुट्टी संपणार आहे, असे मनाला कधी वाटायचे नाही. उलट, ही दिवाळी कधीच संपू नये, असे वाटायचे.

आज मात्र काळ बदलला आहे. दिवाळी येते आणि जाते. सुट्टीचे दिवस मोजून ठेवावे लागतात. कामातून किती दिवस मिळतील, प्रवासासाठी किती वेळ लागेल, पुन्हा कधी कामावर हजर व्हायचे, याचा विचार आधी करावा लागतो. पूर्वी सुट्टी आपली वाटायची; आता सुट्टीही वेळापत्रकात बसवावी लागते.
सणाचा आनंद असतो, पण त्याच्या मागे वेळेची घाई उभी असते.

पूर्वी गावात पोहोचल्यानंतर ज्या व्यक्तींची वाट पाहायचो, त्यांपैकी अनेक जण आज आपल्यात नाहीत. आजी-आजोबा होते तेव्हा घराला एक वेगळाच जीव होता. त्यांची उपस्थिती म्हणजे घराच्या अंगणात असलेली शांत सावली होती. आजीच्या हातचा फराळ, तिची सतत सुरू असलेली लगबग, आपण खाल्लं का याची काळजी आणि तिच्या हातातून मिळणारा तो प्रेमाचा घास आजही आठवणींत तसाच जिवंत आहे.

आजोबा म्हणजे घरातला एक आधारवड. त्यांच्या आसपास बसून झालेल्या गप्पा, त्यांच्या आठवणी, त्यांचा आवाज आणि दिवाळीच्या दिवसांत त्यांची असलेली उपस्थिती हे सगळं आज अचानक आठवलं की मन भरून येतं. त्या वेळी त्यांचे महत्त्व इतके जाणवले नव्हते. कारण ते कायम आपल्या जवळच आहेत, असे वाटायचे. पण माणसं कायमची नसतात, हे कळेपर्यंत आयुष्य आपल्याला खूप पुढे घेऊन गेलेले असते.

आईकडचे, घरचे आणि नातेवाईक यांच्यामुळे दिवाळीला वेगळाच रंग होता. घर कितीही मोठं असलं, तरी त्यातली माणसं एकत्र आली कीच त्याला घरपण यायचं. कोण कुठून आलं, कोणासाठी काय आणलं, कोणाच्या घरी आधी जायचं, कोण किती दिवस थांबणार, या छोट्या छोट्या गोष्टींतही किती मोठा आनंद दडलेला होता! आज साधनं वाढली, सोयी वाढल्या, घरं बदलली; पण त्या गोंधळात असलेली आपुलकी मात्र कमी होत गेली की काय, असे कधी कधी वाटते.

आज दिवाळीत घरात दिवे लावतो. पण काही दिवे असे असतात, जे आपल्या आठवणींमध्येच पेटलेलेअसतात. आजी-आजोबा गेल्यावर असे वाटते की, घरातला एखादा दिवा कायमचा विझला. काही माणसं जाताना फक्त स्वतःला घेऊन जात नाहीत; ती आपल्यासोबत एका काळालाही घेऊन जातात. त्यांच्या जाण्यानेघर तिथेच असते, भिंती तिथेच असतात, अंगण ही तिथेच असते; पण त्या घरातले दिवस बदलून गेलेले असतात.

कधी कधी वाटते, आजी–आजोबा आपल्याबरोबर त्या जुन्या दिवाळीचे दिवस ही घेऊन गेले. आई कडचे घरचे लोक बदलले, काही दूर गेले, काही काळाच्या पडद्याआड गेले. पूर्वीच्या त्या गर्दीत आता रिकाम्या जागा दिसू लागल्या. पूर्वी ज्या जागी कोणीतरी बसलेलं असायचं, तिथे आता फक्त आठवण बसलेली असते.

मोठं होताना आपण अनेक गोष्टी मिळवतो. शिक्षण, नोकरी, जबाबदाऱ्या, स्वतःचं आयुष्य आणि पुढची स्वप्नं. पण काही गोष्टी नकळत मागे पडत जातात. बालपणीची दिवाळी त्यापैकीच एक. त्या वेळी आपल्याकडे पैसा किती होता, सुविधा किती होत्या, याचा विचार नव्हता. आनंदासाठी फार काही लागायचंही नाही. माणसं जवळ असली की सण मोठा व्हायचा.

आज मुलांसाठी दिवाळीची व्याख्या वेगळी आहे. त्यांच्या आठवणी वेगळ्या असतील. कदाचित काही वर्षांनी त्यांनाही त्यांच्या बालपणाची अशीच आठवण येईल. तेही म्हणतील की, आमच्या लहानपणीची दिवाळी वेगळी होती. कारण काळ बदलतो, पिढ्या बदलतात आणि प्रत्येक पिढी आपल्या आठवणीं मध्ये एक वेगळं गाव जपून ठेवते.

तरीही जुन्या दिवाळीचे दिवस पूर्णपणे संपले आहेत का? कदाचित नाही. ते दिवस आज आपल्या घरात दिसत नसतील, पण ते मनाच्या अंगणात अजूनही आहेत. एखादा फराळाचा सुगंध आला की आजी आठवते. एखाद्या जुन्या घरासमोरून जाताना आजोबा आठवतात. दिवाळीच्या सुट्टीचा उल्लेख झाला की गावाकडे जाण्याची ती ओढ पुन्हा जागी होते. आणि काही क्षणांसाठी का होईना, आपण पुन्हा त्या लहानपणीच्या दिवाळीत जाऊन पोहोचतो.

आयुष्य किती वेगाने पुढे जातं! लहानपणी वाटायचं की मोठं व्हायला किती वेळ लागेल. आता मागे वळून पाहिलं की वाटतं, ते दिवस एवढ्या लवकर कसे संपले? ज्या दिवाळीच्या सुट्ट्या कधी संपणारच नाहीत, असे वाटायचे, त्या सुट्ट्या केव्हा संपल्या, हेही कळले नाही. बालपण कधी मागे राहिले, गावाची ओढ कधी आठवण झाली आणि आपल्या माणसांची उपस्थिती कधी स्मृतीत बदलली, हेही समजले नाही. दिवाळी आजही येते. दिवे आजही पेटतात. घरात फराळही होतो. नातेवाईक भेटतात. पण प्रत्येक दिवाळीत मनात कुठेतरी जुन्या दिवाळीचा एक छोटासा दिवा पेटतो. त्या दिव्याच्या प्रकाशात आजीचा चेहरा दिसतो, आजोबांचा आवाज ऐकू येतो, गावचं घर दिसतं, अंगणातला गोंधळ दिसतो आणि सुट्टी कधीच संपणार नाही, असा विश्वास असलेलं ते निरागस बालपण पुन्हा भेटतं.

कदाचित हीच आठवणींची खरी ताकद असावी. काळ माणसांना आपल्यापासून दूर घेऊन जातो, दिवस बदलून टाकतो आणि घरांची रूपं ही बदलतात. पण काही क्षण मनात असे जपले जातात की काळही त्यांना पुसू शकत नाही.

म्हणूनच आज त्या जुन्या दिवाळीची मजा पूर्वी सारखी उरली नसली, तरी तिचा प्रकाश अजूनही विझलेला नाही. तो प्रकाश आपल्या मनाच्या एका शांत अंगणात अजूनही तेवढ्याच प्रेमाने पेटलेला आहे. आणि प्रत्येक दिवाळीत, एखादा दिवा लावताना मन नकळत त्या हरवलेल्या दिवसांकडे पाहत राहते.

काही दिवे तेलाने पेटतात. काही वातीने उजळतात. पण काही दिवे आठवणींनी जिवंत राहतात.
आणि म्हणूनच, काळ कितीही पुढे गेला, माणसं कितीही दूर गेली, तरी आपल्या आठवणींच्या अंगणात अजूनही एक दिवाळी पेटलेली असते.

वीरेंद्र सुधा प्रदिपराव सोनवणे
जळगाव, महाराष्ट्र



आम्ही तेव्हा अपार्टमेंटमध्ये राहत होतो. शेजारच्या बिल्डिंगमध्ये एक वृद्ध महिला राहत असे. साठ-पासष्ठ्च्या आसपास वय असावं. संध्याकाळी मी ऑफिसमधून आलो की ओंकारला घेऊन प्लेग्राउंडला जात असे. तिचंही संध्याकाळचं चालणं नियमित होतं. एक-दोनदा असेच बोलणं झालं आणि त्यातून थोडी ओळख झाली. एक दिवस आम्ही प्लेग्राउंडमधून परत येत होतो आणि तीही तिच्या अपार्टमेंटच्या दारात शिरत होती. तेवढ्यात मागे वळून तिने मला हाक मारली.

"मला तुला काहीतरी द्यायचंय, तुझी हरकत नसेल तर," थोडं संकोचतच तिने विचारलं.

"चालेल की!"

मला वाटलं, ओंकारसाठी काहीतरी चॉकलेट वगैरे असेल.

तेवढ्यात ती दारातून लहान मुलांची एक खुर्ची घेऊन आली. हलकीच, शाबूत, पण थोडी जुनाट वाटत होती. मी विचार करतच होतो, अशी जुनाट वस्तू का देतेय ही? क्षणभर व्यावहारिक विचार आला—जुनी झाली आहे, कुणी घेत नसेल म्हणून देत असेल. पण इतक्या आपुलकीने देतेय, ठेवून घेऊ; काय करायचं ते पुढे बघू. आता तिचं मन नको तोडायला.

"थोडी जुनी आहे. खरंतर खूपच जुनी आहे, १९७२ ची. आता जवळजवळ सगळा रंग उडालाय. हा खिळाही निघतोय. तू थोडी डागडुजी करून वापरू शकतोस."

आणि मग तिने त्या खुर्चीची गोष्ट सांगायला सुरुवात केली.

"सत्तर साली आमचं लग्न झालं आणि एका वर्षाने आमची ऍमी आली. तेव्हा माझ्या नवऱ्याने ही खुर्ची स्वतःच्या हातांनी बनवली. ती बसायला लागली तेव्हा मोठ्या स्टुलावर ही खुर्ची ठेवायचो. आमच्यासोबत डायनिंग टेबलवर बसून ती शाळेतल्या गप्पा सांगत जेवायची."

"माझ्या मुलीचं अख्खं बालपण या खुर्चीत गेलं. पुढे तिला मुलगी झाली. तिच्याही आठवणी या खुर्चीत गुंतल्या होत्या, म्हणून ऍमी ती कोलोरॅडोहून नॉर्थ कॅरोलिनाला घेऊन गेली. हक्काने! म्हणाली, 'माझ्या बाळाला होईल ही खुर्ची.'"

मी ऐकून क्षणभर थक्कच झालो. म्हणायला साधी खुर्ची. पण जवळजवळ पन्नास वर्षांचा इतिहास असलेली, तीन पिढ्यांचा स्पर्श झालेली, आठवणी जपलेलं लाकूड! त्यांच्या हातातली खुर्ची मी माझ्या हातात घेतली.

"आता आमची नात न्यूयॉर्कला एका मोठ्या कंपनीत नोकरी करते. मागच्या वेळी मुलीकडे गेले तेव्हा ती म्हणाली, 'घर आवरायचंय. आम्ही दोघंच असतो. आता थोडी minimalist जीवनशैली ठेवायचीय. ही खुर्ची तू घेऊन जा आणि कुणाला तरी दे. शक्यतो ज्यांच्याकडे लहान मूल आहे त्यांना. आपला वारसा पुढे चालेल.'" वारसा म्हणजे नेहमी जमीन, घर, दागिने किंवा बँकेतले पैसेच असतात असं नाही. कधी कधी साध्या लाकडाच्या खुर्चीतही एखाद्या कुटुंबाची पन्नास वर्षं सामावलेली असतात. त्या खुर्चीचा प्रवास आठवला की आजही गंमत वाटते. कोलोरॅडोच्या एका छोट्या गावात कुणा वडिलांनी आपल्या लहान मुलीसाठी ती हाताने बनवली. त्यांना कुठे माहीत होतं की अनेक वर्षांनी त्यांच्या नातीचेही छोटे पाय त्याच खुर्चीवर विसावतील? आणि पुढे ती हजारो मैलांचा प्रवास करून अर्कान्सास मधल्या एका भारतीय कुटुंबाच्या घरापर्यंत पोहोचेल? वस्तू तीच राहिली. भोवतालचं जग मात्र बदलत गेलं-माणसं, घरं, पत्ते, पिढ्या, देश.

आपण वस्तू एका जागेवरून दुसऱ्या जागी नेत असतो, असं आपल्याला वाटतं. प्रत्यक्षात काही वस्तूच काळाला एका पिढीतून दुसऱ्या पिढीत वाहून नेत असतात. आणि कदाचित याच एका कारणामुळे त्या खुर्चीची किंमत त्या आजीएवढीच मलाही वाटते. माझ्याकडची वेळ संपली की मीही ती कुणाला तरी देईन, तो वारसा पुढे जावा म्हणून. २०११ साली माझी आई गेली. मी तेव्हा अमेरिकेत होतो. तिचं सामान आवरताना एक नक्षीदार ग्लास सापडला. अगदी साधा. बाजारात कदाचित किमतीला काहीच नसलेला. पण मला आठवत असल्यापासून मी तो ग्लास बघत आलो होतो.

आई एकदा म्हणाली होती, लग्न झाल्यापासून, भाड्याच्या एका खोलीत संसार थाटल्यापासून ज्या काही मोजक्या वस्तू तिच्यासोबत होत्या, त्यातलाच तो एक ग्लास होता. आई गेल्यानंतर तो ग्लास हातात घेतला आणि पहिल्यांदाच जाणवलं – माझ्यापेक्षाही जुनं तिचं या ग्लासाशी नातं होतं. तिचं लग्न. तिचा संसार. माझा जन्म. माझं बालपण. या सगळ्यांत तो ग्लास कायम होता. आजही तो हातात घेतला की क्षणभर आई आणि माझ्यामधलं अंतर कमी झाल्यासारखं वाटतं. तिच्या हातांचा हजारो वेळा स्पर्श लाभलेला तो ग्लास आता माझ्या हातात असतो. माणूस जातो. पण त्याच्या स्पर्शाच्या खुणा अशा कुठल्या ना कुठल्या मूर्त स्वरूपात आपल्या आजूबाजूला राहून जातात. आपण आयुष्यभर नवीन गोष्टी मिळवण्यामागे धावत असतो. पण एखाद्या टप्प्यावर जाणवतं, आपल्या सर्वात मौल्यवान वस्तू बहुतेक वेळा आपण विकत घेतलेल्या नसतातच. त्या कुणीतरी आपल्याला दिलेल्या असतात किंवा कुणीतरी मागे ठेवून गेलेल्या असतात.

कदाचित म्हणूनच त्या जुन्या खुर्चीची किंवा आईच्या साध्या ग्लासाची किंमत पैशांत सांगता येत नाही. वस्तूची बाजारातली किंमत काळाबरोबर कमी होत गेली असेल; पण तिच्यात साठलेल्या आठवणींची किंमत मात्र वाढत गेली. वस्तू कदाचित झिजेलही; पण सोबत जुळलेल्या त्यांच्या आठवणी मात्र आपल्याला समृद्ध करतात. वस्तूंनाही स्वतःचं एक आयुष्य असतं. कदाचित म्हणूनच आपण जुन्या वस्तू जपतो. त्यांच्यात माणसाचा थोडासा अंश राहून गेलेला असतो.

ज्यांच्यावर आपण प्रेम करतो, त्यांना कायम जवळ ठेवण्याची सोय निसर्गाने आपल्याला दिलेली नाही. माणसाला जावंच लागतं. म्हणून कदाचित आपण त्याने स्पर्श केलेल्या गोष्टी धरून ठेवतो.

आज ती खुर्ची पाहिली की मला केवळ ओंकारचं बालपण दिसत नाही. एक अनोळखी अमेरिकन माणूस दिसतो, आपल्या मुलीसाठी लाकडातून खुर्ची घडवताना. त्याची मुलगी, तिची मुलगी, त्या वृद्ध स्त्रीचा चेहरा आणि त्या साखळीत कुठेतरी आमचं कुटुंबही येऊन बसलेलं दिसतं.
कदाचित उद्या माझ्या मुलांना आईच्या ग्लासाचं माझ्याइतकं महत्त्व वाटणारही नाही. आणि ते ठीक आहे. प्रत्येक पिढी स्वतःच्या आठवणी निर्माण करते. माणसं जातात. घरं बदलतात. देश बदलतात. काळ मात्र पुढे जात राहतो. आणि त्या वाहत्या काळात एखादी रंग उडालेली खुर्ची, एखादा नक्षीदार ग्लास शांतपणे एका पिढीचा हात दुसऱ्या पिढीच्या हातात देत राहतो.
आणि कदाचित म्हणूनच काही जुन्या वस्तू फेकताना हात थांबतो. कारण त्या क्षणी आपण केवळ लाकूड किंवा वस्तू फेकत नसतो.
कुणाच्यातरी जिवंतपणाचा थोडासा अंश आपण फेकत असतो.
Haruki Murakami ने Kafka on the Shore मध्ये म्हटलं आहे,
"There are some things we can never assign to oblivion, memories we can never rub away."
कदाचित काही माणसं अशीच कायमची निघून जात नाहीत.
ती फक्त आठवणींमध्ये-वस्तूंमध्ये आपलं वास्तव्य बदलतात.

उमेश वानखेडे
लिट्ल रॉक, अर्कान्सास

मनात म्हटलं

प्रेम करून पहावं !
प्रेम सागरात
डुंबून उरावं !!
असावी आपुली प्रेयसी
जिच्या डोळ्यात बघावं !
घर करून तिच्या
हृदयात रहावं !!
सांजवेळी तिज संग
फिरायला जावं !
हात हातात घेऊनी
प्रेमगीत गावं !!
प्रेम तुजवर करतो
तिला सांगावं !
हृदय काढुनी आपलं
तिच्या हातात द्यावं !!
हृदयात त्या माझ्या
तिने दोन अश्रू ढाळावं !
हृदयाने ही माझ्या
त्या अश्रूंना साठवावं !!
पण प्रेम करावे कसे
मला नाही ना हो ठावं !
उत्तर या प्रश्नाचे
मी कुणाकडे शोधावं !!

राहुल ददगाळे
मिल्वॉकी, विस्कॉन्सिन

पुन्हा नव्याने:

कशास भिजावी सदा पापणी,
अन् यावे कढ ते आठवणींचे.
मान्य करुया वास्तव कटू ,आणि,
पुन्हा पेलूया ओझे संसाराचे.

आपणच भरले बळ त्या पंखात,
आपणच विस्तारले क्षितीज तयांचे.
आता पाखरे उडाली आभाळात,
पंख तयांचे कशास ओढायाचे?

सांज सोनेरी आपल्या आयुष्याची,
सोनसळी उन्हात न्हाउन घेउयात.
असाल तेथे रहा सुखे ,अभिमानाने,
मनापासूनि आशिर्वचन पाठवूयात.

आली परतूनी की म्हणूयात आपुली,
न पेक्षा अश्राप अनाथांस जीव लावू.
आसवे पुसून कोणाच्या डोळ्यातली,
शक्य तेवढा अंधार दूर करुनी जाउ.

जग हे सुंदर आहे, ते 'जगूनी' जाऊया,
नाही जे, विचार त्याचा नकोच मनी.
जगलो त्यांच्यासाठी,आता आपले जगूया
विनवू देवाला, कर शेवट गोड म्हणूनी.

डॉ.अनिल रौंधे
पुणे, महाराष्ट्र

बापाचं घर

बापाने बांधलेल्या मातीच्या भिंती
अन् डोक्यावरचं छपराचं घर
लेकरांनी पाडून
उभ्या केल्या विटा-सिमेंटच्या भिंती
आणि स्लॅबचा मनोरा भव्य.
लेकरांनी इंच-इंच जागा मोजून
वाटणी करून टाकली घराची.
बापाच्या हयातीत आणलेल्या
वस्तू-सामान मोडकळीस आणून
भंगारात देऊन टाकल्या
निष्ठुरपणे चिल्लर दरात.
बापाचा फोटो मात्र ठेवून घेतला
वर्षश्राद्धाला
व्हॉट्सॲप स्टेटस म्हणून लावता यावा म्हणून.
मेलेल्या बापाचं अस्तित्व
उरलं उरलं नाही घरात;
नवनिर्मितीचा अभिनिवेश
लेकरांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतोय पुराव्यासह.
सासरी गेलेल्या लेकीला खबर मिळाली,
तेव्हा ती सुसाट धावत येते
वावटळीच्या पायांनी
बापाच्या आठवणीचा संसार एकवटाया
तिला कोणत्याच खुणा दिसत नाहीत
बापाच्या अस्तित्वाच्या
घरात नव्या .
ती अबोली
घरातल्या घडमाचीवर
बाप पांघरायचा
ती गोधडी घेऊन निघून जाते
डोळ्यातून झिरपणाऱ्या आसवांसह .

अरविंदा भामरे
शिरपूर,महाराष्ट्र



झेंडूची फुलं

"दादा! ह्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आपण तुमची बाग करायची बरं का! माझा मुलगा पार्थ आणि त्याचा मित्र आर्य पण आपल्याला मदत करतील! सोबत मी बागेची काही डिझाइन्स जोडली आहेत. ती पहा आणि सांगा मला कुठलं डिझाइन करायचं ते!" आमचा तरुण मित्र अमित घोलम ह्याने 'आमची बाग' ह्या विषयाची काहीही पार्श्वभूमी नसताना अचानक हा संदेश पाठवला आणि मी अवाक झालो! त्याने जोडलेली बागांची रेखाटनं पाहिली आणि मी अजूनच थक्क झालो! मनातल्या मनात म्हटलं, हे शक्य तरी आहे का? हे तर सगळे नंदनवनाचे तुकडे दिसताहेत! आपली पुढची बाग म्हणजे सध्या काट्यांच्या झुडपांनी भरून गेली होती. त्या बागेकडे काही ना काही कारणांमुळे आमचं चांगली दोन-चार वर्षं दुर्लक्ष झालं होतं. त्यामुळे आधी लावलेली चांगली झाडं वेडीवाकडी वाढली होती. त्यात काट्यांची रोपं कुठून उगवली होती कुणास ठाऊक! शिवाय तण आणि गवतही वाढलं होतं. हे सगळं काढून टाकून अमितच्या स्वप्नातली बाग तिथे निर्माण करायची, हे एक दिव्यच वाटत होतं!

सुमारे बावीस वर्षांपूर्वी ह्या घरात आम्ही राहायला आलो, तेव्हा ही बागेची अवस्था अशीच वाईट होती. घराची आधीची मालकीणबाई एकटीच राहायची. शिवाय ती वैमानिक होती, त्यामुळे बराच वेळ घरी राहायचीच नाही. त्यामुळे तिने बागेकडे काही लक्ष दिलं नव्हतं. तिची कॅलिफोर्नियात बदली झाली म्हणून तिने हे घर आम्हाला विकलं आणि मी नव्या घरमालकाच्या उत्साहाने बागकामाला लागलो!

मी हिला म्हणालो, "मी तुझ्यासाठी ताजमहाल काही बांधू शकत नाही; पण त्याच्यासमोर असलेली एक मस्त गुलाबांची बाग — रोज गार्डन— मी तुझ्यासाठी उभी करतो!

तेव्हा मुलं घरी होती. त्यांच्या मदतीने बागेची साफसफाई करून मी मस्तपैकी तीस रंगीबेरंगी कलमी गुलाब तिथे लावले! पहिली एक-दोन वर्षं दृष्ट लागतील असे गुलाब तिथे लागले. पण पुढे पिट्सबर्गच्या कडाक्याच्या थंडीत ती झाडं मरत गेली. त्यांना वाचवण्याचे मी खूप प्रयत्न केले, पण ते नाहीच जमलं. माझा अगदी हिरमोड झाला आणि बागेची दुर्दशा व्हायला लागली. मग काही वर्षांनी त्या बागेची अवस्था मला बघवली नाही आणि मी व्यावसायिक माळी कामाला लावला. त्याने भरमसाठ पैसे घेतले आणि बाग नीटनेटकी करून दिली. तिथे आम्ही पिओनी, अझेलिया, डॅफोडिल्स अशा झाडांच्या रांगा लावल्या. ही झाडं थंडीत कायमस्वरूपी जगतात आणि हरणं खात नाहीत, असा अभ्यास करून ठेवलेला होता.

आमच्या बागेत हरणं, ससे, खारी, ग्राउंडहॉग असे महाशत्रू आम्हाला सतत त्रास देत असतात. हे प्राणी ट्यूलिपचे कंद कधी उकरून, तर कधी जमिनीवर आलेल्या सुंदर कळ्या पटकन मटकावून टाकतात. ते बघून दर वर्षी वसंत ऋतूत आमचा हार्टब्रेक होतो. त्यामुळेही दुसऱ्यांदा केलेली बागही हळूहळू अस्ताव्यस्त होत चालली. त्यालाही पाच-सहा वर्षं होऊन गेली आणि सध्याची परिस्थिती येऊन ठेपली होती.

अमितच्या बागेच्या प्रस्तावाच्या मी प्रेमातच पडलो आणि पुन्हा एकदा नव्या बागेचा श्रीगणेशा केला. ह्या वेळी मी सगळी नवी बागकामाची पॉवर टूल्स खरेदी केली आणि जून-जुलै महिन्यात जमेल तितके दिवस रोज संध्याकाळी ऑफिसचं काम आटोपल्यावर आम्ही चौघे कामाला लागलो. अमितची पत्नी सौ. स्मिता आणि माझी पत्नी सौ. अनघाही त्यांना जमेल तेव्हा बागेत कामाला यायच्या.

मुलांच्या शाळा संपल्या होत्या. उन्हाळा असल्यामुळे दिवस मोठा होता, म्हणून संध्याकाळी साडेपाच ते नऊ पर्यंत आम्ही काम करायचो. पार्थ घोलम आणि आर्य राऊत ह्या तरुण मुलांनीसुद्धा बागकामाचा, विशेषतः पॉवर टूल्स शिकून ती वापरण्याचा आनंद घेतला!

गावोगावच्या युवा कार्यक्रमांनी ह्याची नोंद जरूर घ्यावी. अशा उपक्रमांतून तरुण मुलांना थेट कार्यानुभव तर मिळतोच; पण थोडी 'खरी कमाई'ही होते. असा दुहेरी फायदा ह्यात आहे. त्यांच्या डोळ्यांसमोर बाग हळूहळू आकार घेताना बघून मुलं खुश होत होती. आमचं दिवसाचं आखलेलं काम पूर्ण होईपर्यंत अनघा मस्त गरमागरम जेवण करायची आणि 'आज काय काम झालं, उद्या काय काम करायचं' ह्याच्या गप्पा मारत आम्ही जेवण करायचो. खूप दिवसांनी एकत्र मोठ्या कुटुंबात राहायचा आनंद आम्हा सगळ्यांना मिळाला!

आधी बागेत असलेली सगळी रानटी झाडं आणि त्यांची मुळं धरलेला मातीचा थर काढून टाकला. त्यावर नवी माती आणि खतं पसरली. मग त्यावर तण पुन्हा उगवू नये म्हणून एक कागद पसरला. त्यावर लाकडाच्या कपच्या (mulch) पसरल्या. मग त्यावर नवी झाडं लावली.

आमचे शेजारी-पाजारी रोज थांबून कौतुकाने आमच्या बागेची प्रगती बघायचे, आमचं कौतुक करायचे! आमचा एक अमेरिकन डॉक्टर शेजारी तर एकदा थांबून खिन्नपणे म्हणाला, "दुर्दैवाने असं हाताने काम करायची संस्कृती अमेरिकेतून लुप्त होत चालली आहे. माझे वडील लहानपणी मला नेहमी म्हणायचे, 'मुला! बाकी काही शिकलास नाहीस तरी चालेल; पण ही चार अक्षरं मात्र जरूर W O R K! कुठे गेली ही शिकवण ह्या जमान्यात, कुणास ठाऊक!"

'सेवा' (SEWA International) ह्या धर्मादायी संस्थेच्या निधी संकलनासाठी ते विकत असलेली झेंडूची रोपं मी विकत घेतली आणि बागेच्या रस्त्याच्या कडेला लावली. ही रोपं जोमाने वाढली आणि त्यांचा ताटवा आता मस्त फुलला आहे! पदपथावर हे सोन्याचे गेंद ओसंडले आहेत!

भारतात झेंडूच्या फुलांचा घरांच्या तोरणांसाठी आणि खंडेनवमीला यंत्रांची आणि वाहनांची पूजा करायला वापर केला जातो; पण थोरामोठ्यांच्या गळ्यात घालायला किंवा वरमाला करायला मात्र गुलछडी किंवा गुलाब वापरतात. मोगरा, जाई-जुई, बकुळ, प्राजक्त ह्यांसारख्या फुलांना कवितेत स्थान मिळतं; पण झेंडूची मात्र साहित्यात सुद्धा उपेक्षाच होते!

त्यामुळे आपल्या संस्कृतीत झेंडूच्या फुलांचं महत्त्व दुय्यमच आहे. म्हणून आचार्य अत्रेंनी त्यांच्या विडंबन कवितांचा संग्रह जेव्हा प्रसिद्ध केला, तेव्हा त्याचं नाव त्यांनी 'झेंडूची फुले!' ठेवलं. ह्या मागची भूमिका विशद करताना ते म्हणाले:

झेंडूची रसिका, फुले जमवुनी देतो तुझ्या ही करी,
घे प्रेमे अथवा पदी तुडव जा! जे वाटते ते करी!
रागाने चुरगाळलीस जरि ही पुष्पे कधी त्वां बरे–
केव्हाही विसरू नकोस तळिचे खाण्या परि खोबरे!
ह्या अर्पण पत्रिकेत अत्रे सूचित करतात की मूळ कवितांचं महत्त्व कमी न करता त्यांनी केलेलं हे विडंबनरूपी काव्य दुय्यम दर्जाच्या
झेंडूच्या फुलांसम जरी रसिकांनी मानलं, तरीही त्या फुलांच्या तळाशी असलेलं खोबरं, उर्फ त्यातला संदेश, मथितार्थ त्यांनी ध्यानात घ्यावा!
पण आमच्या बागेत झकास फुललेल्या, प्रसन्न, सुवर्णी झेंडूच्या फुलांकडे बघून मला त्यांच्यावर झालेला हा अन्याय दूर करावा असं वाटलं!
म्हणून मला असं म्हणावसं वाटतं:
झेंडूची मित्रांनो, फुले जमवूनी देतो ही तुमच्या करी,
ठेवावी छान मेजावरी, शोभिवंत होवोत तुमच्या घरी!
रुजले, जपले, वाढले रोप, करुनि 'सेवा', मिळाला धडा,
भूमातेने भरून दिधला आम्हा सुवर्णा चा मंगल घडा!

'बृहन्महाराष्ट्रवृत्ता'च्या सगळ्या वाचकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना ह्या दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा!
आमच्या बागेतली निसर्गाने दिलेली, पानोपानी फुललेली ही सौंदर्य, आनंद आणि प्रसन्नतेची देणगी सगळ्यांच्या मनोमनी पोहोचावी, ही प्रार्थना!

–डॉ. प्रियदर्शन मनोहर,
पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया



नऊवारीचा उबदार पदर



लहानपणापासून आजोळी आणि गावाला जाणे-येणे असल्यामुळे लांबसडक नऊवारी पातळ नेसणाऱ्या गावाकडच्या स्त्रिया मला अगदी जवळून अनुभवता आल्या. आजी, मामी, मावशी, काकी-अशा सर्वच जणींना मी लहानपणापासून नऊवारीच्या रुबाबदार पेहरावात पाहत आले आहे. आजीच्या सहवासात खूप वेळ घालवल्यामुळे त्या वस्त्राचा जिव्हाळा, तिची ऊब, मऊपणा, वात्सल्य आणि एक प्रकारचा आपुलकीचा स्पर्श मला मनापासून भुरळ पाडून गेला.

विशेषतः १९८० आणि १९९० च्या दशकांत आजीला लुगड्यांची खूप आवड होती. रोजच्या वापरासाठी दोन लुगडी असायची आणि फार तर तीन-चार अतिरिक्त असायची. त्यांपैकी दोन घरात कुठेतरी खुंटीवर टांगलेली असायची, तर अतिशय ठेवणीतली साडी मात्र पेटीत कुलूपबंद असायची. आजीची ती जुनी पेटी (संदूक) म्हणजे माझ्यासाठी एक मोठे गूढ आणि खजिनाच होती! मी कधी तिच्या परवानगीशिवाय ती उघडायचा प्रयत्न केला नाही; पण त्यात साड्या, ठेवणीतले दागिने, चांदीचे पैंजण, वाटीचे मंगळसूत्र, साखरेचा खडा, जुन्या आठवणी, खोबरे आणि अगदी बासमती तांदूळही पाहिले आहेत. घरात लग्नसमारंभ असला की आजीचा तो खजिना आवर्जून उघडला जायचा. मग त्यातून हिरव्यागार रंगाची नवीकोरी किंवा तांब्याने कडक इस्त्री केलेली साडी बाहेर निघायची. कितीही साड्या असल्या, तरी त्या गडद हिरव्या साडीचे छोटे छोटे बुट्टे आणि नक्षीदार पदर आजही तितकेच उठावदार वाटतात.

आजीची रूपसज्जा अतिशय साधी आणि सात्त्विक होती. चेहरा फक्त साबणाने धुवायचा; पावडरचा कसलाही प्रकार नसायचा. कपाळावर आधीच गोंदलेले असायचे आणि त्यावर काडीच्या किंवा मधल्या बोटाच्या साहाय्याने ती लालचुटूक कुंकू लावायची. आरसा नसताना कपाळाचा मध्य कसा शोधायचा? तर तिची सोपी पद्धत होती—नाकाच्या शेंड्यावरून बोट सरळ वर कपाळापर्यंत न्यायचे आणि तिथे मध्यबिंदू निश्चित करायचा! मग त्या मध्यबिंदूभोवती अंदाजे १.५ ते २ सेंमी व्यासाचे एक गोल, गरगरीत वर्तुळ रेखायचे. तिचे कुंकू दिवसभर जसेच्या तसे राहायचे. केसांचे म्हणाल, तर 'पॅराशूट'चे खोबरेल तेल लावून, मधोमध सरळ भांग पाडून केस विंचरायचे. शेवटी रिबनने बांधून जो अंबाडा केला जायचा, त्याला ती 'बुचडा' म्हणायची. मग त्यावरून तिच्या नऊवारीचा पदर यायचा. पदर म्हणजे तिची खरी शान होती; तो कधीही डोक्यावरून ढळायचा नाही. माझ्यासाठी तर तो डोक्यावरचा पदर रडू आले की लगेच खाली यायचा आणि माझे अश्रू पुसले जायचे, केस सुधारले जायचे. उन्हात सावली म्हणून, तर कधी कुशीत घेऊन पांघरूण म्हणूनही त्याचा वापर व्हायचा.

साडी खूप जुनी झाली की नऊवारीची गोधडी शिवायची. आजीबरोबर बसून मी तेही काम केले आहे. चार कोपऱ्यांवर दगड ठेवून, पसारा मांडून, दोरीने गोधडी शिवायला मी मदत करायचे. ती गोधडी मस्त रंगीबेरंगी दिसायची. तिच्या पेहरावातली आणखी एक रंजक गोष्ट म्हणजे तिची नथ आणि कानातली छोटी, फुलांच्या आकाराची पारंपरिक कुंडले! गळ्यात काळ्या पोतीत गुंफलेले सोन्याचे डोरले आणि हातात हिरवा चुडा व सोन्याच्या बांगड्या शोभून दिसायच्या. कामात असताना तिच्या हातातल्या बांगड्यांची होणारी ती मंद किणकिण ऐकणे हा आमच्या दैनंदिन आयुष्याचा एक गोड भाग बनला होता.

त्या काळात प्रत्येक स्त्रीची स्वतःची एक खास ओळख असायची. काही स्त्रियांना अगदी साध्या, प्लेन साड्या नेसायला आवडायच्या, तर काही जणींना काठपदराच्या किंवा त्या काळातील नक्षीदार साड्यांची भुरळ असायची. कोणाची साडी नेसण्याची पद्धत कडक असायची, तर कोणाचा पदर मऊ असायचा. काही जणी नाकात नाजूक नथ घालायच्या, तर काही स्त्रिया मोती आणि लाल माणकांनी सजलेली भव्य, मोठी नथ मोठ्या ऐटीत मिरवायच्या!

चहा पिताना किंवा जेवताना त्या मोठी नथ कशी सांभाळायच्या, याची मला खूप गंमत वाटायची.

आजची आपली पिढी घरी आली की लगेच टी-शर्ट, पँट किंवा सोयीस्कर आधुनिक कपड्यांमध्ये बदलते. पण ती एक पिढी होती, जिने लहानपणी लग्न झाल्यापासून आयुष्यभर दररोज तोच पारंपरिक पेहराव केला. आमची स्टाईल आणि पसंती बदलत राहते; पण त्यांनी पूर्ण आयुष्य एकाच पेहरावात घालवले -फक्त वयानुसार साडीचा रंग बदलत गेला. त्या मऊ लुगड्यांमधली ऊब मात्र कायम तीच राहिली. तो प्रेमळपणा माझ्या मनात इतका खोलवर रुजला आहे की, मला मुलगी झाल्यानंतर मीही तशाच मऊ साड्या शोधून काढून तिची 'धुपटी' म्हणून वापरल्या.

त्या काळातील या स्त्रियांचे आयुष्य म्हणजे केवळ गृहिणीपद नव्हते, तर त्या संपूर्ण घराचा भक्कम कणा होत्या. सकाळी पहाटे चार वाजता उठून जात्यावर धान्य दळण्यापासून ते विहिरीवरून हंडे भरून पाणी आणण्यापर्यंतची कष्टाची कामे त्या याच नऊवारी साडीत अत्यंत सहजतेने करायच्या. शेतात राबणे, गुरांचे दूध काढणे, शेणखत करणे, चुलीवर स्वयंपाक करणे आणि पाहुण्यारावळ्यांनी भरलेल्या मोठ्या एकत्र कुटुंबाचा स्वयंपाक लीलया सांभाळणे-ही त्यांची रोजची दिनचर्या असायची. विशेष म्हणजे, इतका शारीरिक त्रास आणि कष्ट असूनही त्यांच्या चेहऱ्यावर कधी त्रागा किंवा थकवा दिसला नाही. अंगावरची नऊवारी साडी कसलीही अडचण न ठरता त्यांच्या प्रत्येक कामात एका साथीदारासारखी त्यांच्यासोबत असायची.

अशा समृद्ध पिढीतील लोक आता खूप कमी उरले आहेत. आता फक्त ग्रामीण भागात ५०-६० वर्षांवरील काहीच बायका अशा पेहरावात दिसतील. नऊवारी आज पूर्णपणे नाहीशी झालेली नाही, पण ती रोजच्या जगण्यातून हळूहळू खास प्रसंगांपुरती सीमित झाली आहे. नऊवारी हा प्रकार आता बहुतांश केवळ फॅशन किंवा सणावारापुरता उरला आहे. बाजारात तिचे अनेक आधुनिक प्रकार येतात आणि ते दिसायलाही छान वाटतात; पण आम्ही ते केवळ पाच-सहा तासांपुरतेच नेसू शकतो. ज्यांनी हा पेहराव आयुष्यभर सहजतेने आणि अभिमानाने सांभाळला, त्यांना मनापासून साष्टांग प्रणाम! त्यांची ही पोकळी पुढच्या प्रत्येक पिढीला कायम जाणवत राहील.

अपर्णा भूषण काळे
डॅलस, टेक्सास

पोळीचा लाडू

सकाळी सकाळी लवकर उठल्यावर खिडकी उघडून आजकाल उजेडाला आत खेचून आणावं लागतं. थंडी वाढू लागल्यापासून सूर्य दूर दूर जात चालल्याची भावना वाढत जाते. आकुंचत होत जाणारा दिवस आणि हळूहळू सैलावत पसरत जाणारी रात्र, दोन्ही आळसाला खतपाणी घालतात. दोन्ही डोळ्यांवर जडजड गच्च बसलेली झोपेची मिठी सोडवत प्राची उठली आणि तिने पडदे सरकवले. तोंड धुवून परत येईपर्यंत फोन मधला गजर वाजू लागला होता. आजकाल डोक्यातला गजर वाजून वेळेच्या पाच मिनिटं आधीच जाग येते. नवीनच काहीतरी झालंय. एरवी चुकून कधी लवकर उठायची सवय नव्हती आणि नकोही होती. लहानपणी, सकाळची शाळा होती तोपर्यंत एकही दिवस असा गेला नाही की घरात आरडाओरडा, धावपळ आणि गडबड झाली नाही. अर्धवट झोपेतच शाळा, कॉलेज आणि क्लासेस केले तिनं! एवढंच काय, अगदी लग्न झाल्यावरही सासरच्या लोकांना आधीच सगळ्यांनी सांगून ठेवलं होतं—ही हळूबाई काही लवकर उठायची नाही की आवरायची ही नाही!

तनय लहान होता तेव्हा त्याला सांभाळताना रात्रभर जागायची तयारी असे तिची; पण पहाटे मात्र अमितच्या हाती देऊन ती झोपून जायची.

जिन्यावरून उतरून खाली येते तर तनय उठून पुस्तक वाचत बसलेला. तिला रोजचं दृश्य बघून अंगवळणी पडलं होतं; पण बोलायचीही सवय तशीच.

ती झटकन म्हणाली, "अरे तनू, कशाला रे इतक्या लवकर उठून बसतोस? अजून उजाडलं सुद्धा नाहीये."

"ओह, कमॉन आई! इट्स ६.३० ऑलरेडी. रोज रोज काय तेच तेच म्हणतेस मला. मला येतं लवकर उठायला."

तो ही नेहमीसारखं तेच वाक्य बोलून रिकामा झाला. दिवसाची सुरुवात झाली!

मला झोपायला मिळालं असतं ना... असं तिला वाटून गेलं.

भारतातल्या सकाळी जरा जागं करणाऱ्या तरी असतात. उजेड असतो, ऊब असते, गजबज, पूजा-भूपाळीचे आवाज, चहा-कॉफीचे, धूप-अगरबत्तीचे वास... इथे अमेरिकेत काय, नुसती शांतता. सकाळ पहाटेच्या दुलईतून बाहेरच यायला तयार नाही.

अशा गजबजलेल्या सकाळी आपल्याला उठायला जमलं नाही कधी आणि आपला लेक टक्क उठून बसतो, थंडीचा! भरभर सगळं आवरून, डबा तयार करून, तनयसाठी दूध-नाश्ता ठेवून वर जाऊन ती तयार झाली. खाली येऊन बघतेतर मुलगा शाळेला जायला तयार; पण नेहमीसारखा शॉर्ट्स मध्ये.

"तनय, जा जाऊन फुलपँट घालून ये," तिने शांतपणे सांगितलं.

"आई, प्लिज! इट्स जस्ट ४१ डिग्रीज."

तिच्या डोक्यात गणित सुरू झालं. तेरा वर्षं झाली, तरीही अजून सेल्सिअसमध्ये मापायची सवय सुटत नाही...

"अरे बाबा, फार कमी आहे ते. आजारी पडायचं आहे का? जा, चेंज करून ये आणि स्वेटशर्ट सुद्ध घालून ये."

"आई, नको ना प्लिज... माझ्या लॉकरमध्ये जागा नसते ठेवायला आणि स्कूलमध्ये हीटर चालू असतो. उकडतं मला."

"अरे सोन्या, जाई पर्यंत बर्फाचा पुतळा व्हायचंय का?"

तिचा पारा हळूहळू चढत चालला होता.

"आई, लेट मी गो... मला थंडी वाजत नाही आहे."

तो ही ऐकायला तयार नव्हता.

"तनय, आत्ताच्या आता चेंज करून ये, नाहीतर जाऊ नकोस शाळेत आज," ती गरजली.

"ठीके, मग मी जात नाही शाळेत," तो शांतपणे म्हणाला.

तो दारातून बाहेर गेला, तशी ती थोडी निवांत झाली.

जॅकेट घातलं नाही ते नाहीच; कमीतकमी पँट बदलून गेला हे ही थोडं नाही.

आपल्या आईबरोबर आपण कधी वाद घातलाय? एखादा शब्द उणा झाला नाही तर ऐकून घेऊन गप्प राहण्याशिवाय इलाज नसे. वर आणि चुकून काही पटलं नाही, तरीही अपराधी वाटून मन खाणार आपलं आपल्याला. याला जमतं कसं इतकं तटस्थ राहून वाद घालणं?

विचारांच्या नादात दूध उतूगेलं आणि तिने पटकन गॅस बंद केला. कामावर बसण्याआधी काहीतरी खाऊन घ्यावं म्हणून तिने फ्रीज उघडला. कालच्या पाच पोळ्या उरल्या होत्या; पण आज जर पुन्हा फोडणीची पोळी केली तर सत्यजितने टोमणे मारून हैराण केलं असतं. तिला अचानक पोळीच्या लाडूची आठवण झाली. किती वेळा शाळेतून आल्यावर खायला तिच्या आवडीचा नाश्ता होता तो. भरपूर दमून आलं की, बशीत दोन पोळीचे लाडू मिळत. हात धुवायचं भानही नसे; मग आजी रागवायची. कसे बसे हात धुवून यायचं आणि बसून लाडू फस्त करायचे. किती वेळा तरी आजी लाडू करून ठेवायची आणि फिरायला जायची. प्राची तिच्यासाठी सुबक अक्षरात "लाडू मस्त झालेत, मला खूप खूप आवडले" अशी छोटीशी थँक यू नोट लिहून ठेवायची.

आजी गेली तेव्हा तिच्या सामानात प्राचीच्या या चिवुया जपून ठेवलेल्या सापडल्या, तेव्हा प्राची खूप रडली.

बाकीच्या मुली डब्यात तूप-साखर-पोळी आणत; तिला कधीच आवडली नाही ती.

"नाकझाडी आहे," आजी म्हणायची, "पोरीला खमंग-टमंग लागतं. पोळीचा लाडू नुसताच खायचा नाही. खोबरं, खसखस, वेलची घालून सजवावा लागतो, तेव्हा महाराणी खाणार!"

आजीला आपणही रेसिपी विचारली नाहीना...

तिनं अंदाजानेच लाडू करायला घेतले. पोळी मिक्सरवर भरड करून, खोबरं-खसखस भाजून घेतलं. खमंग सुवास पसरला आणि अवघ्या दहा मिनिटांत लाडू तयार. खायला घेणार तेवढ्यात फोन वाजला. बुधवारच्या मीटिंगचं रिमाइंडर होतं. तिला अचानक लक्षात आलं-आज बुधवार आणि तनय इन्स्ट्रुमेंट घेऊन गेला नाही शाळेला!

ती तशीच उठली. स्वेटर आणि जॅकेटचे लेयर्स चढवून इन्स्ट्रुमेंट शोधायला त्याच्या खोलीत गेली. आता अर्ध्या तासात ते शोधून, शाळेत पोहोचवून, मीटिंगसाठी घरी परत हजर होणं कसं जमवणार? सत्यजित रात्रीचं काम संपवून पहाटे कधीतरी झोपला असणार. त्यालाही उठवता येणार नाही.

तनयच्या खोलीतला पसारा पाहून ती खवळली. अर्धवट डाव सोडलेला बुद्धिबळाचा सेट, कराटेचा बेल्ट, पुस्तकं –सगळं तिथेच. कोपऱ्यातल्या कपड्यांच्या ढिगाखाली तिला इन्स्ट्रुमेंट सापडलं. घाईघाईत गाडीत बसून तिने शाळेकडे गाडी वळवली. किती धांदरट आहे हा मुलगा...

काय करणार, पण?

पोहोचल्यावर तिने बेल वाजवली. शाळेच्या हेल्परने तनयला बोलावलं. दाराशी तिला पाहून तो म्हणाला, "आई, इट वॉज नॉट नीडेड. मला टीचरनी स्पेअर इन्स्ट्रुमेंट दिलं असतं... एनी वे, थँक्स..." काहीही न बोलता ती तिथून निघाली. मनात राग खदखदत होता. आपण कसे होतो याच्या वयाला?

तिला आठवलं. अत्यंत नीटनेटकी, टापटीप राहणारी, वस्तू जपून ठेवणारी आणि लाजरी-बुजरी, अगदी संवेदनशील मुलगी. मग हा का असा?

आपलाच आहेना हा? काहीच कसं आपल्यातलं चांगलं आलं नाही यात? डोळ्यात हळूहळू रागाने पाणी यायला लागलं...

घरी पोहोचली आणि ती झटकन लॅपटॉप घेऊन बसली. मीटिंग झाली आणि त्यात तिच्याच हातून झालेला एक प्रॉब्लेम डिस्कस झाला. आता निस्तरण्याशिवाय इलाज नव्हता. सगळं सोडून ती काम करत राहिली. दुपारपर्यंत जी अडकली ती अडकलीच. त्यात काहीच करायला वेळ मिळाला नाही. सत्यजित उठून, आवरून, जेवून बाहेरही गेला; पण तिचं काम संपेचना. सगळं उरकून, निस्तरून पाहतेतर दुपारचेसाडेतीन वाजलेले.

"अरेच्या! इतका वेळ आपण बसून होतो काम करत!" पोटातली भूक आता जाणवली. झटकन उठून ती खाली आली. स्वयंपाकघरात पाहतेतो टेबलवर ठेवलेली लाडवाची बशी रिकामी आणि डब्यातले ही लाडू कमी दिसले. बशीच्या शेजारी एक नोट लिहिलेली होती.

The ladus are really delish... I loved them. Going out to play with friends.

तनयचं सुबक हस्ताक्षर! तिने पटकन एक लाडू तोंडात टाकला आणि डोळ्यातलं पाणी पुसून हसली. जिभेवर रेंगाळणारा गोडवा नक्की खमंग लाडवाचा की या चिठ्ठीचा, कोण जाणे! ही चिठ्ठी ती अगदी जपून ठेवणार होती.

प्राजक्ता करंबेळकर
चेरी हिल, न्यू जर्सी

POW – प्रिझनर ऑफ वॉर

व्हिएतनाम मेमोरियलसमोर उभा राहून मी ५८,००० नावांकडे पाहत होतो. अमेरिकेच्या इतिहासातले हे एक काळे पान. १९५५ साली सुरू झालेले हे युद्ध १९७५ साली जेमतेम संपले. या वीस वर्षांच्या काळात अमेरिकेच्या जनतेत दोन भाग पडले. त्यातून जन्माला आलेली हॅनॉई जेन, हॅनॉई हिल्टन आणि प्रसिद्ध संगीत नाटक मिस सायगॉन. या युद्धामुळे मिश्रवर्णीय कुटुंबांत जन्माला आलेली मुले आणि त्यांचे प्रश्न... असे अनेक विचार माझ्या मनात आले. पण त्यापेक्षा जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक नाव–जे मी शोधत होतो. काळ्याभोर ग्रॅनाइटवर कोरलेली नावे पाहताना माझ्या मनात विचार आला–आपले नाव त्यात नाही, ही निव्वळ नशिबाची गोष्ट आहे. ५८,००० शिपाई या युद्धात गेले आणि त्यातले बहुतेक सारेच तरुण होते; काही तर विशीच्या आतले.

Andrew James Adams, III. मी ते नाव शोधत होतो आणि अखेर मला ते दिसले. ते नाव पाहताना अंगावर एक शहारा आला. ह्याच्या मृत्यूस कारणीभूत कोण? आणि माझे मन अनेक वर्षे मागे गेले. मिलिटरीत दाखल झाल्यावर अनेक लोकांशी ओळख होते आणि काहींशी अगदी जवळची मैत्रीही होते. काही ओळखी टिकतात आणि काही विसरल्या जातात. पण फ्रंटला, म्हणजे युद्धाच्या आघाडीवर झालेल्या मैत्रीची गोष्ट निराळी असते. आपले आयुष्य केव्हा संपणार, याचा अंदाज नसतो. आज आहे तर उद्या नाही; आणि उद्या असलो तरी हातापायांना धड असेल की नाही, याचा भरवसा नाही. त्यामुळे जगायचे ते फक्त 'त्या त्या' क्षणासाठी–कल हो न हो. "यावज्जीवेत्सुखं जीवेत, ऋणं कृत्वा घृतं पिबेत। भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः"

म्हणजे सुखात जगा, कर्ज करून तूप प्या–म्हणजे आज मजा करा; उद्याचे कोणी पाहिले आहे! चार्वाकाने सांगितलेल्या या विचारांसारखीच वृत्ती होते आणि यात कोणालाच दोष देता येत नाही. त्यामुळे आपल्या खांद्याला खांदा लावून लढणारेच आपले जानी दोस्त होतात आणि आधार होतात. ज्यांच्याबरोबर आपण २४ तास असतो आणि जे आपला जीव वाचवू शकतात, तेच आपले खरे मित्र बनतात. तर त्या दिवशी मी माझ्या ऑफिसमध्ये बसलो होतो. अर्थात, हे ऑफिस होते व्हिएतनाममध्ये. आणि फोन वाजला. युद्धाला कंटाळून पळून गेलेला एक शिपाई परत पकडला गेला होता. आता त्याला पकडून जेलमध्ये ठेवायचे म्हणजे आणखी एक काम. AWOL – Absent Without Leave- एक प्रकार. म्हणजे कोणाला न सांगता, परवानगी न घेता निघून जाणे; पण यात परत यायचा विचार असतो.

DESERTER– म्हणजे मिलिटरी सोडून पळून जाणे आणि परत यायची इच्छाही नसणे; शिवाय पकडले जाऊ नये म्हणून लपणे. DESERTER ला माफी तर नाहीच, पण शिक्षा कडक- कोर्ट–मार्शल आणि Dishonorable Discharge.

पळून जाण्याची ही त्याची दुसरी वेळ होती. म्हणजे ही त्याची अखेरची वेळ. मिलिटरीच्या नियमांनुसार आता त्याला मिलिटरीतून काढून टाकावे लागणार होते –Dishonorable Discharge!

नियमानुसार त्याच्यावर कोर्ट–मार्शलची कारवाई होऊ शकत होती; मात्र अंतिम शिफारस करण्यापूर्वी मला त्याच्याशी बोलण्याचा अधिकार होता. नेहमीच्या कामात आणखी एक काम. ह्याच्याशी बोलायचे. त्याची काय बाजू असेल ती ऐकायची. अर्थात, अशा आर्मीला कंटाळून पळून जाणाऱ्या शिपायाकडे– आणि तेही दोन वेळा–काय नवीन कारण असणार? पण अंतिम कागदपत्रे तयार करण्यापूर्वी त्याची बाजू काय आहे, हे नमूद करणे जरुरी होते. त्यामुळे मला त्याला भेटणे आवश्यक होते आणि माझा निर्णय अंतिम असणार होता. मिलिटरी ड्राफ्ट सुरू झाला होता आणि लॉटरी मध्ये–ह्या ड्राफ्टला लॉटरी का म्हणतात, हे माझ्या लक्षात अजूनही आलेले नाही–ज्यांची नावे निघतात, त्यांना मिलिटरीत जाण्याशिवाय मार्ग नसे. अर्थात, काही 'कारणे' देऊन ही भरती पुढे ढकलता येत असे. पण सर्वसाधारण लोकांना असा मार्ग नसे. त्यामुळे तुम्हाला बोलावले आणि तुम्ही भरती झालात. मग काही लोक कंटाळतात आणि पळून जायचा विचार करतात, तर काही रडतखडत राहतात आणि मग ते जीवन आवडीने जगू लागतात. पण अँड्रूचे तसे नव्हते. ड्राफ्टमध्ये नाव निघाले म्हणून हा आला नव्हता, तर स्वतःच्या इच्छेने मिलिटरीत भरती झाला होता–अर्थात, मिलिटरीकडून मिळालेल्या माहितीनुसार. मग पळून जायचे कारण काय असावे? मला या शिपायाशी बोलायला जावे लागणार होते. कोणालाही मिलिटरीतून काढून टाकण्यात खास सुख नसते. पण हे काम कोणाला तरी करावे लागते. तेवढ्यात फोन वाजला. मी तो घेतला.

फोनवर कर्नल Adams होते.

"Good morning, Sir," मी म्हणालो.

"तुमच्याकडे एक काम होते," ते म्हणाले.

"बोला. मी आपली काय मदत करू शकतो?" मी विचारले. खरेतर त्यांनी दिलेली ऑर्डर मला मानायलाच लागणार होती; पण एक शिष्टाचार म्हणून मी तसे म्हणालो.

"तुमच्याकडे एका सोल्जरची केस आहे. नाव–Andrew James Adams."

आजच्या कामात ज्याला Dishonorable Discharge द्यायचा होता, तोच हा शिपाई. याच्याबद्दल कर्नलचे काय काम असावे, असा विचार माझ्या मनात आला.

"तो माझा मुलगा आहे." ते एक क्षणभर थांबले.

"माझ्या आग्रहामुळे त्याला मिलिटरीत दाखल करण्यात आले आणि... आणि..." ते पुन्हा थांबले.
"मी आत्ताच त्याची फाईल पाहत होतो," मी म्हणालो.
"मला माहीत आहेत मिलिटरीतले कायदे-कानून. मी त्याच्याशी बोललो आहे आणि मला असे वाटते की तुम्हीही त्याच्याशी बोलावे. कायद्यानुसार त्याला काढून टाकावे लागणार—हे मलाही माहीत आहे. तुम्ही जर त्याला काढून टाकले तर मी काहीही ऑब्जेक्शन घेणार नाही." ते पुन्हा थांबले. "पण नाही—कर्नल म्हणून नाही, तर एक बाप म्हणून माझी एक कळकळीची विनंती आहे. मी त्याच्याशी बोललो आहे आणि तो तयार झाला आहे. तो मिलिटरीत राहायला तयार झाला आहे. तो पळून जाणार नाही, याची मी ग्वाही देतो. तर तुम्ही शिफारस करावी आणि त्याला काढून न टाकता आणखी एकच चान्स द्यावा. एक मिलिटरी बाप तुम्हाला ही विनंती करतो आहे."
मला त्यांची कारकीर्द माहीत होती. त्यांना अनेक मेडल्स मिळाली होती. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी अनेकांचे प्राण वाचवले होते.
"मी त्याच्याशी बोलायला दोन तासांत जाणारच होतो. जर तो तयार झाला तर पाहतो काय करता येईल ते," मी म्हणालो.
खरंतर अशा लोकांना पकडून ठेवण्यात युनिटला फार त्रास असतो. याला पकडून ठेवायचे म्हणजे तीन माणसे पहारा ठेवायला लागतात आणि आणखी मदतही लागते. त्यामुळे याला काढून टाकले तर आणखी काही दिवस आमचा वेळ खर्ची पडणार होता. याला परत अमेरिकेत पाठवायचे म्हणजे आणखी काही दिवस लागणार होते. आणि आता त्याच्या वडिलांना मुलाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. एका वडिलांचे हृदय दुखावणे मला जरा कठीण वाटत होते.
मी त्याला भेटण्यासाठी निघालो. मनात विचार चालू होते. सध्या आमचे युनिट एका मोठ्या मिशनच्या तयारीत होते. व्हिएतनाममध्ये एक-दोन असे ब्रिज होते की जे Ambush Bridge म्हणून प्रसिद्ध होते. Thanh Hoa - Dragon's Jaw हा त्यातलाच एक.
ह्याच्यासाठी अमेरिकन एअर फोर्सची अनेक विमाने खर्ची पडली होती आणि अनेक सैनिक बळी पडले होते. हा पूल १९६४ मध्ये बांधला गेला. त्याची लांबी ५४० फूट, रुंदी ५६ फूट आणि पाण्यापासून उंची ५० फूट होती. अमेरिकन एअर फोर्सने पहिला हल्ला १९६५ च्या एप्रिलमध्ये केला आणि त्यात ३०० बॉम्ब टाकूनसुद्धा या पुलाच्या केसालाही धक्का बसला नाही. पण आज रात्री अमेरिकन एअर फोर्सची विमाने पुन्हा प्रयत्न करणार होती. त्यांना मदत करण्याची जबाबदारी माझ्या युनिटवर आली होती. त्याच्यावर आमच्या युनिटने एक गुप्त हल्ला करायचा होता आणि त्याची तयारी चालू होती.
जेवढे शिपाई अधिक, तेवढी यशाची शक्यता जास्त. या शिपायाच्या अटकेत माझे तीन-चार शिपाई गुंतले होते. त्यामुळे याच्या गुन्ह्याची शिक्षा ठरली की मी मोकळा आणि माझे गुंतलेले शिपाईही मोकळे. आता त्याच्या अटकेमुळे आमच्या युनिटची माणसे तिथे गुंतली होती. मी तिथे पोहोचलो. आमच्या पहारेकऱ्यांनी त्याला माझ्या खोलीत आणले. १९ वर्षांचा हा मुलगा. हातात मशिनगन दिली म्हणून एकदम पुरुष—MAN—झाला होता. पण म्हटले तर हा एक पोरगाच होता. मी त्याच्याकडे पाहिले आणि त्याला बसायला सांगितले. तो बसायला तयार नव्हता; पण मीच त्याला बसवले. तो माझ्यासमोरच्या खुर्चीत बसला. खरे तर खुर्चीच्या कडेवरच बसला होता. मी त्याच्याकडे पाहिले. "तू पळून गेला होतास, बरोबर?" "YES, SIR," त्याने उत्तर दिले.
"Do you plan to do that again if you get a chance?" मी विचारले.
"NO, SIR. NEVER AGAIN, SIR," त्याने उत्तर दिले.
"मी तुला एक चान्स द्यायचा ठरवला आहे. पण आणखी एक चूक, एक डेव्हिएशन, एक तक्रार— आणि You are out. Out forever. Got it?"
"Yes, Sir. Very clear, Sir," त्याने उत्तर दिले.
आम्हाला माणसांची गरज होतीच. मी लगेच पेपर्स तयार करायला सांगितले. अँड्रूला पहारा देण्यासाठी नेमलेले तीन सैनिक आणि अँड्रू— अशी चारही माणसे पुढच्या दोन तासांत युनिटकडे रवाना झाली. आमचा हल्ला दोन दिवसांनी रात्री करायचा प्लॅन होता. एअर फोर्स त्या ब्रिजला तोडण्यासाठी बॉम्बिंग करणार होती आणि जमिनीवरच्या शिपायांना आवाक्यात ठेवण्याचे काम आमचे होते. एअर फोर्स पुलावर बॉम्बहल्ला करणार होती आणि शत्रूच्या जमिनीवरील सैन्याला प्रत्युत्तर देता येऊ नये, याची जबाबदारी आमच्या युनिटवर होती. मला रात्री काय, दिवसा पण झोप येणे शक्य नव्हते. एअर फोर्सचे पूर्वीचे दोन हल्ले अयशस्वी झाले होते. हा ब्रिज तोडणे फारच कठीण काम आहे, हे आमच्या लक्षात आले होते. पण हा दळणवळणाचा मोठा आणि महत्त्वाचा मार्ग होता आणि तो नष्ट करणे महत्त्वाचे होते. ती रात्र आली. कोणाला कळू नये म्हणून दोन तास रेडिओ सायलेंस होता. पुढचे दोन-तीन तास कसे जाणार? आमच्या युनिटला यश मिळणार की नाही? आणि यश मिळाले तर त्याची किंमत किती द्यावी लागणार? माहीत नाही. तीन तासांनी मला कॉल आला—Mission... failed.
अमेरिकन एअर फोर्सने टाकलेल्या बॉम्बने त्या ब्रिजला जराही इजा पोहोचली नव्हती. आणि तेथे झालेल्या चकमकीत आमचे मात्र दोन सोल्जर्स धारातीर्थी पडले. आर्मीच्या नियमानुसार जखमी आणि मेलेल्या सोल्जर्सना मागे ठेवायचे नाही. त्याप्रमाणे दोन्ही सोल्जर्सना परत घेऊन येण्यात आले होते. आणि माझी जबाबदारी होती—त्यांना 'ओळखायचे', मग त्यांच्या फॅमिलीला कळवायचे आणि अर्थातच मृतदेह अमेरिकेला परत पाठवायचा. सकाळी सहा वाजता मी तेथे गेलो. झालेल्या चकमकीत आणि स्फोटामुळे बऱ्याच जखमा झाल्या होत्या आणि चेहराही जखमी झाला होता. मी गेलो आणि पाहिले. तो मृतदेह एका तरुण मुलाचा होता. आणि मला त्याला ओळखण्यात खास त्रास झाला नाही. कारण तो होता—Andrew James Adams III!
त्या क्षणी माझ्या मनात एक विचार आला—खरे तर आपण सर्वच या युद्धाचे कैदी होतो.
युद्ध सुरू करणारे राजकारणी, त्याला मुकाट्याने स्वीकारणारी सामान्य जनता, मुलाने रणांगण गाजवावे अशी अपेक्षा करणारा बाप आणि नियमांच्या चौकटीत अडकलेला मी सुद्धा.
अँड्रूचा मृत्यू नेमका कोणामुळे झाला, याचे एकच उत्तर नव्हते.
कदाचित युद्धात जेवढे मरतात त्यापेक्षा जास्त लोक जगतात. शस्त्रे, रणगाडे, मिसाईल्स, बॉम्बर विमाने बनवणारे आणि त्यांचे मध्यस्थ... यांच्यामुळे असेल.

डॉ. शिरीष कीर्तने
ओरलँडो, फ्लोरिडा

एक नितांत सुंदर गाणे

अनेक गाणी आपण ऐकतो. ती आपल्या जवळची होतात; पण काही गाणी अशी असतात, जी हृदयाचा अविभाज्य भाग होऊन राहतात.
'ये जवळी घे जवळी' हे असेच एक अवीट, मधुर गाणे. कधी ऐकले आठवत नाही; पण जेव्हा पासून ऐकले, तेव्हा पासून ते माझ्या अत्यंत प्रिय गीतांमध्ये सामावले आहे. सुंदर, मधुर ही विशेषो थिटी पडावीत, असे हे गाणे.
विशेष म्हणजे वरकरणी प्रेमगीत वाटत असले, तरी ही परमेश्वराची आळवणी आहे किवा परमेश्वराचे रूपक वापरून केलेली वंचितांची आळवणी आहे.
'माणसाला पंख असतात' या चित्रपटातील हे गीत उषा मराठे म्हणजेच उषा किरण या सुंदर नायिकेवर आणि सूर्यकांत सारख्या दिमाखदार नायकावर चित्रित झाले आहे. वि. स. खांडेकर यांनी लिहिलेलं आणि मीना खडीकर यांनी संगीत दिलेलं हे गीत. स्वरसाज चढवणाऱ्या लताबाई किती उंची गाठतात, हे ऐकणं म्हणजे पर्वणीच आहे.

गोड, सुरेल आवाज, यमनमधली चाल... मग मधुरता आणि माधुर्य किती येऊ शकतं, याची परिसीमाच!
किती गोड गायलंय, यासाठी खरंतर शब्द अपुरे आहेत. समाजातल्या स्पृश्य-अस्पृश्यतवेर भाष्य करणारे हे गीत ज्ञानपीठ विजेत्या खांडेकरांच्या सिद्ध हस्त लेखणीतून उतरलं आहे. मधल्या कडव्याचा नक्की अर्थ काय? प्रियकराला भगवंत मानून लिहिलंय का, असे अनेक प्रश्न मला पडत असत;
पण चित्रपटातच याची उकल आहे. हे एका बेटाला उद्देशून लिहिलेले गीत. बेट म्हणजे अस्पृश्य, वंचित समाज आणि त्याला वेढून असलेला समुद्र म्हणजे स्पृश्य, उच्चभ्रूसमाज. व्हायोलिनच्या सुरावटी आणि नतंर एक चिर शांतता दर्शवण्यासाठी केलेला कॉर्ड्सचा वापर! त्या पाठोपाठ येणारा
लताबाईंचा दैवी स्वर! येऽ... काय ती आर्तता, काय ते माधुर्य !
पहिली ओळ इतकी हलकी म्हटली आहे; तरीही 'येऽ' ही साद मात्र प्रचंड ताकदीची. अहो, ही सादच काही केल्या जमत नाही. पुढची चाल जमेल ही; पण हा 'येऽ' काही केल्या गळ्यात येत नाही. किती फोर्स आहे त्यामागे! पण सुरेलता जराही ढळलेली नाही. किंचाळणं तर नाहीच नाही. मग हा फोर्स येतो कुठून?
वंचित समाजानं मांडलेलं गाऱ्हाणं–

ये जवळी घे जवळी
प्रिय सखया भगवंता
वेढुनि मज राहसि का
दूर दूर आता

माझ्या इतका जवळ असून तू का बरं माझ्यापासून लांब आहेस? या वंचित घटकांना न सामावून घेण्याची व्यथा या विनंतीतून अधोरेखित केली आहे.
या पहिल्या दोनच ओळींत लताबाई आपल्याला वेड लावतात. पुन्हा पुन्हा ती साद ऐकावी, ते उच्चार आत्मसात करावे, तो आवाजाचा थ्रो, 'सखया'मधली नजाकत, 'राहसि का'मधली ती आर्त साद... काय काय म्हणून आत्मसात कराव? 'जवळी' शब्द असा म्हणून जे सांगणं आहे ना, ते केवळ लताबाईच करू जाणे. 'राहसि का'मधली प्रश्नार्थक साद,
'दूर दूर 'मधलं दुःख – किती जीव ओतून हे गीत गायलंय ! दीनानाथांच्या एका चीजेवर बेतलेलं हे गाणं. कदाचित मीनाताईंनी ती चीज चपखल निवडली असेल; पण तो भाव लताबाईंनी आरपार नेलाय, हे मात्र खरं! कित्येकदा मी या दोनच ओळी पुन्हा पुन्हा ऐकते आणि तिथेच रमून जाते.
तीच व्यथा पुढे नेणारं संगीत पुढे येतं. आणि स्पृश्य-अस्पृश्य जगातला विरोधाभास केवळ हिरवळ आणि हीण गवताचे पाते यांच्या रूपकात्मक वापरातून खांडेकर करतात.
रे सुंदर तव तीरी
जग हिरवे धुंदउरी
पाते हीण गवताचे
शोभवि मम माथा
त्या तीरी असणारं हिरवं, धुंद जग म्हणजे संपन्नतेचं प्रतीक आणि या बेटावर मात्र हीण गवताचं एखादं पातं. किती पराकोटीचा विरोधाभास!
यात 'रे सुंदर...' या ओळीनंतर येणारं संगीत उत्फुल्ल – त्या समाजाची चढती कमान दर्शवणारं! आणि 'पाते हीण गवताचे' म्हणताना आपसूक्च जमिनी लगत येणारे सूर!
पुन्हा आर्त आळवणी – का आम्हाला असं दूर ठेवता, याची.
नंतर येणारं प्रवाही संगीत जणू सागरात विहरणाऱ्या नौका दर्शवणारं! 'निशिदिनि ' हा शब्द ही किती गोड! गीतासाठी उत्कृष्ट असाच.
स्पृश्य समाजाच्या वैभवाचं प्रतीक असणाऱ्या या नौका आणि त्याही दुरून जाणाऱ्या! म्हणजे दोन समाजांतली
विसंगती दाखवणारं विदारक चित्रण इथे खांडेकर करतात. केवळ 'बघ'चा उच्चार वेगळा करून दोन चालींतलं वेगळेपण लताबाई काय लाजवाब गाठतात! त्यांनी म्हटलेलं

'दुरुनी' किती सुंदर! जणू तो वेढून असलेला सागर, त्यात असणारी समाजातली दरी जी कदाचित वाढतच जातये , हे दर्शवणारं 'दुरु ऽ नी'.
शेवटी वेगळ्या ढगातलं 'येऽऽऽऽ' किती सहज गाऊन जातात! हे गाणं शिकत असताना कितीदा तरी या 'बघ'वरून आपली गाडी घसरते.
लताबाई मात्र या जागा इतक्या लीलया गातात की सारं सोपचं आहे, असं वाटतं. यमनचा गोडवा आणि आवाजाची ताकद काय असते, हे आजमावायला आपल्याला अनेक वेळा याची पारायणं करावी लागतील.
निशिदिनिया नटुनि थटुनि
बघ नौका जाति दुरुनि
स्पर्शास्तव आतुर मी
दुर्लभ तो हाता
तिसऱ्या कडव्या आधी दिलेलं काहीसं करुण रसाकडे झुकणारं संगीत या पुढच्या वर्णनाला अगदी साजेसंच ! तिसरं कडवं चालीला पहिल्या सारखचं , तरी वेगळं वाटणारं. ही गायिकेची ताकद आहे. 'चमचमती', 'लखलखती'चे शब्दोच्चार – ते लखलखणारे दिवे आपल्या समोर उजळतात. आणि विरोधाभास दर्शवतानाचे शब्द – 'झोपडीत अंधारी... वाचू कशी गाथा?' किती सुंदर गुंफण! नेमक्या प्रतीकांचा वापर करून खुलवलेली खांडेकरांची शब्दकळा तो सारा विरोधाभास आपल्यासमोर साक्षात उभा करते.
चमचमती लखलखती
तव मंदिरी दीप किती
झोपडीत अधांरी
वाचु कशी गाथा
सरतशेवटी येणारी पुन्हा तीच आळवणी. पण वेगवेगळ्या जागांनी, वेगवेगळ्या ढंगात. कान तृप्त होऊच नयेत अशी! मीनाताईंनी मोजकंच संगीत दिलं; पण त्यातही अजरामर गीत त्यांनी करून ठेवलयं . किती अप्रतिम चाल!
कोणतीही कलाकृती निर्माण करत असताना त्यातला विचार जितका सशक्त, तितकी ती अधिक प्रभावी ठरते. समाजातील विरोधाभास दाखवण्यासाठी खांडेकरांनी वापरलेली निर्जन , दुर्लक्षित बेटाची कल्पना केवळ प्रतिभेचं लक्षण!
त्यांच्या शब्दांना मीनाताईंनी दिलेलं संगीत आणि त्यावर गान कोकिळेने चढवलेला स्वरसाज म्हणजे मूर्ती पूर्ण झाल्यावर जडवलेले नाजूक अलंकारच जणू! मूळच्या मूर्तीला अधिक लावण्य प्राप्त करून देणारे, तिचं सौंदर्य चहूबाजूंनी फाकवणारे, तिला सर्वगुणसपंन्न करणारे असेच.
वैचारिक प्रगल्भता, सांगीतिक वैविध्यता आणि आवाजाचा अढळ परिणाम पाहायचा असेल, तर एकदा हे गीत ऐकाच! माझी खात्री आहे की, पुनः पुन्हा ऐकल्या शिवाय समाधानच होणार नाही.

हा लेख लिहिताना योगायोगाने आज उषाकिरण यांचा वाढदिवस! आपल्या सोज्वळ सौंदर्याने, उत्तम अभिनयाने एक काळ गाजवलेली ही अभिनेत्री! या गीतातून त्याही कायम आपल्यातच राहतील.

गीताचा आस्वाद जरूर घ्या.

https://youtu.be/hKNSU4e3Pp4

शिल्पा कुलकर्णी
लुईव्हील, केंटकी

कर्तव्य पथाच्या वारीत आपण सारेच वारकरी

शाळेत जायला लागल्यापासून ते म्हातारपणापर्यंतच्या प्रवासात प्रत्येक टप्प्यावर आपल्या प्रत्येकाचा रस्ता जरी वेगळा असला, वेगवेगळी वळणे आली, तरी आपली पंढरी गाठण्यासाठी आपण आयुष्यभर वारकरीच असतो.

लहानपणी आपण जेव्हा शाळेत जायला लागतो, तेव्हापासून ते शाळा सोडे पर्यंत आपल्या पाठीवरचे दप्तर, वह्या-पुस्तके ह्या आपल्या दिंड्या-पताका असतात. शाळेची वाट ही जणू पंढरीची वाट असते. दररोज त्या वाटेवरून आनंदाने जाताना, शाळेतील शिक्षक आणि शाळेबद्दल गप्पा मारत जेव्हा हा छोटा वारकरी जात असतो, तेव्हा तो जणू काही शाळेच्या पंढरीतील त्याच्या शिक्षकरूपी विठ्ठलाचे नामस्मरणच करत असतो. दररोज आपल्या पंढरीत जाऊन तो त्याच्या विठ्ठलाकडून ज्ञानार्जन करून घेत असतो. हा विठ्ठलही त्याच्या भक्तीचे फळ म्हणून, ज्याच्या त्याच्या भक्तीनुसार, त्याला उत्तीर्ण करून वरील वर्गात पाठवत असतो. अशी ही शाळेची वारी एका टप्प्यावर येऊन वळण घेते आणि विठ्ठलाने दाखवलेल्या दिशेने प्रत्येक जण आपल्याला आवडेल त्या पंढरीस जाण्याचा वेगवेगळा मार्ग निवडतो.

पुढे महाविद्यालयातही ही वारी अशीच सुरू राहते. पुन्हा काही नवी वळणे, पुन्हा नवीन रस्ते आणि पुन्हा नवीन शिक्षकरूपी विठ्ठलाची वेगवेगळी रूपे बघत व त्याची अभ्यासरूपी पूजा करत त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो आणि तो विद्यार्थी आयुष्याच्या एका मोठ्या वळणावर येऊन ठेपतो. काही जण नोकरी पत्करतात, काही जण व्यवसाय करतात, काही जण डॉक्टर होतात, तर काही जण शिक्षक होतात. शिक्षक झाल्यानंतर त्याला पुन्हा आपली लहानपणापासूनची वारी आठवते आणि समोरील वारकरी विद्यार्थ्यांची त्यांच्या विठ्ठलाकडून शिकण्यासाठी असलेली तळमळ आठवते. तो ही आपल्या परीने या वारकऱ्यांना जेवढे ज्ञान देता येईल, तेवढे देण्याचा प्रयत्न करतो. नोकरी करणाऱ्यांचा आपले घर ते ऑफिस असा दररोजचा प्रवास सुरू होतो. त्याच्या दृष्टीने ऑफिसमधला आपला बॉस हाच त्याचा विठ्ठल असतो. त्याला प्रसन्न ठेवण्यासाठी व त्याची कृपा सदैव आपल्यावर राहण्यासाठी हा नोकरदार वारकरी आपली ऑफिसची बॅग व सामान अशा दिंड्या-पताका घेऊन आपल्या पंढरीच्या वाटेवर दररोज मार्गक्रमण करत असतो. या अतोनात कष्टांमध्ये सुद्धा तो आनंदी असतो, कारण हीच पंढरीची वाट आणि हा विठ्ठलच त्याचा संसारगाडा सुखाने हाकणार आहे, यावर त्याची श्रद्धा असते.

आजारी पडल्यानंतर आपण डॉक्टरांकडे जातो, तेव्हा सुद्धा हा वारकरी डॉक्टरांमध्ये आपल्या विठ्ठलाचे रूप पाहत असतो. हाच विठ्ठल मला या दुखण्यातून बरे करणार आहे, या श्रद्धेने तो त्याला शरण जातो. डॉक्टरही आपल्याकडे आलेल्या वारकरी भक्ताच्या डोळ्यातील भाव जाणतो आणि त्यास ट्रीटमेंटरूपी कृपा प्रसादाने बरे करतो.

आपण विविध वाहनांतून प्रवास करताना, जसे लोकल, रिक्षा, बस, विमान इत्यादींमधून जाताना, त्या वाहनांचे चालक- मोटरमन, रिक्षावाला, बस ड्रायव्हर, पायलट-हे सर्व आपल्यासाठी विठ्ठलच असतात. तमाम प्रवासी वारकऱ्यांना ते त्यांच्या वाटेवरून आपापल्या पंढरीस सोडत असतात.

आधुनिक काळातील वर्क फ्रॉम होम करणाऱ्या वारकऱ्यांची पंढरीची वाट ही व्हर्च्युअल असली आणि त्यांचा विठ्ठल जगात कुठेही असला, तरी त्यांना तो दिसत असतो.

अशी ही विठ्ठलाची अनंत रूपे प्रत्येकजण समज आल्यापासून आपल्या आयुष्याच्या विविध वळणांवर बघत असतो, अनुभवत असतो आणि आपल्या ध्येयाच्या खडतर कर्तव्यपथाची, आपापली पंढरीची वाट चालत असतो.

असे आपण सारे आयुष्यभर वारकरीच!

सुहास बेलापूरकर
मुंबई, महाराष्ट्र

रॉंग नंबर

कॉलेजमधल्या पहिल्या चार तासांनंतरच्या मधल्या सुट्टीत मी माझ्या काही सहकारी मित्रांसोबत फिजिक्सच्या लॅबमध्ये बसलो होतो. जेवणाचे डबे संपवून गप्पा चालल्या होत्या. मध्येच माझ्या मोबाइलची रिंगटोन वाजू लागली नि गप्पा थांबल्या.

"हॅलो, साक्षी आहे का?" अत्यंत मधुर स्वरात कोणीतरी तरुणी विचारत होती. ती तरुणी होती, हे तिच्या आवाजातल्या मधुरतेवरून स्पष्ट होत होतं.

"नाही. रॉंग नंबर." एकाच झटक्यात असं उत्तर द्यावं आणि कॉल डिस्कनेक्ट करावा, असं काही तो आवाज ऐकताना अजिबात वाटलं नाही.

मग विचारलेल्या प्रश्नाला समर्पक काहीतरी उत्तर द्यायचं म्हणून मी म्हणालो,

"नाही. साक्षी नाही इथे."

"मग आपण कोण?"

पुढचे अनपेक्षित धोके टाळण्याच्या हेतूने, कधी कोणी फोनवरच्या पहिल्या भेटीत अनोळखी व्यक्तीला आपले डिटेल्स सांगत नाहीत. मग मीच म्हणालो,

"आपल्याला कोण हवंय?"

"साक्षी."

"कोण साक्षी?"

"माझी मैत्रीण."

"ती इथे नाहीये."

"ते कळलं. आपण कोण ते सांगा ना आधी."

"आधी आपण कोण ते सांगा."

पलीकडून मनापासून हसण्याचा आवाज आला. मग मीच म्हणालो,

"हसायला काय झालं?"

"हसू नाही तर काय? मला तुम्ही 'आपण' काय म्हणता? 'तू' म्हणा ना सरळ."

"आम्ही असं अनोळखी व्यक्तीला, तेही स्त्रीला, 'तू' नाही म्हणत."

"अनोळखी स्त्री? नो वे. मी तरुण मुलगी आहे; स्त्री नाही."

"तेच ते."

"तेच ते काय? आपण अनोळखी तरुणीशी फोनवरून इतका वेळ बोलत बसता, हे काय कमी आहे?"

खरंतर हे वाक्य माझ्या पत्नीच्या तोंडी अधिक शोभलं असतं. मी पुढे काही बोलण्याआधी तीच म्हणाली,

"जाऊदे. मला तसं तुम्ही अनोळखी नका समजू. आपली ओळख झाली की आता फोनवरच. तुम्ही नाव नाही सांगितलं तुमचं..."

मुली आजकाल फारच बोल्ड झाल्यात, असं काहीतरी मी विचार करत होतो. मी काहीच बोलत नाही म्हटल्यावर तीच म्हणाली,

"तुम्हाला गर्लफ्रेंड आहे?"

बापरे! हा तर बॉम्ब झाला. मुली अनोळखी माणसाला काहीही विचारू शकतात तर. आपण फक्त आश्चर्य वाटून घ्यायचं. मुलींना प्रपोज करण्याच्या वयातदेखील 'ब्र' फुटला नाही आमच्या तोंडून. कॉलेजची सगळी वर्षं आवडलेल्या 'त्या' मुलीकडे चोरून बघण्यात गेली. त्यापुढे काही नाही. तासाची बेल वाजली. सुट्टी संपली. मला लेक्चर होतं. कसाबसा पुटपुटलो

"ओ, मला काम आहे. फोन ठेवतो."

"चालेल. मी नंतर कॉल करेन. बाय."

फोन ठेवला. एवढा वेळ गप्प बसलेले माझे सभ्य सहकारी म्हणाले,

"कोणाशी हा प्रेमालाप चालला होता, सर?"

"ए, काहीतरीच काय? रॉंग नंबर होता."

यावर सगळे खो खो हसले. साठे म्हणाला,

"रॉंग नंबरसाठी आपण इतका वेळ कधीपासून द्यायला लागलात?"

"म्हणजे? काय म्हणायचंय तुम्हाला?"

"नाही. म्हणजे रागावू नका. पण म्हटलं..."

"बोला ना काय ते."

"नाही, म्हणजे इतका वेळ रॉंग नंबरशी बोलताना तुम्हाला कधीच पाहिलं नव्हतं. तुम्ही पुरुषाशी बोलत नव्हता, हे कळलं. 'कोण साक्षी?' असं काहीतरी विचारलंत नि पुढे मोबाईल कानाला लावून नुसतंच बसून राहिलात... कुणीतरी जादू केल्यागत."

"साठे..."
"तुम्ही 'बोला' म्हणालात म्हणून बोललो, सर आणि खरं तेच बोललो. चला. सोडून द्या. आपण वेगळं काहीतरी बोलू."
"मला लेक्चर आहे," म्हणत मी निघून गेलो.
लेक्चर चालू असताना दोनदा फोन वाजला. मी खिशातल्या खिशात बंद केला, नंबर न पाहता. लेक्चर नंतर पाहिलं तर तोच नंबर होता.
कॉल करणार होतो. पण साठे आठवला. त्याचं काहीच चूक नव्हतं म्हणा. मी कॉल केला नाही. यावर आठ-दहा दिवस निघून गेले आणि पुन्हा त्या मुलीने फोन केला.
"हॅलो, ओळखलंत कोण बोलत्येय ते?"
"हो. ओळखलं."
"सांगा पाहू."
"आता कशासाठी कॉल केलात? हा रॉंग नंबर म्हणून सांगितलं होतं ना मी? इथे तुमची कोणी मैत्रीण वगैरे नाहीये..."
माझं वाक्य अर्धंच तोडत ती म्हणाली,
"आता साक्षीशी नाही; तुमच्याशी बोलायचं होतं."
"मला वेळ नाहीये आता गप्पा मारायला."
"वेळ कधी आहे सांगा. मी तेव्हाच कॉल करेन."
"कशासाठी पण?" माझा आवाज चढला असावा.
"मला उत्तर हवंय. तुम्हाला गर्लफ्रेंड आहे?"
"हो, आहेत. खूप आहेत," मी म्हणालो.
"नावं सांगा."
मला पटकन नावे काही सुचली नाहीत. मग म्हणालो,
"नाही आहे."
"व्हेरी गुड. आता ऐका. माझं नाव मयुरी आहे. साक्षी ही माझी मैत्रीण. त्यादिवशी मी चुकून तुमचा नंबर डायल केला. तुमच्या नि तिच्या नंबरमध्ये फक्त एका अंकाचा फरक आहे. मला तुमचं बोलणं, आवाज आवडला. आणि खरं सांगू का... फोनवरच्या त्या पहिल्या भेटीत तुम्हीही आवडलात. म्हणून तर आज पुन्हा कॉल केला."
"आता माझं ऐका. मला एक मुलगा आहे. बायको आहे. बायकोचं वजन ऐंशी किलो आहे. याहून वेगळी अजून काय काय माहिती हवीय तुम्हाला?...
हॅलो... हॅलो... हॅऽऽऽलो...!"
फोन डिस्कनेक्ट झाला.
पुन्हा या नंबरवरून मला कधीच कॉल आला नाही.
संध्याकाळी आल्या आल्या हा प्रसंग बायकोला सांगितला. ती माझ्यावरच चिडली.
"तुम्ही माझं वजन 'ऐंशी किलो' असंच का सांगितलंत तिला? दुसरं काहीतरी बोलता आलं नसतं?"
"अगं, बोलता आलं असतं. पण जे जसं सुचलं तसं बोललो. फार काही विचार करून बोललो नाही मी. आणि तू काही रागावू नकोस. कारण असं न बोलता छान काहीतरी बोलत राहिलो असतो, तर तिचे रोजच कॉल्स आले असते. आणि तसं झालं असतं तर तू याहून अधिक चिडली असतीस. आणि दुसरं म्हणजे, मी म्हटल्यावर काय थोडंच तुझं इतकं वजन वाढणार आहे?"
यावर सौ काही बोलली नसली, तरी रात्री तिने केलेल्या स्वयंपाकाची गोडी चाखताना स्पष्ट जाणवलं होतं की माझं स्पष्टीकरण तिला मनोमन पटलं होतं.

प्रा. विकास येसादे
कोल्हापूर, महाराष्ट्र

★ ९/११: इतिहास आणि वर्तमानाच्या दोन पिढ्या ★

१० सप्टेंबर २०२६. दुपारी माझ्या ११ वर्षांच्या मुलीच्या इतिहासाच्या शिक्षिकेची ईमेल आली: उद्या आम्ही वर्गात ९/११ बद्दल बोलणार आहोत. ९/११ मेमोरियल आणि म्युझियमनं उपलब्ध करून दिलेली काही साधनं वापरून ९/११ ला काय झालं, काही लोकांच्या त्या दिवसाशी निगडित आठवणी, आणि ९/११ चे अमेरिकेवर आणि जगावर झालेले परिणाम यांची चर्चा करणार आहोत. तुम्हीही तुमच्या मुलांशी या विषयावर बोला, त्या दिवसाच्या तुमच्या आठवणी त्यांना सांगा. म्हणजे मुलं वर्गात जे शिकतील त्याची सांगड ती घटना जगलेल्या लोकांच्या अनुभवांशी घालू शकतील आणि तो त्यांच्यासाठी एक अर्थपूर्ण अनुभव ठरेल.
तसं माझी मुलगी ९/११ बद्दल मागच्या तीन इयत्तांपासून शिकत आलेलीच आहे, पण यावर्षी मिडल स्कूलमध्ये २ तासांचा एक अख्खा लेसन या विषयावर होणार होता. आपण जी घटना आणि नंतरचे पडसाद प्रत्यक्ष जगलो तेच आपली मुलं एक इतिहास म्हणून शिकतात, हा एक वेगळाच अनुभव असतो. कदाचित 'मोठं होणं' यालाच म्हणत असावेत. शिवाय आपण अमेरिकेत इमिग्रंट असण्याच्या अगदी सुरुवातीच्या काळात अनुभवलं ते ती २५ वर्षांनी 'तिच्या देशावर झालेला हल्ला' म्हणून शिकते आहे, हे सुद्धा एक वेगळ्या प्रकारे पूर्ण होणारं वर्तुळ!
११ सप्टेंबर २०२६ ला टीव्ही, रेडिओ, सोशल मीडिया सगळीकडं ९/११ च्या २५ व्या स्मृतिदिनाचीच चर्चा होती. लोक आपापल्या आठवणी शेअर करत होते. न्यूयॉर्क, न्यू जर्सी भागात राहणाऱ्या अनेक मराठी लोकांनीही आपापल्या स्मृतींना उजाळा दिला होता. त्या दिवसाशी निगडित माझीही आठवण इथं सांगावीशी वाटते. अमेरिकेत शिकायला येऊन तेव्हा जेमतेम एक वर्ष झालं होतं. सप्टेंबरच्या सुरुवातीला मी ओहायो मधून, एक मित्र साऊथ कॅरोलिनामधून आणि दोन मित्र अपस्टेट न्यूयॉर्कमधून अशी आम्ही चौघांनी मिळून न्यूयॉर्क सिटी, न्यू जर्सी आणि वॉशिंग्टनची ट्रीप काढली होती. अमेरिकेत प्लॅनिंग करून अशी मोठी ट्रीप करायचा आमचा पहिलाच प्रसंग. त्यावेळी आमच्यापैकी एकाकडंच ड्रायव्हिंग लायसन्स होतं.
९/११ च्या २ दिवस आधी, म्हणजे ९ सप्टेंबर रोजी, आम्ही न्यूयॉर्कमध्ये होतो. न्यूयॉर्क सिटीला भेट द्यायची आमची पहिलीच वेळ. त्या शहराची 'एनर्जी' अनुभवून भारावून जायला झालं होतं. दिवसभर आम्ही नुसतं भटकत आणि चरत होतो. ९ सप्टेंबरला सकाळी वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या टॉवरवर असलेल्या हजारो लोकांमध्ये आम्ही चौघं सुद्धा होतो. तिथं घेतलेला आमचा एक फोटोही आहे. त्यावेळी आमच्याकडं सेलफोन सोडा, पण डिजिटल कॅमेरासुद्धा नव्हता. रोल डेव्हलप करून स्कॅन केलेला तो फोटो आता जुन्या ई-मेल्समध्ये कुठंतरी असेल.
वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या खाली असलेल्या बारमध्ये आम्ही बिअर प्यायलो होतो, त्याचंही तेव्हा किती विशेष वाटलं होतं. भरपूर दंगामस्ती आणि टवाळक्या करून त्याच धुंदीत आम्ही १० सप्टेंबरला आपापल्या गावी परतलो आणि ११ सप्टेंबरला हा हल्ला झाला होताः अतिरेक्यांनी हल्ले दोन दिवस आधी केले असते किंवा आम्ही तिथं दोन दिवस नंतर गेलो असतो तर? याचा विचार करून आमच्या काळजाचा थरकाप उडाला होता. तेव्हा अमेरिकेच्या राजकारणाची, ९/११ मागच्या गुंतागुंतीच्या भूराजकीय पार्श्वभूमीची फारशी कल्पना नव्हती, पण आजूबाजूच्या वातावरणातले बदल जरूर जाणवायला लागले होते. सगळीकडं युद्धाची चर्चा सुरू झाली होती. या हल्ल्यातून बाहेर येण्याची अमेरिकन जनतेची जिद्द आणि उभारी जाणवत होतीच, पण क्वचितप्रसंगी ९/११ शी भारताचा काही संबंध नसतानाही रस्त्यावरून जाताना 'गो बॅक टू युवर कंट्री' चे शेरे ऐकायला येण्याचा, सिनियर्सकडून आणि अमेरिकेतल्या काही ज्येष्ठ नातेवाईकांकडून 'थोडं जपून वावरत चला रे' असे सल्ले मिळण्याचाही हा काळ होता. मग हळूहळू आमचं आयुष्य स्थिरावत गेलं, अमेरिकेत आलेल्या लाखो लोकांसारखा इमिग्रंट ते कायमचे रहिवासी ते नागरिक या वाटेवरचा आमचाही प्रवास होत राहिला, आणि बघता बघता या घटनेला २५ वर्षं झाली. त्या दिवशी मुलगी शाळेतून आल्यावर आम्ही ९/११ बद्दल बोलत होतो. "अतिरेक्यांना अमेरिकेच्या काही गोष्टी आवडत नव्हत्या तर त्यांनी तसं सांगितलं का नाही? चर्चा करून हे सोडवता आलं नसतं का? त्यासाठी हल्ला करायची काय गरज होती? " नुकतंच उन्हाळ्याच्या सुट्टीत डिबेट कॅम्प केल्यानं कोणतेही मतभेद डिबेट करून सोडवता येतात, असा तिचा निरागस समज आहे. आता ९/११ होण्यामागं नक्की कायकाय कारणं होती, हा क्लिष्ट विषय आहे; पण सामान्य माणसाच्या पातळीवरून विचार करून तिला समजवायचा प्रयत्न केला-आपण एका pluralist समाजात राहतो. म्हणजे वेगवेगळे समुदाय, संस्कृती, विचारपद्धती समाजात एकत्र नांदू शकतात. आपण सगळे सारखे विचार करणार नाही, आणि तसं असण्याची गरजही नाही. उलट धर्म, संस्कृती, राजकारण, जीवनशैली यांतली विविधता हीच pluralist समाजाची ताकद आहे. त्यामुळं कोणा एकाची दादागिरी चालत नाही. मतभेद असले तरी त्यावर मोकळेपणानं आणि परस्परसन्मानानं चर्चा होते आणि तडजोडीनं तोडगा काढला जातो. पण धार्मिक किंवा राजकीय अतिरेकी विचारसरणीची एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवृत्ती अशी असते की बाकीच्यांना आपल्या विचारधारेत आणायचं आणि ते येत नसतील तर हिंसेचा अवलंब करायचा.
"९/११ चा हल्ला यशस्वी झाला का?" तिनं पुढचा प्रश्न विचारला. मी विचारात पडलो. त्या हल्ल्यात प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली. अमेरिका आणि जग एका दीर्घकाळ चाललेल्या युद्धात लोटलं गेलं. जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. काही समुदायांना भेदभावाला सामोरं जावं लागलं. लोकांचं नागरी स्वातंत्र्य आणि त्यात सरकारचा हस्तक्षेप यांवर बराच काथ्याकूट झाला.
पण मग समाजातल्या pluralism चं काय? तो गेल्या २५ वर्षांत कमी झाला की वाढला? आजकाल, विशेषतः सोशल मीडियावर एक चक्कर टाकली तर असं जरूर जाणवतं की दुसऱ्याच्या विरोधी मताचा आदर करायची वृत्ती कमी होत चालली आहे आणि बारीकसारीक गोष्टींवरून एकमेकांवर तुटून पडायची प्रवृत्ती बळावत चालली आहे. पण याची दुसरी बाजू म्हणजे जर 'खऱ्या' जगाकडं नजर टाकली तर एक वैश्विक समाज म्हणून आपल्यातली विविधता वाढत चालली आहे आणि आपण अधिक pluralist होत चाललो आहोत, असंही मानायला वाव आहे.
'द वेस्ट विंग' या माझ्या अतिशय आवडत्या शोनं ९/११ नंतर फक्त तीन आठवड्यांनी एक एपिसोड केला होता. त्यात एका पात्राच्या तोंडी असं वाक्य होतं "Terrorism has a 100% failure rate. Not only do terrorists always fail at what they are after, they pretty much always succeed in strengthening whatever it is they're against." हे खरं आहे का, हे तपासायला हवं. ९/११ चा हल्ला करताना कदाचित ओसामा बिन लादेनला अमेरिका विरुद्ध मुस्लीम असा संघर्ष उभा करायचा असेल, पण तसं झालं का? ९/११ च्या २५ वर्षांनंतर या घटनेचं स्मरण म्हणून न्यूयॉर्कमध्ये अनेक कार्यक्रम झाले. तेव्हा त्यात शहराचा महापौर म्हणून उपस्थित होता न्यूयॉर्कमध्येच वाढलेला एक मुस्लीम! किमान न्यूयॉर्कच्या बाबतीत तरी ९/११ ने ज्या cosmopolitan, pluralist शहराला संपवायचा प्रयत्न केला, ते शहर आपल्या विविधतेसह अजूनच ठामपणे उभं राहिलं आहे, असं म्हणता येईल!
माझ्या मुलीच्या प्रश्नाचं पूर्ण उत्तर काय, हे मला माहीत नाही. ते शोधण्याची माझी कुवतही नाही. ९/११ ने अमेरिका बदलली, जग बदललं आणि आमच्यासारख्या इमिग्रंट कुटुंबांचं आयुष्यही बदललं, हे खरं आहे. पण २५ वर्षांनी माझी मुलगी हा इतिहास शिकते आहे, आणि तिच्यासाठी अमेरिका म्हणजे तिचं घर आहे, हेही तितकंच खरं आहे. कदाचित ९/११ च्या परिणामांचं हेच मर्म असावं का? हिंसेनं समाजाला बदलवून टाकणं, आणि विविधता आणि परस्परसंवादानं त्याला सशक्त करायचा प्रयत्न करत राहणं, या दोन प्रवृत्तींमधला संघर्ष मात्र चालू आहे आणि चालू राहील, हे निश्चित!

गौतम पंगू
फिलाडेल्फिया, पेनसिल्व्हेनिया



हल्ली अमेरिकेत तरी, या सणासुदीच्या दिवसांना 'दसरा दिवाळी' असं काही म्हणताच येत नाही! कारण दिवाळीच्या प्रकाशात, तो हॅलोविन, स्वतःचा अंधार करण्यासाठी धडपडतोय. हा दिवाळीच्या वाईटावर टपलाय अगदी. हा अगदी दुसऱ्या टोकाचा. दिवाळीला प्रकाश आणि झगमगाट आवडतो, ह्याला अंधार! सगळ्या जगात दिवाळी ही 'फेस्टिवल ऑफ लाईट्स' म्हणून प्रसिद्ध, तर हॅलोविन हा 'फेस्टिवल ऑफ डार्कनेस, हॉरर, घोस्टस' म्हणून प्रसिद्ध. खरं म्हणजे हॅलोविन शब्द आला 'ऑल हॅलोज इव्ह' म्हणजे सगळ्या संतांची संध्याकाळ. पण संत गेले स्वर्गात, राहिली फक्त भुताटकी, चेटकिणी, बाधा झालेले वाडे, रक्त आणि कवट्या, काही विचारू नका! आणि आमची सुंदर दिवाळी, आकाशकंदील, भुईनळे आणि भुईचक्र, अभ्यंगस्नानाच्या स्वप्नात! दिवाळीत सनईचे सूर तर, हॅलोविनचा किंकाळ्यांचा आक्रोश.

त्यामुळे 'दसरा दिवाळी'च्या ऐवजी, 'दसरा हॅलोविन दिवाळी' अशी फ्रेज तयार झाली आहे. काही लोकांनी तर 'दिवोलिन', 'हॅलोवाली', 'दिवालीवीन' अशी वेगवेगळी नावं देण्याचा असफल प्रयत्न पण केलाय. दरवर्षी ही सुंदर आणि चमचमणारी साडी नेसलेली दिवाळी, या अक्राळविक्राळ, भीतीदायक हॅलोविन पासून चार हात दूर राहण्या करता धडपडत असते आणि बऱ्याच वेळा यशस्वी पण होते. पण या वर्षी हॅलोविनने तिला गाठलंच! लाजऱ्या-बुजऱ्या दिवाळीचा हात धरून त्याने राक्षसी हा हा हा असं कुरूप हास्य केलं! त्यामुळे दिव्यांची दिवाळी आणि भुतांचा हॅलोविन अशी एक अनोखी आणि एकमेकांना न शोभणारी विजोड जोडी फिरते आहे रस्त्यावर. ते सुद्धा लक्ष्मीपूजनाच्या दिवशी!

जोडपं कितीही विजोड असलं तरी २-३ गुण जमायलाच पाहिजेत, नाही का! तर दोघांचा मूळ हेतू एकच आहे, चांगलं आणि वाईट, गुड अँड बॅड यांच्यामधला बॅलन्स टिकावा, वाईट वृत्तींना आळा बसावा, असंच दोघांचं स्वप्न. दिवाळीच्या दिवशी सूर्य आणि चंद्र दोन्ही निस्तेज असतात, अंधारराज्य येऊ नये म्हणून आपण दिव्यांची रांग लावतो. परंतु हे सत्कार्य कसं करायचं, यावर या जोडप्यामध्ये खडाजंगी! हा म्हणतो भुतांचे वेष करून अंधाराला घाबरवू, आणि ही म्हणते दिव्यांची माळ करून आसमंत उजळवू. हे म्हणजे दोघांना मुलांवर संस्कार तर चांगले करायचे आहेत, पण हा म्हणतो चांगले फटके मारायला पाहिजेत नालायकांना आणि ही म्हणते अगदी प्रेमाने माफ करत मुलांना समजावून सांगायला पाहिजे! नेहमीचाच विजोडपणा!

हॅलोविनचा भारतीय नातेवाईक म्हणजे 'पितृपंधरवडा'. आपण नाही का आपल्या पूर्वजांचे स्मरण करतो? पूजा करतो. खरं म्हणजे हॅलोविन हा 'रिमेम्बरिंग द डेड' ह्याच भावनेने निर्माण केलेला. परंतु आपण आपल्या पूर्वजांची भुतं करून नाचवत नाही. आपण त्यांच्या फोटोला हार घालू. हात जोडू. कारण आपल्या संस्कृतीमध्ये त्यांना सद्गती लाभलेली असते. पृथ्वीवर भयानक चेहऱ्याने अदृश्यपणे वावरत असतील, असं आपल्याला चुकूनही वाटत नाही. परंतु पाश्चात्त्य लोकं आपल्या पितरांना भुताचे भयानक ड्रेसेस घालून, त्यांचे ग्रुप करून फिरवतात.

दिवाळी सुंदर साड्यांची, तर हॅलोविन रस्त्यावरच्या बीभत्स परेड्सचा! निदान सॅन फ्रांसिस्कोसारख्या मोठ्या शहरात तरी! हा बीभत्सपणा भयानक, रक्ताळलेले चेहरे आणि पोशाखांवर थांबत नाही, इथे जरा गलिच्छपणाही येतो, नग्नता, गे-लेस्बियन म्हणजे समलिंगी लोकं मोठ्या दिमाखाने रस्त्यांवर प्रणय करतात. या लोकांच्या अस्तित्वावर काही आक्षेप नाही, काही असतीलसुद्धा चुकीच्या शरीरात अडकलेले, परंतु मुलांचा अगदी लाडका सण असूनसुद्धा अशा परेड्सना त्यांना घेऊन जाताच येत नाही. मग काय उपयोग? आणि इथे दिवाळीत कोरे करकरीत नवीन कपडे घालून एकमेकांना "वा, छान दिसताय" असं अभिवादन देण्याची वेळ. गंध आणि उटणं लावून प्रसन्न व्हायची वेळ.

अमेरिकेत हॅलोविनच्या पावन मुहूर्तावर अगदी हॉरर सिनेमे प्रदर्शित होतात. नुसता नेटफ्लिक्स किंवा ऍमेझॉन प्राईम उघडून बघितलं तर शंभर हॉरर ट्रेलर्स दिसले. आणि दिवाळीच्या दिवसांत मराठी वर्तमानपत्र उघडा, दिसतील शंभर 'दिवाळी पहाट'च्या जाहिराती. इथे भारतात मंगलमय सुरेल 'दिवाळी पहाट'चा अतिशय प्रसन्न अनुभव. इथे अभ्यंगस्नान करून, उटणं लावून अंघोळ करावी आणि सनईचा सूर कानावर पडावा आणि तिथे, अंगावरून पांघरूण घेऊन, दारं-खिडक्या बंद करून, हाय-फाय साऊंड सिस्टिमवर कर्कश आवाजात अंगावर काटा येणारा भीतीदायक सिनेमा लावावा.

घराच्या आतमध्ये दिवाळीची औक्षणं आणि घराबाहेर हॅलोविनची पिल्लावळ, भुताचे मास्क घालून 'ट्रिक ऑर ट्रीट' असं म्हणत गोडधोड मागत आहेत! दिवाळीच्या फराळात ह्या 'ट्रीट'च्या कँडीज आणायचं विसरूनच गेलो होतो! या ट्रीट मागणाऱ्या मुलांच्या हातात कँडीऐवजी एक-एक लाडू ठेवून त्यांना खरोखरचं 'ट्रिक' करावं का? का पंपकीनमध्ये आपल्या पणत्या लावायच्या? आणि त्याच पंपकिनचे तबक समजून याच भुतांना ओवाळायचं, दारात आले की? डोक्यावर कापूस टाकण्याऐवजी कोळ्याचं जाळं टाकायचं? आणि सुपारीने औक्षण करायच्या ऐवजी काळा स्पायडर फिरवायचा? एखादी सुंदर साडी नेसून चाललीय आणि मागे वळून बघितल्यावर भुतीण, असं नको व्हायला. बायको बरोबर जाताना एकदा खात्री करून घ्या!

घरामध्ये दिवाळीची स्वच्छता करायची का दिसलं एखादं कोळ्याचं जाळं, तर राहू दे जरा हॅलोविन करता, असं म्हणायचं? घराबाहेर कशाचं डेकोरेशन करावं, हा सुद्धा एक गोंधळ आहे. दिवाळीची चांदणी लावावी का डोळ्यात पणती असलेला हाडांचा सापळा? पांढरी शुभ्र रांगोळी काढावी का हॅलोविनची पांढरी जळमटं टाकावी? लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच्या पणत्या अजून विझल्या नाहीत, त्यामुळे तीच पणती राक्षसी चेहऱ्याच्या पंपकिनमध्ये घालून तो उजळवण्याचा निर्लज्जपणा करायचा?
रावणाला दसऱ्याच्या दिवशी मारल्यानंतर २१ दिवसांनी दिवाळी येते! तरीच म्हटलं, त्या लाल डोळ्यांच्या पंपकिनमध्ये मला रावणाचा भास का होतोय!

-सुधीर धर्माधिकारी
सॅन होजे, कॅलिफोर्निया

भाषा शिकताना: माणूस समजताना

"आजी, तुला काय म्हणायचंय ते मला समजतंय: पण मराठीत उत्तर देता येत नाही!"
अमेरिकेत/परदेशात वाढलेल्या एका मुलाचे हे वाक्य ऐकले आणि क्षणभर गंमत वाटली. आजीला इंग्रजी फारसे येत नाही आणि नातवाला मराठी समजते, पण बोलता येत नाही. दोघांनाही एकमेकांशी खूप काही बोलायचे आहे; प्रेमही तितकेच आहे. पण मध्ये एक छोटीशी भिंत उभी आहे – भाषेची.
परदेशात वाढणाऱ्या मुलांनी मराठी किंवा आपली मातृभाषा का शिकावी, या प्रश्नाची काही उत्तरे अगदी सहज देता येतात: आजी-आजोबांशी बोलता येईल. भारतात गेल्यावर रस्त्यावरील पाट्या वाचता येतील. हॉटेलमधला मेनू समजेल. चुलत भावंडांशी, नातेवाईकांशी आणि मित्रांशी सहज गप्पा मारता येतील. भारताची सहल अधिक जवळची, अधिक आपलीशी वाटेल. ही झाली सहज दिसणारी फळे – low-hanging fruits!
पण मला वाटते, मातृभाषा शिकण्याचे खरे महत्त्व यापेक्षा खूप खोलवर आहे. भाषा म्हणजे संस्कृतीची किल्ली!! मुलाने 'आजी' हा शब्द शिकला म्हणजे त्याने फक्त 'grandmother' या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय शिकला का? कदाचित नाही. 'आजी' या शब्दाबरोबर गोष्ट सांगणारी आजी येते. लाड येतात. सुट्टीतले दिवस येतात. स्वयंपाकघरातून येणारा पदार्थांचा nostalgic सुवास येतो. "जेवलास का?" या साध्या प्रश्नामागची काळजी येते. सण, परंपरा, नाती आणि आठवणींचे एक अख्खे जग त्या एका शब्दामागे उभे राहते. प्रत्येक भाषेत असे असंख्य शब्द आणि भावना असतात, ज्यांचे इंग्रजी भाषांतर करता येते; पण त्यांचा पूर्ण अनुभव भाषांतरित करता येत नाही. भाषा शिकताना मूल केवळ शब्द शिकत नाही. ते एका संस्कृतीत प्रवेश करत असते. गोष्टी, म्हणी, गाणी, विनोद, सणवार, नाती आणि रोजच्या संभाषणातून ते हळूहळू समजू लागते – आपल्या आधीच्या पिढ्या कशा जगल्या? त्यांनी नाती कशी जपली? संकटांना कसे सामोरे गेले? कुटुंब, समाज, कर्तव्य, आनंद, यश-अपयश यांकडे त्यांनी कसे पाहिले? आणि नकळत एक प्रश्न मनात रुजतो – "मी कुठून आलो आहे?" आपली मुळे समजण्याची सुरुवात कदाचित इथूनच होते. दोन भाषा, दोन संस्कृती आणि जगाकडे पाहण्याच्या दोन खिडक्या!!

भारताबाहेर वाढणारे मूल शाळेत एका सांस्कृतिक वातावरणात जगते आणि घरी कदाचित दुसऱ्या. सुरुवातीला ही दोन वेगवेगळी जगं भासतात. पण योग्य दृष्टीने पाहिले तर हीच त्याची मोठी ताकद ठरू शकते. कारण त्या मुलाला एकाच प्रसंगाकडे दोन वेगवेगळ्या खिडक्यांतून पाहण्याची संधी मिळते. एखाद्या गोष्टीवर आई-वडिलांची प्रतिक्रिया अशी का? आजी-आजोबांचा दृष्टिकोन वेगळा का? माझ्या native मित्राच्या कुटुंबात आणि आपल्या घरात घेतला जाणाऱ्या निर्णयाचा मार्ग असा वेगळा का? हळूहळू लक्षात येते की माणसाच्या प्रत्येक कृतीमागे केवळ तर्क नसतो. त्यामागे त्याचे अनुभव, संस्कार, नाती, भावना आणि सांस्कृतिक मूल्येही असतात. आणि इथेच भाषा शिकणे केवळ 'language skill' राहत नाही. ते life skill बनू लागते.

EQ ची एक वेगळी शाळा.
आज आपण IQ बरोबरच Emotional Intelligence – EQ – बद्दल खूप बोलतो. समोरच्याच्या भावना ओळखणे, त्याच्या भूमिकेतून विचार करणे, मतभेद असूनही संवाद साधणे, कठीण प्रसंगात स्वतःच्या भावनांना समजून घेणे आणि प्रत्येक गोष्ट फक्त 'बरोबर किंवा चूक' अशा दोन चौकटींत न पाहणे – हे सारे EQ चे महत्त्वाचे पैलू आहेत. मातृभाषा शिकल्याने EQ आपोआप वाढतो, असा सरळ दावा करता येणार नाही. पण दुसरी भाषा आणि तिच्यामागची संस्कृती मनापासून समजून घेण्याचा प्रयत्न मुलाला एक अतिशय मौल्यवान सवय लावू शकतो – वेगळ्या दृष्टिकोनातून जग पाहण्याची. शाळेत मित्राशी भांडण झाले, कॉलेजमध्ये वेगळ्या पार्श्वभूमीच्या लोकांबरोबर राहावे लागले, नोकरीत मतभेद झाले किंवा वैयक्तिक आयुष्यात एखादे नाते कठीण टप्प्यातून गेले – तर ही क्षमता उपयोगी पडते.
तो असा का वागला? फक्त या प्रश्नाऐवजी त्याच्या जागी मी असतो तर मला काय वाटले असते?" हा प्रश्न विचारण्याचा दृष्टिकोन येऊ शकतो. हा छोटासा बदल अनेक नाती बदलू शकतो.
आणि मग प्रश्न येतो – AI च्या युगात मराठी कशाला?
आजची मुले अशा जगात वाढत आहेत जिथे Artificial Intelligence आणि Machine Learning त्यांच्या शिक्षणापासून व्यवसायापर्यंत प्रत्येक क्षेत्रात असणार आहेत. AI भाषांतर करेल. प्रश्नांची उत्तरे देईल. माहिती शोधेल. अनेक कामे आपल्यापेक्षा वेगाने आणि अधिक अचूकपणे करेल. ही साधने शिकणे अत्यंत आवश्यक आहे. ती आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षमता अनेक पटींनी वाढवू शकतात. पण AI हे साधन आहे; माणूस समजून घेणे ही क्षमता आहे. माणसांशी नाती जोडण्यासाठी संवेदनशीलता, empathy, सांस्कृतिक जाण आणि भावनिक समज आवश्यक राहणारच आहे. आणि म्हणूनच मला वाटते, भविष्यात आपल्या मुलांना AI आणि ML जितके महत्त्वाचे असतील,
तितकेच आपल्या मुळांशी जोडणारे काही धागे जपणेही महत्त्वाचे असेल.
उद्या परदेशात वाढलेले आपले मूल भारतात जाईल. एखादी मराठी पाटी स्वतः वाचेल. हॉटेल मध्ये मराठीत पदार्थ मागवेल. भावंडांच्या विनोदावर मनापासून हसेल. आणि आजीने विचारलेल्या "जेवलास का रे?" या प्रश्नाला सहज म्हणेल – हो आजी, जेवलो. तू जेवलीस का?
तो छोटासा संवाद असेल. पण त्या चार शब्दांमध्ये दोन पिढ्यांमधले अंतर कमी झालेले असेल. दोन देश जोडलेले असतील. संस्कृतीचा एक धागा पुढच्या पिढीच्या हातात गेलेला असेल. आणि कदाचित त्याहून ही महत्त्वाचे म्हणजे, त्या मुलाला जगाकडे पाहण्यासाठी आणखी एक खिडकी मिळालेली असेल.
AI त्याला अधिक सक्षम बनवेल. मातृभाषा त्याला माणसे अधिक खोलवर समजायला शिकवेल. माझ्या मते, आपल्या मुलांना मातृभाषेतून मिळणारी हीच सर्वात सुंदर आणि दीर्घकाळ टिकणारी देणगी आहे.



-प्रसाद पुरोहित
(मुख्याध्यापक, PMM मराठी शाळा)
फिलाडेल्फिया, पेनसिल्व्हेनिया

मिशिगँडरी

अनेक दशकांपूर्वी 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये एक विनोद होता.
(तथाकथित) उच्चभ्रू समाजातील दोन स्त्रिया गप्पा मारताहेत.
उ. स. स्त्री १: "Hi, how are you? I heard that you are not going to Paris this year."
उ. स. स्त्री २: "Oh dear, that was last year! This year we are not going to Rome!"
साठेक वर्षांपूर्वीपर्यंत नोकरी धंदा आणि लग्नकार्य यासाठीच प्रवास होत असे. आनंदासाठी पर्यटन फक्त श्रीमंतांनाच परवडायचे. ते आता अर्थातच बदलले आहे. महाराष्ट्रात राजा ट्रॅव्हल्स, केसरी पाटील, वीणा वर्ल्ड आणि अमेरिकेत 'गेट वन'सारख्या दर्जेदार यात्रा कंपन्यांमुळे जगभरचा प्रवास आता सुकर झाला आहे. 'हे विश्वाचे आंगण, आम्हा दिले आहे आंदण रे' हे खरे ठरत आहे.
अनेक मराठी कळपांत, माझं ना स्पेन आणि फ्रान्स बघून झालंय, पण अजून पोर्तुगाल राहिलाय, किंवा, अरे, कमाल आहे! तुम्ही अजून आईसलँडला नाही गेलात? जा लवकर, खूप बघण्यासारखा आहे," अशी वाक्ये सर्रास ऐकायला येतात. आणि इथले उ. स. स्त्री/पुरुष असले ना, तर, युरोपला काय रे, हल्ली जो उठतो तो जातो. खरं सौंदर्य (संस्कृती, निसर्ग, माणुसकीः गाळलेल्या जागा भरा) पाहायचं असेल ना, तर तुम्ही आफ्रिकेला जा! असेही ऐकू येते. माझं काय बघून झालं आहे ते जाऊ दे; पण काय बघून झालं नाहीये, माहिती आहे का? माझं स्वतःचं राज्य मिशिगन!
पॅरिस, रोम, लंडन, स्पेन, आईसलँड (आणि आफ्रिका!)—या प्रभावळीत आमच्या मिशिगनचं स्थान म्हणजे, अंः डेट्रॉईटला एकदा गेलो होतो बहुतेक. ते मिशिगनमध्येच आहे ना? एवढंच. आमच्या राज्यात राहणाऱ्यांना लोक 'मिशिगँडर' म्हणतात. तर आता मी सांगते माझी मिशिगँडरी.
माझी मिशिगँडरी म्हणजे काय, तर जगभर फिरून झालं (नसलं) तरी आपल्या अंगणात काय आहे याची कल्पना नसणाऱ्यांसाठी एक शाब्दिक फेरफटका!
मिशिगन हा ओजिब्वे/अनिशिनाबे भाषेतून आलेला शब्द; अर्थ—मोठा तलाव वा मोठा जलाशय. नाव सार्थ करणारं हे राज्य आहे. पाचपैकी चार ग्रेट लेक्स त्याच्या भोवताली आहेत. मिशिगनमध्ये 'तुम्ही कुठे राहता?' हा प्रश्न विचारला की हाडाचा मिशिगँडर 'हाताचा पंजा' दाखवतो. देवाशपथ! हाताच्या मधल्या बोटाला तिरकी पताका लावली की अख्खं राज्य डोळ्यांसमोर उभं राहतं. हात आणि पताका यांना जोडणारा मॅकिनॉ (मॅकिनॅक) पूल! पताका म्हणजे अपर पेनिन्सुला. मन्रो (पताकेचं टोक) ते आयर्नवूड (अंगठ्याच्या खालचं हाड) यात किती अंतर आहे, माहीत आहे? ६२० मैल.

पताकेची लोकसंख्या कमी, तुरळक वस्ती, सुजलाम सुफलाम भूमी. डोळ्यांचं पारणं फिटेल असं तिथलं निसर्गसौंदर्य आहे. अंगठ्यावर राहणारे सगळे जल नौका आणि पाणीप्रेमी. भारतीय लोकं तिथे फक्त फिरायला जातात. कानून के हाथ लंबे असले तरी पटेल ब्रदर्सचे अजून तिथे फारसे हातपाय पसरले नसावेत. पण गरजही नाही; कारण तिथून तळहाताच्या मुळाशी असलेली डेट्रॉईटादि गावं अगदी जवळ आहेत.
अंगठ्यावरची काही छोटीशी गावं आपलं वेगळेपण सहजी जपतात. केसव्हिल (लोकसंख्या एक हजाराच्या आत) गेली २८ वर्षे एक 'बर्गर उत्सव' साजरा करते. पहिल्या वर्षी तीन दिवस साजरा झाला! आता दहा दिवसांच्या या उत्सवाला ५०,००० ते एक लाख लोक येतात—बर्गर खायला, थोडं नैसर्गिक तर थोडं कृत्रिम वातावरण अनुभवायला.
इझिबिगाडेक (Ezhibiigaadek) नावाचं एक गाव आहे—नावात काय आहे म्हणा! तिथली कातळशिल्पं जवळजवळ १,००० वर्षं जुनी आहेत. जेमतेम अडीचशे वर्षांच्या अमेरिकेत असं काही पुरातन मिळालं की इथली माणसं आनंदाने वेडी होतात. संवर्धन आणि संरक्षणासाठी त्या जागेला शाही बागेचा—स्टेट पार्कचा दर्जा देतात.

अंगठ्यावरून तळहातावर आलात तर मजाच मजा! बॅटल क्रीक ही सीरिअल्सची (कॉर्नफ्लेक्सची) राजधानी. दीडेकशे वर्षांपूर्वी डच लोक आले आणि त्यांनी डेट्रॉईट ते शिकागो या रस्त्याच्या मध्यभागी 'हॉलंड' हे गाव वसवलं. तिथे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ट्युलिप्स बहरून येतात आणि मग, अर्थातच, नयनरम्य 'ट्युलिप फेस्टिव्हल' असतोच.
खुद्द डेट्रॉईटचा महिमा वर्णावा किती, असा प्रकार आहे; पण त्याविषयी पुन्हा कधीतरी!
हातावर करंगळीच्या टोकाशी ट्र�ॅव्हर्स सिटी. ही जागतिक-हो, जागतिक-'चेरी कॅपिटल' आहे. ग्रँड ट्रॅव्हर्स उपसागराच्या सान्निध्यातलं हे शहर बोर्दो (फ्रान्स), न्होन व्हॅली आणि इटलीतील पिडमॉन्ट यांच्याबरोबर, आणि तितकंच, वाईनसाठी प्रसिद्ध आहे, ही महदाश्चर्याची गोष्ट आहे.
वाईन जगतात '४५वा समांतर' हा अक्षांश खूप महत्त्वाचा मानला जातो. त्या अक्षांशावर, बोर्दोप्रमाणेच, उत्तर मिशिगनमधील ट्रॅव्हर्स सिटीचा परिसर येतो. तिथल्या मारी वायनरीची एक सुंदर प्रथा होती. २१ जून - वर्षातला सर्वांत मोठा दिवस! आदल्या रात्री देशभरचे आणि जगभरचे अनेक वाईन उत्पादक तळघरात जमत. पहाटे सूर्योदयाची वेळ जवळ आली की सगळे तळघराच्या महाद्वारापाशी येऊन उभे राहत. सूर्योदयाच्या अवघ्या ३० सेकंद आधी तो दरवाजा उघडला जाई आणि सगळे 'ऐसा समां' पाहायला धावत बाहेर पडत. कधीकधी योगासनाचे वर्गही भरवले जात. हा द्राक्ष-रुद्राक्ष संस्कृतींचा मेळ पाहण्यासारखाच असे!
मी मिशिगनचं इतकं गुणगान करत आहे की एखाद्याला वाटेल, मला राज्यपाल व्हायचं आहे की काय! पण ती भीती नको. ठाणेदार (आमच्या मिशिगनचेच हो ते!) आणि व्हिट्मर यांच्यात चुरस झाली ती पुरेशी आहे.
शिक्षणक्षेत्रातील माझा प्रवास 'एक रात्र थांबू' म्हणत या राज्यात आला; आता वीस वर्षं होऊन गेली. आता 'इथेच टाका तंबू!'

कोरोनाच्या काळात बाहेरचे सगळे प्रवास बंद होते. तेव्हा माझे 'अंतःचक्षू' उघडणारे एक संकेतस्थळ फेसबुकवर उदयास आले –"Day Trip is in Michigan'. त्यावर फेरफटका मारला आणि 'तुझे आहे तुजपाशी' हे नव्याने जाणवलं.

त्यासाठी ही मिशिगँडरी!

फलश्रुती
उ. स. स्त्री १: "Hi, how are you? I heard that you are not going to Paris this year."
उ. स. स्त्री २: "Oh dear, that was last year! This year we are not going to Michigan!"

डॉ. ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर
ब्लूमफिल्ड हिल्स, मिशिगन



Lovers Leap in the Pictured Rocks National Lakeshore.



स्वस्तिक की हाकेनक्रॉइझ?

अमेरिकेच्या उत्तरपूर्व भागातील भारतीय समुदायाने खचाखच भरलेल्या राज्यात मी राहते. गुढीपाडव्याला घरोघरी गुढ्या उभ्या राहाव्यात, गणेश चतुर्थीला बाप्पाच्या आरत्यांनी घरं दुमदुमावीत, मकरसंक्रांतीला आकाशात पतंगांच्या साखळ्या दिसाव्यात आणि हे सगळं आजूबाजूला दिसणं अगदी स्वाभाविक वाटावं, इतक्या संख्येने भारतीय जनता इथं राहते. इथल्या 'पटेल'मध्ये जावित्रीपासून दुर्वांपर्यंत एकेक गोष्ट सहज मिळते.

मी राहते त्या नगरात भारतीयांची संख्या कदाचित १०-१५ टक्क्यांच्या आसपास असेल. पण याचाच अर्थ ८५-९० टक्के अभारतीय. त्यामुळं या भारतीय बहुल वातावरणात आपल्या परंपरा, श्रद्धा आणि सण जपताना इतर समुदायांच्या श्रद्धा, इतिहास आणि संवेदनशीलतांबद्दल सजग राहणंही तितकंच महत्त्वाचं ठरतं. याच संदर्भात इथे आल्यानंतर सातत्याने जाणवलेला एक वादाचा मुद्दा म्हणजे स्वस्तिक चिन्हाचा.
काही वर्षांपूर्वी एका भारतीय घराबाहेर उभ्या असलेल्या गाडीवर स्वस्तिकाचं चिन्ह पाहून, ते हाकेनक्रॉइझ असल्याचा गैरसमज झाल्याने एका ज्यू महिलेने गाडीवर आणि घराच्या दारावर निषेधाची शाई फेकली. तिथून सुरू झालेला हा विषय पुढे सोशल मीडियावर मोठ्या वादात रूपांतरित झाला. नेहमी अगदी घट्ट शेजारधर्म निभावणारी मंडळीही या प्रश्नावर वेगवेगळ्या बाजूंमध्ये विभागली गेली.

काही भारतीयांनी आपल्या शुभचिन्हाबद्दलची आस्था मनात ठेवत, आपल्या ज्यू मित्रमंडळींच्या ऐतिहासिक जखमा आणि भावनांचा आदर करण्यासाठी स्वस्तिकाचा सार्वजनिक वापर टाळण्याचा निर्णय घेतला. तर काहींनी, "हे आमच्या संस्कृतीचं आणि श्रद्धेचं प्रतीक आहे, कुणाला घाबरतो का आम्ही" असं म्हणत त्याचा वापर पूर्वीप्रमाणेच (त्वेषानं अंमळ थोडा अधिकच)सुरू ठेवला. दुसरीकडे, काही ज्यूंनीही भारतीय स्वस्तिक आणि नाझी हाकेनक्रॉइझ यांच्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक फरक समजून घेत भारतीयांची भूमिका स्वीकारली. काहींनी या विषयावर मौन बाळगणं पत्करलं. तर काहींनी सरळ, "दुसऱ्या देशातून इथे आलात, तर 'इथल्या' लोकांच्या इतिहासाचा आणि भावनांचा आदर करायला शिका," अशा शब्दांत ताशेरे ओढले.
अखेरीस अमेरिकेत आलेले सगळेच कुठच्या ना कुठच्या देशातूनच येऊन स्थायिक झालेले असल्यानं कोण कुठून आलं याचा या मुद्द्याशी असलेला-नसलेला संबंध जोडत त्यावर वाद-प्रतिवाद सुरू राहिले.
दर वर्षी दिवाळी जवळ आली की हा विषय पुन्हा पुन्हा प्रकर्षाने समोर येत राहतो. 'भारतीय समुदायाचा दिवाळी सण जवळ आल्याने, भारतीय संस्कृतीत शुभ मानलं जाणारं स्वस्तिक चिन्ह कुठे दिसलं, तरी त्याचा चुकीचा अर्थ घेऊ नका. ते तुमच्या विरोधात नाही ' अशा आशयाचे संदेश स्थानिक पोलिसांकडूनही दिले जातात. एकंदरीतच एका समाजासाठी हजारो वर्षांची शुभ परंपरा असलेलं हे चिन्ह जेव्हा दुसऱ्या समाजासाठी इतिहासातील एका अमानवी अध्यायाची आठवण करून देतं तेव्हा हा वाद केवळ एका चिन्हाचा उरत नाही. तो दोन वेगवेगळ्या ऐतिहासिक स्मृती, श्रद्धा आणि भावनांचा सामना होत जातो. म्हणूनच, या दोन अर्थांमध्ये संवादाचा एक पूल बांधण्याची गरज आहे.
पण या सगळ्या वादाच्या मुळाशी जाण्यापूर्वी, स्वस्तिक म्हणजे नेमकं काय आणि त्याचा इतिहास काय सांगतो, हे समजून घेणंही गरजेचं आहे.

<u>स्वस्तिकाचा प्राचीन इतिहास</u>
स्वस्तिक चिन्हाचा इतिहास सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीपर्यंत मागे जातो. नाझी जर्मनीने या चिन्हाचा वापर सुरू करण्याच्या कित्येक वर्षं आधीचा. संस्कृतमधील 'स्वस्तिक' हा शब्द 'सु' म्हणजे चांगलं आणि 'अस' म्हणजे असणं या धातूंपासून तयार झाला आहे. त्यातूनच 'स्वस्तिक'चा अर्थ शुभ, कल्याणकारी, मंगल असा होतो.
भारतीय परंपरेत स्वस्तिक हे समृद्धीचं आणि सौभाग्याचं प्रतीक मानलं जातं. धार्मिक विधींमध्ये, घरांच्या उंबरठ्यावर, मंदिरांच्या भिंतींवर, पूजेच्या साहित्यावर आणि विविध कलाकृतींमध्ये त्याचा वापर केला जातो. उजवीकडे वळणारं स्वस्तिक प्रामुख्याने सूर्य, ऊर्जा, शक्ती आणि सामर्थ्याशी जोडलं जातं. डावीकडे वळणारं स्वस्तिकही भारतीय परंपरेत आढळतं आणि त्याचा अर्थ आपोआप नकारात्मक होत नाही. त्यालाही विशिष्ट धार्मिक आणि सांस्कृतिक संदर्भ आहेत.
स्वस्तिक केवळ हिंदू धर्मापुरतं मर्यादित आहे असंही नाही. बौद्ध आणि जैन धर्मातही त्याला महत्त्वाचं स्थान आहे. बौद्ध धर्मात स्वस्तिक चिन्ह जीवनचक्र किंवा बुद्धाच्या पावलांशी संबंधित प्रतीक म्हणून आढळतं, तर जैन धर्मात ते चार गतिंचं, म्हणजेच चार अस्तित्वस्थितींचं प्रतिनिधित्व करतं. भारताबाहेरही या चिन्हाचा इतिहास दिसतो. ग्रीक-रोमन, सेल्टिक आणि काही नेटिव्ह अमेरिकन संस्कृतींमध्ये स्वस्तिकासारख्या आकृत्यांचा वापर विविध सकारात्मक किंवा धार्मिक अर्थांनी केला जात होता.
दुर्दैवानं विसाव्या शतकात एक काळा अध्याय आला आणि त्यानं या चिन्हाचा अर्थ अनेकांसाठी कायमचा बदलून टाकला.
'हाकेनक्रॉइझ'(Hakenkreuz) हा जर्मन शब्द साधारणपणे "hooked cross" असा अनुवादित केला जातो. नाझी पक्षाने स्वस्तिकासारख्या या प्राचीन चिन्हाला आपल्या राजकीय आणि वांशिक विचारसरणीचं प्रतीक म्हणून स्वीकारलं. १९२० मध्ये अडॉल्फ हिटलरच्या नेतृत्वाखाली नाझी पक्षाने आपल्या ध्वजाची रचना निश्चित केली आणि त्याच्या मध्यभागी काळ्या रंगाचं स्वस्तिक ठेवण्यात आलं. तथाकथित आर्यन वंशश्रेष्ठत्व, ज्यूविरोध, आक्रमक राष्ट्रवाद आणि वांशिक शुद्धतेच्या कल्पना नाझी विचारसरणीच्या केंद्रस्थानी होत्या. त्यांच्या प्रचारयंत्रणेने स्वस्तिकाला या विचारसरणीशी इतकं घट्ट जोडून टाकलं की हळूहळू स्वस्तिक चिन्ह नाझी सत्तेच्या सर्वव्यापी उपस्थितीचं प्रतीक बनत गेलं. ध्वज, पत्रकं, armbands, सरकारी इमारती, अधिकृत कागदपत्रं अशा नाझी राजवटीच्या जवळजवळ प्रत्येक दृश्य प्रतीकात ते दिसू लागलं. एका हजारो वर्षे जुन्या चिन्हाला नवा राजकीय अर्थ मिळत गेला. होलोकॉस्ट (Holocaust) या मानवी इतिहासातल्या एका क्रूर पर्वानंतर तर या अर्थाशी निगडीत संवेदनांना एक वेगळ्याच प्रतीचा आयाम मिळाला. होलोकॉस्टमध्ये नाझी जर्मनी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सुमारे साठ लाख ज्यूंची पद्धतशीरपणे हत्या केली. इतर लाखो लोकांनाही नाझींच्या छळाला आणि हत्यांना सामोरं जावं लागलं. या पार्श्वभूमीवर ज्यू समुदायासाठी नाझी स्वस्तिक हे केवळ एक चिन्ह राहिलं नाही. तर ते पराकोटीच्या अमानुषतेचं, वंशद्वेषाचं आणि लाखो जीवांच्या हत्येचं प्रतीक बनलं.
आपण अनेकदा असं गृहीत धरतो की एखाद्या चिन्हाचा एकच 'खरा' अर्थ आहे. प्रत्यक्षात चिन्हांचा अर्थ केवळ त्याच्या आकारातून ठरत नाहीच मुळी. तो समाज, धर्म, इतिहास, राजकारण आणि वैयक्तिक अनुभव यांच्या संगमातून तयार होत जातो. भारतीयांच्या घराच्या उंबरठ्यावर काढलेलं स्वस्तिक आणि नाझी ध्वजावरचं स्वस्तिक दिसायला जरी एकसारखं असलं, तरी त्या एकाच चिन्हामागचे संदर्भ आणि अर्थ पूर्णपणे वेगळे असू शकतात. हा फरक समजून घेणं हा या संपूर्ण वादाचा महत्त्वाचा भाग आहे.

भारतीयांच्या आणि ज्यूंच्या मनातलं स्वस्तिक

भारतात हजारो वर्षांपासून मांगल्याचं प्रतीक म्हणून वापरल्या जाणाऱ्या स्वस्तिकाला केवळ एक 'नाझी प्रतीक' म्हणून पाहिलं गेलं, तर भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा एक मोठा भागच नजरेआड केल्यासारखं असेल. एखाद्या कुटुंबानं आपल्या नवीन घरात प्रवेश करताना किंवा दिवाळीच्या दिवशी दारातल्या रांगोळीत जर स्वस्तिक काढलं तर त्यावेळी त्यांच्या मनात दुरान्वयेही नाझीवाद नसतो याची ग्वाही प्रत्येक भारतीय देऊ शकेल. स्वस्तिकाप्रती वाटणारा आदर आणि मनातल्या शुभ भावना भारतीयांना अतिशय जवळच्या वाटत असताना त्यावर दुसरे अर्थ लादले जाणं हे अन्याय्य वाटणं साहजिक आहे. नाझींनी या चिन्हाचा केलेला वापर जसा भयावह आणि निषेधार्ह आहे, तसाच त्यापूर्वी हजारो वर्षांचा असलेला त्याचा सांस्कृतिक आणि धार्मिक संदर्भ हेही एक वास्तव आहे.

अर्थात त्याच वेळी, ज्यू समुदायाची टोकाची प्रतिक्रिया समजून घेणंही तितकंच आवश्यक आहे. Holocaust ही केवळ इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात वाचायची घटना नाही. दुर्दैवानं ती ज्यू समुदायाच्या सामूहिक स्मृतीचा एक अत्यंत खोल, जिवंत आणि वेदनादायक भाग आहे. ज्यूंना समाजाच्या मुख्य प्रवाहातून हळूहळू बाहेर ढकलणाऱ्या आणि अखेरीस त्यांच्या पद्धतशीर संहाराकडे नेणाऱ्या व्यवस्थेच्या भाषेचा नाझी स्वस्तिक एक अविभाज्य अंग होतं आणि दुर्दैवानं स्वस्तिक चिन्हाची तीच ओळख ज्यूंसाठी अजूनही अस्तित्वात आहे. त्या चिन्हामुळं ज्यू समुदायाने अनुभवलेल्या छळाच्या आणि हत्येच्या स्मृती जर त्यांच्या मनात जाग्या होत असतील तर त्यांच्या सामूहिक स्मृतीत खोलवर कोरलेली ही भीती आणि वेदना इतरांनी समजून घेणं महत्त्वाचं आहे. त्यामुळं एखाद्या ज्यू व्यक्तीने स्वस्तिक पाहून अस्वस्थ होणं, त्या चिन्हाचा निषेध करणं म्हणजे भारतीय संस्कृतीचा अपमान, असं सरसकट गृहीतक मांडणंही योग्य नाही. या दोन्ही चिन्हांच्या आकारामध्ये असलेला फरक असाही एक युक्तिवाद काही वेळा मांडला जातो. US Holocaust Memorial Museum देखील स्पष्टपणे नमूद करते की नाझींनी स्वस्तिक या प्राचीन चिन्हाचं appropriation करून त्याला आर्यन वंश श्रेष्ठत्वाशी जोडलं आहे. म्हणून प्रत्येक स्वस्तिक नाझी चिन्ह आहे, असं म्हणणं ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचं ठरेल. पण नाझी स्वस्तिकाचा प्राचीन स्वस्तिकाशी संबंध नाही असं म्हणणंही तितकंच चुकीचं आहे.

अमेरिकेत तर हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतो. अमेरिका मुळातच स्थलांतरितांचा देश असल्यानं प्रत्येकाच्या स्वतंत्र इतिहासातून तयार झालेली ही समाजरचना आहे. जर भारतातून आलेली माणसं इथे स्वतःची भाषा, खाद्यसंस्कृती, इतर प्रतीकंही आणताहेत तर दुसऱ्या बाजूला युरोपमधून अमेरिकेत आलेल्या ज्यू समुदायांनी आपल्या इतिहासाच्या स्मृती, Antisemitism ची जाणीव,नाझी प्रतीकांची भीतीही स्वतःबरोबर आणली आहे. अमेरिकेत दोन स्थलांतरित समुदाय एकमेकांचे शेजारी म्हणून राहात असताना, त्यांच्या ऐतिहासिक स्मृतींची, संस्कृतीच्या अर्थांची टक्कर होणं स्वाभाविक आहे.

पुढचं पाऊल समजुतीचं

अखेरीस कितीही प्रयत्न केले तरीही हा वाद चालूच राहतो कारण एखाद्या चिन्हाचा इतिहास, त्याचे विविध सांस्कृतिक संदर्भ समजून घ्यायचा प्रयत्न केला तरी त्याशी निगडीत स्मृती केवळ तर्काने मिटवता येत नाहीत. या वादात कदाचित दोन्ही बाजूंनी काही सत्यं मान्य करणं गरजेचं आहे. भारतीयासाठी स्वस्तिकाचा अर्थ मांगल्याशी जोडलेला असून त्यात नाझीवाद नाही; आणि ज्यू व्यक्तीसाठी नाझी स्वस्तिकाची आठवण ही अतिशय वेदनादायक आहे. या दोन सत्यांपैकी एकच निवडण्याची गरज नाही. कारण इतिहासाचा एक टप्पा दुसऱ्या इतिहासाला पुसून टाकू शकत नाही. पण स्वतःच्या भावनांना उचलून धरताना दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करणं, दोन्ही सत्यं एकाच वेळी समजून घेण्याची क्षमता विकसित करणं हे प्रत्येकाचं नैतिक कर्तव्य निश्चितच आहे. ही परस्पर समजूत म्हणजे आपल्या स्वतःच्या इतिहासाचा त्याग नसून उलट पूर्ण मानवजातीचा एकत्रित इतिहास नव्या अर्थानं, अधिक प्रगल्भपणे समजून घेण्याचा प्रयत्न असेल. अखेरीस मुद्दा केवळ स्वस्तिकाचाही नाहीच. असं म्हणतात की
"We judge ourselves by our intent and others by the impact they cause'. एखाद्या गोष्टीमागची आपली भूमिका जपत असताना, त्याच गोष्टीचा समोरच्या व्यक्तीवर होणारा प्रभाव, त्यामागची दुसऱ्याची वेदना आपण ऐकू शकतो का? समोरच्याची वेदना मान्य करण्यासाठी स्वतःची ओळख सोडावी लागत नाही आणि आपली ओळख जपण्यासाठी समोरच्याच्या जखमेची उपेक्षा करावी लागत नाही. कदाचित तिथूनच संवाद आणि सहचर्याची सुरुवात होत असावी .

शिरीन म्हाडेश्वर
लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी





चित्रांची दुनिया



Artist: Anil Sawe



Artist: Medha Atre-Kulkarni



Artist: Radha Kirtane



Artist : Manjiri Kharkar



Artist : Manish Rajguru



Artist: Alka Vaidya

ह्यूस्टन महाराष्ट्र मंडळ

ह्यूस्टन महाराष्ट्र मंडळ यंदाच्या वर्षी सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. ५० वर्षांपूर्वी काही मराठी कुटुंबांनी एकत्र येऊन ह्यूस्टन मध्ये मराठी मंडळ स्थापन केले. हळूहळू मंडळाचा विस्तार झाला आणि आता मंडळाच्या चार शाखा आहेत –

विठ्ठल–रुक्मिणी मंदिर वास्तू, सांस्कृतिक शाखा, मोरया ढोल–ताशा आणि ज्ञानदीप मराठी शाळा.

या चारही शाखांच्या उपक्रमांमुळे ह्यूस्टन आणि परिसरातील उपनगरांमधील मराठी लोकांना एकत्र येऊन आपल्या महाराष्ट्रीय संस्कृतीचा सामूहिक आनंद घेता येतो.
आपली संस्कृती पुढील पिढीमधे रुजवण्याचे आणि वाढवण्याचे काम आमची ज्ञानदीप मराठी शाळा करते.
आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी HMM गणेशोत्सव कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला. गणेशोत्सवाचे वर्णन करणारे तीन लेख आमच्या चौथीच्या विद्यार्थिनी (सान्वी मेहेंदळे, प्राजना शिर्के, आणि अनिका आठवले) यांनी लिहिले आहेत.

गणेशोत्सव झाला आता वेध दिवाळीचे!
दिवाळीचा फराळ, फटाके अशी मजा तर असतेच . त्याचे वर्णन दुसरी इयत्तेच्या आरव पालकरने केले आहे. दिवाळीचा सण साजरा करताना प्रथम मानाचा मुजरा आणि भावपूर्णस्मरण शिवाजी महाराजांचे! याच भावनेने ओवी गावंडेने पायरोग्राफी (Pyrography) चे तंत्र वापरून शिवाजी महाराजांचे सुंदर कोरीव काम तयार केले आहे.
वृत्त मासिकाच्या वाचकांना विद्यार्थ्यांचे हे सादरीकरण आवडले अशी आशा आहे.

सान्वी मेहेंदळे– वय 12 इयत्ता चौथी BMM Level 4
लेख – ह्यूस्टन महाराष्ट्र मडंळ (HMM) गणेशोत्सव 2026
प्राजना शिर्के – वय 13 इयत्ता चौथी BMM Level 4
लेख – गणेशोत्सव 2026
अनिका आठवले– वय 12 इयत्ता चौथी BMM Level 4
लेख – गणरायाचा सण
ओवी गावंडे – वय 14 इयत्ता तिसरी BMM Level 3
कला – पायरोग्राफी (Pyrography) शिवाजी महाराज
आरव पालकर – वय 12, इयत्ता दुसरी BMM Level 2
लेख – दिवाळी – माझा आवडता सण



अनिका आठवले KATY SHALA चौथी

गणरायाचा सण

गणेश उत्सव हा महाराष्ट्रातील एक मुख्य सण आहे. आपण हा उत्सव दहा दिवसांनसाठी खूप उत्साहाने साजरा करतो. सणाची सुरुवात बाप्पाच्या आगमनानी, गणेश चतुर्थीच्या दिवशी होते. बाप्पा आपल्या घरात किंवा मंदीरात छान फुलांच्या आणि दिव्यांचा सजावटीत राहतो. गणेश उत्सवाच्या शेवटच्या दिवशी बाप्पाच्या मूर्तिचे विसर्जन करतात. आम्ही गणेशोत्सवाचा बेत्ती घरी मोदक बनवतो, आणि नैवेद्य दाखवून खूपसारे मोदक खातो. आम्ही रोज संध्याकाळी एकत्र गणपती ची आरती करतो. मला हा सण खूप आवडतो.



(एच. एम. एम.) गणेशोत्सव २०२६

सान्वी मेहेंदळे
वय: १२ - (बी. एम. एम) शाळा चौथी

- नमस्कार! आज, २६ सप्टेंबर, २०२६ रोजी, (एच. एम. एम.) ह्युस्टन महाराष्ट्र मंडळाचा पन्नासावा गणेशोत्सव होता. या वर्षी, पुण्याचा मानाचा कसबा गणपतीची प्रतिस्थापना करण्यात आली. हे वर्ष कसबा गणपतीचे पहिले अमेरिकेतले वर्ष होते.
- विठ्ठल-रुक्मिणी मंदीरात कसबा गणपतीची आगमन मिरवणूक व प्रतिस्थापना करण्यात आली. मोरया ढोल-ताशा पथक आगमन-मिरवणूकीत, दर वर्षी प्रमाणे, सहभागी झाले. आगमनाच्या थोड्या दिवसांनंतर, मंदीरात सहस्रावर्तन पठणाचा कार्यक्रम होता. मग, एका आठवड्यानंतर, (एच. एम. एम.) पन्नासावा गणेशोत्सवाचा दिवस आला, जवळ हजार लोक कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रम सुरु झाल्या नंतर, ढोल-ताशा पथकाचे आगमन-मिरवणूकीचे शाट्रीकरण होते. थोड्यावेळानी, वेगवेगळ्या नृत्यांचे शाट्रीकरण करण्यात आले. सातवे शाट्रीकरण म्हणजे माझे व माझ्या मैत्रिणींचे होते. आम्ही महाशिवरात्रीच्या गाण्यावर नृत्य सादर केले. आमच्या कथ्थकच्या गुरु मंजुषा जाधव यांनी आमचे नृत्य बसवले. नृत्य शाट्रीकरणांनंतर, ज्ञानदीप मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. मग, स्टेजवर काही मुलांनी व मोठ्यामाणसांनी अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण केले. ढोल-ताशाच्या गजरात, गणपतीचे विसर्जन करण्यात आले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. आशा रितीने, २०२६ चा गणेशोत्सव संपूर्ण झाला.
- गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा!

गणपती २०२६



ओवी गावंडे

क्ला- पायरोग्राफी (Pyrography)

My original pyrography artwork of Chhatrapati Shivaji Maharaj. Pyrography, the art of creating images by burning designs onto wood, is a unique and demanding medium that requires patience, precision, and creativity. Through this handcrafted artwork, I pay tribute to Chhatrapati Shivaji Maharaj, a symbol of courage, wisdom, and visionary leadership.

Created entirely by hand, this original piece reflects my admiration for his legacy of justice, self-rule, and service to the people. Each burned mark on the wood symbolizes the lasting impact of his ideals, which continue to inspire honor, resilience, and pride across generations.

Artwork by Ovee Ashish Gawande , Dnyandeep Marathi Shala



गणेशोत्सव २०२६

गणपती बाप्पा मोरया !!
आमच्या घरी बाप्पा बसतात. ह्या वर्षी आम्ही फुलांची सजावट केली होती. १४ तारखेला आई, बाबांनी मित्रपरिवाराला दर्शन, आरती, व महाप्रसादाला बोलवले होते. नंतर बाकीच्या दिवशी सुद्धा काहीजण आरतीला आले होते.
ह्युस्टन महाराष्ट्र मंडळात गणेशोत्सव होता. मी, माझा भाऊ, व माझ्या मैत्रिणी आम्ही ढोल ताशा पथकात झांज वाजवत होतो. आम्ही H.M.M विठ्ठल रुक्मिणी मंदीर, वि.पी.एस.एस हवेली, कॉलेज स्टेशन, (Aim University), आणि वडतालधाम ह्या ठीकाणी सादरीकरण केले. H.M.Mच्या गणेशोत्सवात मी कथ्थक सुद्धा केले. आमचे ८ जणींचे नृत्य होते. ह्या नृत्या मुळे माझ्या नविन मैत्रिणी झाल्या. हा सगळा कार्यक्रम खुप छान होता. आमच्या घरच्या गणपतीचे विसर्जन १८ तारखेला झाले आम्ही मग्गर आरती सुद्धा केली.
गणपती बाप्पा मोरया !!
पुढच्या वर्षी लवकर या !!

- ज्ञानदीप मराठी शाळा
(प्राजना शिर्के)
B.M.M शाळा ६. योथी



दिवाळी - माझा आवडता सण !

दिवाळी हा एक मोठा सण आहे. जगभर लोक हा सण साजरा करतात. हा सण कसा साजरा करतात ह्याची थोडी माहीती मी तुम्हाला देणार आहे.

दिवाळी चे पाच मुख्य दिवस आहेत -
1. धनत्रयोदशी - धन्वंतरी देव आणि यक्ष कुबेरांची पूजा केली जाते.
2. नरकचतुर्दशी - ह्या दिवशी श्री कृष्णाने नरकासुराचा वध केला. ह्या दिवशी, सूर्योदया पूर्वी अभ्यंगस्नान करतात.
3. लक्ष्मीपूजन - दिवाळीचा हा मुख्य दिवस. ह्या दिवशी लक्ष्मी देवीची पूजा केली जाते. दरवाजेर पणत्या, आकाशकंदील लावले जातात आणि रांगोळी काढली जाते.
4. बलिप्रतिपदा (पाडवा) - हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. ह्या दिवशी बली राजाची पूजा होते.
5. भाऊबीज - हा भाऊ आणि बहिणीच्या प्रेमाचा सण आहे.

मला दिवाळी बद्दल आवडणाऱ्या गोष्टी म्हणजे - दिवाळीचा फराळ, भेटवस्तू आणि दिवाळीची सजावट. त्याशिवाय, फटाके फोडण्याची आणि नातेवाईकांना / मित्रांना भेटण्याची मजेच वेगळी!

आरव पालकर
- H.M.M Dnyandeep Marathi Shala

पाऊस....

धुंद हवा पाऊस धारा
सैरावैरा सुसाट वारा

गंध मातीचा पसरे आता
फुल वेलीचे लहरे आता

पानांवर त्या थेंब साचती
जलधारा त्या चिंब नाचती

आकाश काळे भरून येई
पावसाचा सडा भिजवून जाई

पाऊस ओला भिजवी धरती
मनाच्या कोपऱ्यात कविता स्फुरती

– अंकिता कार्ले
हार्टफोर्ड, कनेटिकट

प्रेम!

बरसून गेला पाऊस पुन्हा,
का भासतो मला वेगळा;
डोह अथांग प्रेमाचा तुझ्या,
भिजवून गेला माझ्या मनाः!

डोळ्यात तुझ्या पाहिले जे,
का वाटते मला ओळखीचे;
ओथंबल्या आसवांचा संवाद हा,
भिजवून गेला माझ्या मनाः!

शब्द झाले अबोल आता,
गहिवर हा भावनांचा बोलता;
निर्झर निमळ प्रीतीचा तुझ्या,
भिजवून गेला माझ्या मनाः!

माझ्यात मी न आता राहिले,
तुझ्यात तुझे न काही उरले;
भिजवून गेला माझ्या मनाः!

–शुभदा जोशी– पारखी.
कोलंबिया,मेरीलँड.

निवांत सांज

निवांत सांज केशरी
जलद रास रेशमी
शिंपली चहुकडे
नभांत मंद मंजिरी

हरित गर्भ राई
शिरपेच कनक ल्याली
हलकेच सावलीला
दाटून ही बिलगली

चराचरांत जागी
स्थिर प्रशांत गूंज
तिमिर पांघरोनी
निःशब्द शांत नीज

निरव नील एकांत
ध्यानमय सुकांत
रमणीय संधिकाल
ज्योतिर्मय दिगंत

– चैत्राली काटे–यादव
बोस्टन, मॅसेच्युसेट्स

डेलावेर व्हॅली मराठी मित्र मंडळ (DVMMM)

नव्या कल्पना, उत्साहाला उधाण आणि आपुलकीने जोडलेली माणसे –२०२६ हे वर्ष DVMMM साठी आनंदाचे आणि अभिमानाचे ठरले! वर्षाच्या सुरुवातीला एक ध्येय मनाशी जपले होते–

आपले मराठी कुटुंब वाढवायचे आणि प्रत्येकाला "हे माझे मंडळ आहे!" असे वाटावे. जुनेसदस्य असोत किवा नव्याने आलेली कुटुंबे, प्रत्येकाचे तितक्याच प्रेमाने स्वागत व्हावे, यासाठी कार्यकारिणीने मनापासून प्रयत्न केले. वैयक्तिक संपर्क आणि जिव्हाळ्याच्या संवादातून सदस्य संख्या ६० कुटुंबांवरून तब्बल १११ कुटुंबांपर्यंत पोहोचली!

लहानांपासून ज्येष्ठां पर्यंत प्रत्येकाला सहभागी होता यावे आणि आनदांच्या आठवणी सोबत घेऊन जाता याव्यात, हाच प्रत्येक कार्यक्रमा मागचा विचार होता. मकरसंक्रांतीने या प्रवासाची सुरेल सुरुवात केली. आपल्या ज्येष्ठ सदस्यांच्या बासरी वादनाने आणि तबला वादनाने वातावरण भारावून गेले. खेळांतून हशा पिकला, तर चिमुकल्यांच्या हातांनी पतंगांवर कल्पनाचे रंग खुलले. गप्पा,भेटीगाठी आणि सणाच्या गोडव्याने जुन्या मैत्रीला उजाळा मिळाला आणि नव्या नात्यांची वीण गुंफली गेली. मार्च मधील महिला दिनाने प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकी यांची जोड दिली. महिलांच्या विविध भूमिका, स्वप्ने आणि आव्हानांवर मनमोकळा संवाद रंगला. स्तनाच्या कर्करोगावर मात केलेल्या महिलांचे अनुभव ऐकताना त्यांच्या जिद्दीने आणि धैर्याने सर्वांची मने जिंकली. या उपक्रमातून ASHA सस्थेसाठी १,६२५ डॉलरचा निधी उभारला आणि BMM च्या सर्व मडळां मध्ये निधि संकलनात चौथा क्रमांक मिळवला –आपल्या एकजुटीचा हा अभिमानास्पद क्षण!

गढीपाडवा आणि शिवजयंतीच्या सोहळ्यात मराठी संस्कृतीचा उत्साह दिमाखात झळकला! लेझीमच्या तालावर थिरकणारी पावले, ढोल–ताशांचा दणदणाट आणि 'कलामंच 'च्या बहारदार संगीत कार्यक्रमाने सभागृह दुमदुमले. परंपरा, अभिमान आणि मनोरंजनाचा हा स ंगम सर्वांच्या मनात घर करून गेला.

एप्रिल मध्ये DVMMM ची पहिलीच मैदानी होळी जल्लोषात रंगली! रंगांची उधळण, डीजेच्या तालावर थिरकणारी पावले आणि मित्र परिवारा सोबतचा धमाल वेळ लहान–मोठे सगळेच या आनदांत रंगून गेले. विविध फूड ट्रक्समधील चविष्ट पदार्थांनी सोहळ्याची लज्जत आणखी वाढवली!

जून मध्ये योग दिनानिमित्त मोकळ्या हवेत योगासने आणि ध्यानाचा अनुभव घेत स्वतःसाठी निवांत क्षण जपले.

जुलच्या सहलीत बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला, तर ऑगस्टच्या कॅम्पिंग मध्ये निसर्गाच्या सान्निध्यात गप्पा, खेळ आणि शेकोटी भोवतीच्या मैफिली रंगल्या. एकत्र घालवलेल्या या क्षणांनी आपुलकीचे बंध आणखी घट्ट केले.

या वर्षातील आणखी एक महत्त्वाचा सांस्कृतिक टप्पा म्हणजे सुप्रसिद्ध कलाकारांचे 'असेन मी नसेन मी' हे नाटक आपल्या समुद्रायासाठी सादर करण्याची संधी! दर्जेदार मराठी रंगभमूीचा प्रत्यक्ष अनभुव आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यांमुळे हा सोहळा खास ठरला. महाराष्ट्रापासून दूर राहूनही आपल्या भाषा आणि कलेशी असलेले नाते यानिमित्ताने नव्याने उजळले.

सप्टेंबर मध्ये बाप्पाच्या आगमनाने अवघे DVMMM कुटुंब भक्तिरंगात न्हाऊन निघाले! सात दिवस सदस्यांनी प्रेमाने केलेली हार अर्पण करण्याची, प्रसादाची आणि आरतीची सेवा मनाला स्पर्शून गेली. मुख्य सोहळ्यात स्थानिक नाटक, विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आणि ढोल–ताशा व लेझीमच्या जोश पूर्ण सादरीकरणातून आपल्या समुदायाचे कलागुण बहरले. सर्वांच्या आवाजात घुमलेली आरती आणि "पुढच्या वर्षी लवकर या!" म्हणत बाप्पाला दिलेला निरोप अविस्मरणीय ठरला. आता उत्सुकता आहे दिवाळीची! 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आपल्या भेटीला आणण्याचे नियोजन सुरु आहे. या उत्साहाच्या वळणावर मागे वळून पाहताना मन भरून येते आपल्या माणसांनी दिलेल्या प्रेमाने आणि साथीने.

संपूर्ण वर्षभर प्रत्येक कार्यक्रमासाठी मनापासून झटणाऱ्या कार्यकारिणीचे विशेष कौतुक आणि मनःपूर्वक आभार!

घर, नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून या संघाने मंडळासाठी दिलेला वेळ आणि घेतलेली मेहनत अमूल्य आहे. नव्या कल्पना सुचवण्यापासून ते नियोजन, भोजन व्यवस्था, सजावट, तांत्रिक तयारी आणि कार्यक्रमानंतरची आवराआवर करण्यापर्यंत प्रत्येकाने जबाबदारी आपली मानून ती पार पाडली. एकमेकांना साथ देत, अडचणींवर मार्ग काढत आणि प्रत्येक कार्यक्रम अधिक सुंदर करण्यासाठी धडपडणाऱ्या या सघांचा मनापासून अभिमान वाटतो!

कार्यकारिणीच्या या प्रयत्नांना बळ दिले ते आपल्या मंडळातील सदस्यांनी. आपल्या कलेने कार्यक्रम खुलवणारे कलाकार, गरजेच्या वेळी तत्परतेने पुढे येणारे स्वयंसेवक, विश्वासाने आर्थिक पाठबळ देणारे देणगीदार आणि प्रायोजक, तसेच उत्साहाने सहभागी होणारे प्रत्येक सदस्य –आपणा सर्वांचे मनःपर्वूक आभार!

कुणी पदार्थ बनवून आणले, कुणी सजावटीला हातभार लावला, कुणी मुलांना सांभाळले, तर कुणी कार्यक्रम सपंल्या नंतरही थांबून आवराआवर केली.

या प्रत्येक छोट्या–मोठ्या योगदानातून आपल्या मंडळातील आपुलकी अनुभवायला मिळाली.

आपल्या ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन, तरुणांची ऊर्जा आणि चिमुकल्यांचा आनंद यांमुळे या वर्षातील प्रत्येक भेट खास झाली.

नव्याने आलेल्या कुटुंबांनीही आपलेपणाने सहभाग घेतला आणि आपल्या DVMMM कुटुंबाला नवी उमेद दिली. आपण सर्वांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याचे धैर्य मिळाले.अध्यक्ष म्हणून या संघासोबत काम करता आले आणि आपल्या सर्वांची साथ लाभली, यासाठी मी मनापासून कृतज्ञ आहे.

या वर्षातील सुंदर आठवणींवर आपल्या प्रत्येकाचा ठसा आहे. हे प्रेम, हा विश्वास आणि एकमेकांसाठी

पुढे येण्याची भावना अशीच जपूया आणि आपल्या DVMMM कुटुंबाचा आनंद आणखी अनेकांपर्यंत पोहोचवू या!

डेलावेर व्हॅली मराठी मित्र मंडळ (DVMMM)













कॅलगरी मराठी असोसिएशन(CMA)

CMA साठी हे वर्ष उत्साह, संस्कृती आणि समाजाशी नातं जोडणाऱ्या अनेक अर्थपूर्ण उपक्रमांनी भरलेलं ठरलं. केवळ आपल्या समाजापुरतं मर्यादित न राहता, मराठी संस्कृतीचा कॅलगरीमधील व्यापक समुदायाला परिचय करून देण्यावर यंदा विशेष भर देण्यात आला.
Calgary Stampede मधील CMA चा सहभाग हे यंदाच्या वर्षातील एक ठळक आकर्षण ठरलं. या सहभागाचं पाचवं वर्ष साजरं करताना, "From the Himalayas to the Rockies" या संकल्पनेवर आधारित, पहिल्यांदाच तयार केलेला १२ फूट उंचीचा खास त्रिमितीय फ्लोट हजारो कॅलगरीवासीयांचं लक्ष वेधून घेण्यात यशस्वी ठरला.

कॅलगरी गणेश महोत्सव – कॅलगरीचा राजा आणि गुढी पाडवा हे ही वर्षातील महत्त्वाचे सोहळे ठरले. गणेशस्थापना, आरती, सांस्कृतिक कार्यक्रम, ढोल-ताशा आणि विविध उपक्रमांमुळे समाज एकत्र आला, तर गुढीपाडव्याने मराठी नववर्षाचं उत्साहात स्वागत केलं..

पुढच्या पिढीशी नातं जोडण्याच्या दृष्टीने मराठी शाळा महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भाषा शिकवण्याबरोबरच विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना आपल्या मुळांशी जोडून ठेवण्याचं काम शाळा सातत्याने करत आहे.

CMA चं ढोल-ताशा पथक आता कॅलगरीतील मराठी संस्कृतीचा एक उत्साही दूत बनलं आहे. Calgary Stampede, Heritage Day Festival, IndiYEAH Fest आणि ISKCON रथयात्रा यांसारख्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत, पथकाने महाराष्ट्राची ऊर्जा आणि परंपरा व्यापक समुदायापर्यंत पोहोचवली.

याशिवाय Blood Donation Drives आणि Bottle Drives यांच्या माध्यमातून CMA कॅलगरीच्या व्यापक समुदायासाठीही योगदान देत आहे.
या सर्व उपक्रमांमागचा उद्देश एकच—आपला सांस्कृतिक वारसा जपणं, तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणं आणि अभिमानाने व्यापक समुदायासोबत शेअर करणं.
हे सर्व शक्य होतं ते CMA चे स्वयंसेवक, कलाकार, आयोजक, प्रायोजक आणि सदस्य यांच्या अथक योगदानामुळे.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार!





कॅलगरी मराठी असोसिएशन(CMA)











साहित्य शब्दकोडे

(रचना – गुरुप्रसाद दि. पणदूकर)



आडवे शब्द :-	उभे शब्द :-
१] थोर साहित्यिक 'कुसुमाग्रज' यांचे आडनाव	१] 'काळ'कर्ते साहित्यिक – 'X X' परांजपे
७] नटरंग, झोंबी, नांगरणी, संतसूर्य तुकाराम अश्या प्रसिद्ध साहित्यकृतींचे लेखक – 'XXX , XXX'	२] 'बगळ्यांची माळ फुले' सारख्या अनेक लोकप्रिय गीतांचे कवी, गीतकार – 'X X' कांत
११] ग्रामीण पार्श्वभूमीवरच्या उत्तमोत्तम साहित्यकृती देणारे लेखक – 'XXX' पाटील	३] कोंकणी ग वस्ती, भाकरी आणि फूल सारख्या प्रसिद्ध पुस्तकांचे लेखक – मधु मंगेश 'XXX'
१३] संत तुकाराम यांचा एक प्रसिद्ध अभंग – 'XX' अंगी मोठेपण। तया यातना कठीण	४] शाहू छत्रपती, फुले, टिळक, सावरकर, आंबेडकर आदी थोर पुरूषांचे चरित्रकार – 'XXXX' कीर
१४] लोकप्रिय पात्र 'फास्टर फेणे'चे जनक लेखक – भा.रा. 'XXXX'	५] विजय तेंडुलकर यांची लेखिका, कवयित्री, अभिनेत्री कन्या
१५] अनेक प्रसिद्ध इंग्रजी पुस्तकांचे अनुवादकार व लेखक – 'XXX' देवधर	६] गो.नी.दांडेकर यांची साहित्यिका कन्या – वीणा 'xx'
१७] उपनिषद काळातील ऋषी याज्ञवल्क्य यांची पत्नी	८] 'बलुतं'कार दलित चळवळीतील अग्रणी साहित्यिक

असणाऱ्या विदुषीवरील अरुणा ढेरे यांची कादंबरी	लेखक – 'XX' पवार
१८] प्रसिद्ध कामगार नेते मनोहर नरे यांचे आत्म–चरित्र – 'माझ्या जीवनाचा 'XX' कोहिनूर'	९] गाजलेल्या बालगीतांचे कवी 'दत्त' यांचे पूर्ण नाव –'XXXX' कोंडो घाटे
२३] सतराव्या शतकातील 'पंडिती काव्या'चे अग्रणी आणि विद्वान कवी – 'XXX , XXX'	१०] खेळिया, वाटा पळवाटा यासारखी विख्यात नाटके लिहिणारे नांदेड येथील साहित्यिक – दत्ता 'XXX'
२८] कवी 'त्र्यंबक बापूजी ठोंबरे' यांचे टोपणनाव	११] खुमासदार लेखनासाठी प्रसिद्ध वाईचे दिवंगत साहित्यिक डॉक्टर – 'XXX' अभ्यंकर
३१] संगीतावर अनेक पुस्तके लिहिणारे समीक्षक, लेखक आणि शास्त्रीय संगीतविशारद – अशोक 'XXX'	१२] 'वॉर्ड नंबर पाच, केईएम' पुस्तकाचे लेखक–डॉक्टर – 'XX' बापट
३२] थोर मराठी कवी, चतुरस्त्र लेखक, वृत्तपत्रकार, संपादक – अनंत 'XXXX'	१६] 'महात्म्याची अखेर' या गांधीजींवरील पुस्तकाचे लेखक व पत्रकार – 'XXX' फडणीस
३३] शापित यक्ष, प्रेमग्रंथ, तो एक राजहंस इत्यादी लोकप्रिय पुस्तकांचे लेखक – 'XX' सामंत	१९] कोकणातील ग्रामीण पार्श्वभूमीवरील अनेक पुस्तके लिहिणारे लेखक - 'X X' दिघे
३५] 'मॅडम कमिशनर' सारख्या पुस्तकांची पोलिस अधिकारी लेखिका – 'XX' बोरवणकर	२०] मधू मंगेश कर्णिक यांची गाजलेली कादंबरी – माहीमची 'XX'
३६] 'घाल घाल पिंगा वा–या माझ्या परसात' सारख्या लोकप्रिय गीतांचे कवी – 'X X' निकुंब	२१] अक्कलकोट येथील फौजदारी वकील असणारे लोकप्रिय कादंबरीकार – 'xx' कदम
३७] ज्येष्ठ लेखिका, संपादिका, पत्रकार – संजीवनी 'XX'	२२] 'ताजमहाल नव्हे तेजोमहालय' इत्यादी अनेक पुस्तकांचे लेखक – पु.ना. 'xx'
३८] मराठी-हिन्दी चित्रपटकथा लेखक, साहित्यिक, संपादक – 'X X' कामत	२४] दुर्बोध मानले जाणारे एक प्रसिद्ध कवी, लेखक, समीक्षक – बा.सी. 'XXXX'
३९] आनंद साधले यांचे महाभारतावरील प्रसिद्ध पुस्तक – हा 'XX' नावाचा इतिहास आहे	२५] पंडिती काव्यपरंपरेतील एक श्रेष्ठ कवी – मोरो'XX'
४१] मराठवाड्यातील व्यासंगी समीक्षक व लेखक – सुधीर 'XXX'	२६] आंबेडकरी चळवळीतील लेखक शंकरराव खरात यांचे आत्मचरित्र – 'xxx' अंतराळ
४३] शिवाजी सावंतांची संभाजी महाराजांवरील लोकप्रिय कादंबरी	२७] पांचजन्य, परब्रम्ह अश्या पुस्तकांचे लेखक व लोकप्रिय कादंबरीकार – रामचंद्र 'XXXX'
४४] प्रसिद्ध मराठी शाहीर, कवी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते – 'XXX' दादा कर्डक	२९] 'स्मृतिचित्रे' आत्मचरित्राच्या लेखिका – 'XX'बाई टिळक
४७] सुनीताबाई देशपांडे यांचे गाजलेले आत्मकथन – आहे मनोहर 'XX'	३०] राधामाधवविलासचंपू, भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास इत्यादी ग्रंथांचे लेखक – 'X, X, XXXX'
४८] दुर्गा भागवत लिखित 'चिंतनिका'मध्ये 'या' लेखकाच्या निबंधांचा अनुवाद आहे – हेन्री 'XXX' थोरो	३३] लोककला व लोकसंस्कृती विषयांवरील नावाजलेल्या लेखिका – सरोजिनी 'XXX'
४९] मराठवाड्यातील एक थोर लेखक व कवी – बी. 'XX'नाथ	३४] मौज प्रकाशनचे, सत्यकथा मासिकाचे प्रकाशक – श्री.पु. 'XXXX'
५०] प्रसिद्ध प्राध्यापक, साहित्यिक आणि समीक्षक – 'X X' कुलकर्णी	३७] नामदेव ढसाळ यांचा शृंगारिक कवितांचा काव्यसंग्रह
	४०] गोविंदाग्रजांचे पूर्ण नाव – 'XX' गणेश गडकरी
	४२] 'श्यामची आई' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक – पांडुरंग सदाशिव 'XX'
	४४] साहित्यिका, शिक्षिका, 'मराठी विश्वकोश मंडळा'च्या माजी अध्यक्षा – विजया 'XX'
	४५] प्रकांड पंडित, चरित्रलेखक, इतिहाससंशोधक, संतवाङ्मयाचे चिकित्सक व समीक्षक – 'X X' फाटक

BMA
बृहन्महाराष्ट्र मंडळ

BMA बृहन्महाराष्ट्र मंडळ
वृत्त
|| मराठी तितुका मेळवावा ||

स्वराज्यदीप

विशेष दिवाळी अंक २०२६

डिजिटल पुरवणी

अनुक्रमणिका

अ आ इ ई... ते बेस्ट सेलर (डॉ. राजश्री शिरभाते) ६५
अंगणातल्या झाडांचे संदर्भ (किरण शिवहर डोंगरदिवे) ६७
आज सीमोल्लंघन करुयाच! (रसिका दास्ताने - सांगवीकर) ६८
देश बदलतोय...(सुरेश सिताबाई किसन सरगर) ६९
व्यथा एका विशेष मुलाच्या पालकांची...(गीता वारे) ७२
स्वातंत्र्य भास्करा (श्रीप्रकाश सप्रे) ७४

.

अ आ इ ई... ते बेस्ट सेलर

सकाळच्या वेळी मुंबईच्या रस्त्यांवर अपेक्षेप्रमाणे गर्दी होती आणि आमची कार त्यातून मार्ग काढत जुहूवरील ग्रंथ संपदा बुक स्टोअरकडे चालली होती.

माझी नजर खिडकीतून बाहेर पडली आणि एका मोठ्या इमारतीचे काम सुरू असलेल्या जागेवर पडली. बाजूलाच बिल्डिंग साईटवर काम करणाऱ्या लोकांची घरे होती. जवळच छोटी मुले-मुली खेळण्यात गर्क होती. मी त्यांच्याकडे पाहिले आणि नकळत मला राधाची आठवण झाली. छोटीशी, चुणचुणीत, गोड आणि निष्पाप दिसणारी राधा...

माझे मन त्या आठवणींमध्ये गुंतले...

मी नुकतीच लग्न होऊन नागपूरहून मुंबईला आले होते. हळूहळू मी आमच्या संसारात आणि मुंबईत रमत होते. लग्नापूर्वी मी नागपूरच्या कॉलेजमध्ये बॉटनी शिकवत होते आणि आता मुंबईत नोकरीच्या शोधात होते. माझा आर्किटेक्ट नवरा एका मोठ्या कंपनीत नोकरी करत होता आणि तो दिवसभर घराबाहेर असायचा.

आमच्या फ्लॅटच्या बाजूलाच एका मोठ्या बिल्डिंगचे काम सुरू होते. त्या बिल्डिंग साईटवर काम करणाऱ्यांची मुले सतत बाहेर खेळत असायची. मला आश्चर्य वाटायचे, "या मुलांच्या शाळेचे काय?"

काही दिवसांनी माझी शेजारी राहणाऱ्या नेहाशी मैत्री झाली. मी कामासाठी बाईच्या शोधात होते. नेहाने मला सांगितले, "पार्वती खूप चांगली आहे. तू तिला तुझ्याकडे कामासाठी ठेवून घे." मी नेहाकडे पार्वतीला पाहिले होते आणि ती मला आवडली होती.

लवकरच पार्वतीने माझ्याकडे काम सुरू केले. पार्वती रोज सकाळी दोन तास माझ्याकडे काम करायची. पार्वतीबरोबर तिची चार वर्षांची मुलगी राधाही यायची. आई काम करत असताना राधा तिच्या बाहुलीसोबत खेळायची.

मी एकदा पार्वतीला म्हटले, "पार्वती, तू राधाला शाळेत का नाही घातले?"

पार्वती म्हणाली, "ताई, माझा नवरा बिल्डिंग साईटवर काम करतो. वर्ष-दीड वर्ष झाले की इथले काम संपते आणि आम्ही दुसरीकडे जातो. मग प्रत्येक वेळी शाळा कशी बदलणार? मी गावाकडे सातवीपर्यंत शिकले आहे आणि मला खूप वाटतं की राधाने शिकावं. पण माझा नवरा म्हणतो, 'आपली राधा शिकून काय साहेबीण थोडी होणार आहे? घालू तिला शाळेत जरा मोठी झाल्यावर!'"

माझ्यातील शिक्षिकेला चैन पडेना. एक दिवस मी पार्वतीला म्हटले, "पार्वती, मला वेळ आहे. तुझी इच्छा असेल तर मी राधाला शिकवत जाईन."

पार्वतीला गहिवरून आले. ती म्हणाली, "ताई, तुमच्याकडून राधाला शिकायला शिकवणी मिळणार, ही तर खूपच आनंदाची गोष्ट आहे."

दुसऱ्या दिवशीपासून मी राधाला शिकवायला सुरुवात केली—अ आ इ ई...

मी राधाला रोज एक तास शिकवायचे. राधा हुशार होती. मन लावून शिकत होती. तिला शिकायची खूप आवड होती. राधाच्या निरागस डोळ्यांत मला भविष्याची अनेक स्वप्ने दिसत होती; फक्त त्यांना योग्य दिशेची गरज होती.

सहा महिन्यांनी मला नोकरी मिळाली आणि लवकरच मी कॉलेजमध्ये रुजू होणार होते.

मी पार्वतीला म्हटले, "पार्वती, राधा खूप हुशार आहे. तिला शिकायची आवड आहे. तू तिला आपल्या जवळच्याच सरकारी शाळेत घाल. मी रविवारी तिला लागेल ते मार्गदर्शन करत जाईन. मला वाटतं की तुम्ही लोकांनी या साईटवरून त्या साईटवर भटकत राहण्यापेक्षा एकाच ठिकाणी स्थायिक व्हावं. तुलाही आता पाच-सहा घरची चांगली कामे आहेत. तुझा नवरा इथले बिल्डिंगचे काम संपल्यानंतर दुसरे काही काम किंवा छोटासा व्यवसाय करू शकतो."

पार्वती म्हणाली, "ताई, तुम्ही अगदी माझ्या मनातलं बोललात. मलाही असंच वाटतं. बघते, माझ्या नवऱ्याला पटवता येतं का ते. ताई, खरंच... घर बदलणं सोपं असतं हो; पण विचार बदलले की पिढ्यांचे भविष्य बदलते."

त्याच वर्षी राधाची शाळा सुरू झाली. राधा दर रविवारी थोडावेळ माझ्याकडे यायची. तिला शाळा आवडली होती. छान मैत्रिणी मिळाल्या होत्या. राधा खूप खुश होती.
पार्वतीने आपल्या नवऱ्याला पटवले. त्याच्या मनातील जुन्या बुरसटलेल्या प्रथा-परंपरांचे मळभ निवळले होते आणि आता सारे स्वच्छ, निरभ्र झाले होते. त्याने छोटेसे किराणा मालाचे दुकान सुरू केले. या व्यवसायात शारीरिक कष्ट कमी असल्यामुळे तोही आनंदी होता.

आमच्या संसारातही सौरभ आणि ऋतुजाचे आगमन झाले आणि राधा त्यांची ताई झाली.

राधाने शाळेत खूप छान प्रगती केली होती. तिचे वाचन अफाट होते आणि मराठी ही तिची आवडती भाषा होती. राधा खूप छान लिहायची. वर्तमानपत्रांतील तिचे लेख, मासिकांतून प्रकाशित होणाऱ्या तिच्या कथा वाचून तिची लेखनशैली आणि तिची प्रतिभा पाहून मला खूप आनंद व्हायचा. हळूहळू राधा साहित्यविश्वात आपले स्थान निर्माण करत होती.

योग्य वेळी राधाला तिच्या मनासारखा, तिला तिच्या जीवनात साथ देणारा छान जीवनसाथी मिळाला होता आणि राधा आनंदात होती. आमचे सौरभ आणि ऋतुजाही लग्ने होऊन आपापल्या संसारात रमले होते.
खरंच, क्षणात ओघळून गेलेल्या त्या मधल्या वर्षांची चाहूलही लागली नाही...

आता लेखन राधासाठी छंद राहिला नव्हता; ते तिच्या जगण्याचा श्वास बनले होते. छोट्या कथा, वर्तमानपत्रांतील लेख, दिवाळी अंकातील साहित्य अशा अनेक टप्प्यांतून तिची लेखणी अधिकाधिक प्रगल्भ होत गेली. आणि मग एक दिवस तिने पहिली कादंबरी लिहायला घेतली—'जीवनाचे स्वर छेडताना'.

राधाने एक सुरेख कादंबरी लिहिली. तिच्या कादंबरीतील शब्दलावण्य अप्रतिम होते. स्वतःच्या अनुभवातून, तसेच दुसऱ्यांच्या अनुभवांच्या शिदोरीतून लिहिलेल्या त्या कादंबरीत जशी हळूहळू पहाटेचा लालिमा पसरत जाऊन सूर्याचे बिंब उजळत जाते, तसा राधाने आपला विषय रंगवत नेला होता. राधाने नुसते शब्द लिहिले नव्हते; तिने आयुष्य जगून ते शब्दांत उतरवले होते. राधाची कादंबरी 'बेस्ट सेलर' झाली होती. 'अ' पासून सुरू झालेला तिच्या साक्षरतेचा प्रवास एक दिवस असंख्य वाचकांच्या मनापर्यंत पोहोचेल, याची कल्पनाही तेव्हा मला नव्हती.

आज राधा ग्रंथ संपदा बुक स्टोअरमध्ये आपल्या चाहत्यांना तिच्या पुस्तकावर स्वाक्षरी देणार होती. राधाने आग्रहाने मला बोलावले होते. ती म्हणाली, "ताई, माझा 'अ आ इ ई... ते बेस्ट सेलर' हा प्रवास तुमच्यापासूनच सुरू झाला. माझ्या पुस्तकावर पहिली स्वाक्षरी मी तुमच्यासाठी करणार."

ड्रायव्हरने आमची कार पार्किंगमध्ये पार्क केली आणि माझी विचारशृंखला तुटली. मी समाधानाने कारमधून उतरून ग्रंथ संपदा बुक स्टोअरच्या दिशेने चालू लागले. माझे मन राधाला भेटायला आणि तिचे मनापासून अभिनंदन करायला उत्सुक झाले होते.

मला पाहताच राधाने लगेच पुढे येऊन मला नमस्कार केला. मीही तिला भरभरून आशीर्वाद दिला.

राधाने तिची एक कादंबरी घेतली आणि त्यावर स्वाक्षरी करू लागली...

त्या क्षणी मला जाणवले—'अ आ इ ई' शिकवताना मी तिला अक्षरांची ओळख करून दिली; पण त्या अक्षरांनीच आज तिची जगाशी ओळख करून दिली होती.

चार वर्षांच्या राधाच्या हातात मी एके दिवशी पाटी-पेन्सिल दिली होती; आज त्याच हातात हजारो वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे पुस्तक होते.

माझे मन गहिवरून आले आणि आनंदाने नकळत माझे पापणकाठ ओलावले. हे अश्रू समाधानाचे, अभिमानाचे आणि एका शिक्षिकेच्या आयुष्याला लाभलेल्या सर्वात मोठ्या पुरस्काराचे होते.

डॉ. राजश्री शिरभाते
चेस्टर-ले-स्ट्रीट, डरहम काउंटी (इंग्लंड)

अंगणातल्या झाडांचे संदर्भ

तशी झाडं सजीव असतात

हे अगदी लहानपणीच शिकलो होतो

मात्र झाडं संवेदनशील असतात

हे ही शिकलो प्रसंगानुरूप...

म्हणजे त्याचं झालं असं

आईनं लावलेलं बोरीचे झाड

गच्च बोरांनी लगडायचे;

पोरांचे दगड आणि झाडावरची बोर

टिनपत्रावर टपटप वाजायचे .

बेरीवाला बच्चा म्हणून दोस्ता मित्रात

आमचीही वट होती बरं...

हो ती दिवाळीचे लाडू आणि शीरखुर्मा

एकत्र खाणारी वस्ती होती हे ही खरं...!

पुढे एका उन्हाळ्यात

आई आयुष्यभर पुरेल इतकं

ऊन पदरात टाकून निघून गेली;

अन सलग तीन चार वर्षे ...

अंगणातली बोर रुसून गेली .

मग एकदा दहाबारा बोर नेमकी दिसली

नवलाईची ती आम्ही हिरवीच ओरबाडली ...

बाप म्हणाला

अरे तिच्या हाताचं ते झाड

तिच्या फोटो पुढे ठेवा मानाचं एखादं...

आम्ही आज्ञा मानून

ते पडलं फळ

वाहिलं आईच्या फोटोला

हातही जोडले असतील त्यावेळी बहुदा

कारण पुढे कुणाला हात जोडल्याचे

बिलकुलच आठवत नाही.

... तर श्रद्धा अंधश्रद्धेच्या पल्याड

बोर लगडली त्यावर्षी भरगच्च

अन बहरत राहिली लाल हिरव्या बोरांनी

आम्ही ते घर सोडेपर्यंत

कायम न रूसता.....

पुढे नव्या घरासमोर बदाम तराराला

आणि रणरणत्या उन्हात

आयुष्याचा उन्हाळा करणाऱ्या दिवशी

अवखळ वारा स्तब्ध असतांना

जेंव्हा तिरडीवर निघाला बाप;

कारण नसतांना

बदामाचा शेंडा मोडला आपोआप .

... तसं निमित्त असू शकतं काहीही;

पण काय आपलं मन मानत नाही.

एवढंच...!!!

किरण शिवहर डोंगरदिवे

मेहकर, महाराष्ट्र

आज सीमोल्लंघन करुयाच!

बंदिस्त केलंय स्वतःला चौकोनात,

आपलं जग एवढंच,

असं मानून!

इतके गुरफटलो यातच की,

कधी घुसमट झाली तरीही,

बाहेरची ताजी हवा घ्यावी,

हा विचारदेखील शिवला नाही!

हीतर आपसूकच दिसल्या असत्या,

उघडल्या की खेळती हवा नि

भरपूर प्रकाश देणाऱ्या खिडक्या;

दिसले असते दार,

नव्या जगात प्रवेश देणारे आणि

हवे तेव्हा आतही घेणारे!

किती दिवस कूपमंडूक बनून राहायच?

आपणच विस्तारायला हवीत आपली क्षितिजं!

पूर्वग्रहाच्या, गैरसमजूतीच्या विटांनी,

आपणच बांधलीय वैचारिक भिंत;

भीतीच्या, न्यूनगंडाच्या काट्यांनी

आपणच आखलीय सीमारेखा!

उघडू खिडक्या, येऊ देत आशेचे किरण;

सारुया काटे बाजूला, चालूया नवा पथ!

आली जर संकटे, येऊ देत;

दडले शस्त्र काढू बाहेर,

बांधू मनी आत्मविश्वासाची पूजा!

चांगल्या गोष्टींचे लुटत सोने,

आज सीमोल्लंघन करूयाच!

रसिका दास्ताने - सांगवीकर

पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र

देश बदलतोय...

देश बदलतोय...

होय,

खरंच देश बदलतोय!

आकाशात विकासाची पताका फडकतेय,

पण जमिनीवर

माणसाच्या पायाखालची माती

हळूहळू निसटतेय.

महासत्तेच्या स्वप्नांचे

सोन्याचे महाल उभे राहतात,

आणि त्याच वेळी

भाकरीच्या शोधात

असंख्य डोळे

दररोज भुकेशी लढतात.

कराचा प्रत्येक थेंब

जनतेच्या घामातून जन्मतो;

पण त्याचे प्रतिबिंब

जनतेच्या जीवनात

का दिसत नाही?

माझा शेतकरी...

काळ्या आईच्या कुशीत

सोन्याची स्वप्नं पेरणारा,

पावसाशी मैत्री करणारा,

दुष्काळाशी झुंजणारा,

आज स्वतःच

आशेच्या फासावर

लटकलेला दिसतो.

ही माती

भगतसिंगांच्या रक्ताने पवित्र झाली,

आंबेडकरांच्या विचारांनी उजळली,

गांधींच्या सत्याने

आणि असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या

त्यागाने फुलली.

मग आज

याच मातीत

प्रश्न विचारणारे ओठ

का थरथरतात?

लोकशाही म्हणजे

फक्त मतपेटी नाही;

ती आहे

माणसाला निर्भयपणे

सत्य बोलण्याचा अधिकार.

सत्ता येते,

सत्ता जाते;

पण संविधान

सत्तेपेक्षा मोठे असते.

कारण ते

राज्यकर्त्यांचे नव्हे,

तर जनतेच्या विश्वासाचे

पवित्र वचन असते.

आज

तरुणाच्या हातात

मशाल नाही,

मोबाईलचा उजेड आहे;

ज्ञानाची दारे खुली आहेत,

पण विचारांची खिडकी

हळूहळू बंद होत चालली आहे.

राजकारण

सेवेपेक्षा सत्तेचे गणित बनले,

आणि माणसामाणसांतील

विश्वासाचे अंतर

रस्त्यांपेक्षा मोठे झाले.

तरीही...

माझा विश्वास अजून जिवंत आहे.

कारण

हा देश

फक्त राजवटींनी घडलेला नाही;

तो घडला आहे

शेतकऱ्याच्या घामाने,

जवानाच्या बलिदानाने,

कामगाराच्या हातांनी,

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांनी,

आणि संविधानावर

विश्वास ठेवणाऱ्या

कोट्यवधी नागरिकांनी.

म्हणून

महासत्ता होण्यापूर्वी

महामानवांचा देश राहू या.

विकास करू या—

पण न्याय विसरून नाही.

संपत्ती निर्माण करू या—

पण समता गमावून नाही.

मतभेद ठेवू या—

पण माणुसकी हरवून नाही.

कारण...

देश तेव्हाच बदलतो,

जेव्हा रस्ते रुंद होतात म्हणून नाही,

तर

माणसांची मने विशाल होतात म्हणून.

देश तेव्हाच महान होतो,

जेव्हा शेतकऱ्याच्या डोळ्यात

आत्महत्येची नव्हे,

तर उद्याची आशा असते.

देश तेव्हाच महान होतो,

जेव्हा तरुणाच्या हातात

फक्त पदवी नसते,

तर सन्मानाची संधीही असते.

आणि देश तेव्हाच अमर होतो,

जेव्हा लोकशाही

भीतीवर नाही,

तर विश्वासावर उभी असते.

म्हणून...

आजही मी म्हणतो—

देश बदलू द्या...

पण माणूस हरवू देऊ नका.

सत्ता बदलू द्या...

पण संविधान झुकू देऊ नका.

स्वप्ने मोठी पाहू या...

पण त्या स्वप्नांच्या पायाशी

शेतकऱ्याचा अश्रू,

कामगाराचा घाम

आणि सामान्य माणसाचा विश्वास

चिरडला जाऊ देऊ नका.

कारण...

महासत्ता होण्यापेक्षा

महामानवांचा देश होणे

अधिक मोठे असते

सुरेश सिताबाई किसन सरगर

घाटनांद्रे, महाराष्ट्र

व्यथा एका विशेष मुलाच्या पालकांची...

विशेष मुलाचा जन्म हा केवळ एका मुलाचा प्रवास नसतो, तर तो संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यातील एक मोठा बदल असतो. विशेषतः त्या मुलाच्या आई-वडिलांसाठी हा प्रवास अनेक भावनिक चढ-उतार, संघर्ष, आशा आणि समाजाच्या गैरसमजांनी भरलेला असतो.

लग्नानंतर आमचं आयुष्य आनंदात सुरू झालं. आम्हाला एक मुलगी झाली आणि काही वर्षांनी मुलगा झाला. मुलगा झाल्याचा आनंद संपूर्ण कुटुंबाने साजरा केला. सर्वांना वाटलं की आता कुटुंब पूर्ण झालं आहे. सुरुवातीचे काही महिने सर्व काही सामान्य वाटत होतं. मात्र, जसजसा काळ पुढे सरकत गेला, तसतसं लक्षात येऊ लागलं की मुलाचा विकास त्याच्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे होत नाही.

तो वेळेवर मान धरत नव्हता, बसायला, रांगायला आणि चालायला उशीर होत होता. तीन वर्षांचा होऊनही तो “आई”, “बाबा” असे साधे शब्दही बोलत नव्हता. प्रत्येक पालकाप्रमाणे आम्हालाही वाटत होतं की थोडा उशीर असेल, पण सर्व काही ठीक होईल. मात्र, मनातील अस्वस्थता वाढत गेली आणि आम्ही डॉक्टरांचा सल्ला घेतला.

अनेक तपासण्या, विविध तज्ज्ञांची मतं आणि अनेक भेटींनंतर आम्हाला सांगण्यात आलं की मुलाच्या विकासात विलंब (Developmental Delay) आहे. योग्य थेरपी, प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्याच्यामध्ये प्रगती होऊ शकते. त्या क्षणी आमच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. भविष्याची चिंता, मुलाच्या आयुष्याची काळजी आणि स्वतःबद्दलचा अपराधीपणा मनाला सतावत राहिला.

याहून अधिक वेदनादायक गोष्ट म्हणजे समाजाची वागणूक. “अजून बोलत नाही का?”, “याच्या वयाची मुलं तर व्यवस्थित बोलतात”, “आईमध्ये काही दोष होता का?”, “गर्भधारणेत काही चूक झाली का?” अशा असंख्य प्रश्नांनी पालकांचं मन वारंवार जखमी होतं. अनेक वेळा दोष फक्त आई किंवा वडिलांवर टाकला जातो. पण कोणीही त्यांच्या मनात सुरू असलेल्या भावनिक संघर्षाचा विचार करत नाही.

काही प्रकरणांमध्ये मुलाच्या विकासातील अडचणींमागे अनुवंशिक (Genetic) कारणं किंवा जवळच्या रक्ताच्या नात्यातील विवाह (Consanguineous Marriage) यांसारखे घटक असू शकतात. परंतु प्रत्येक विशेष मुलामागे हीच कारणं असतात, असा गैरसमज समाजात मोठ्या प्रमाणावर आढळतो. प्रत्येक मुलाची परिस्थिती वेगळी असते आणि योग्य वैद्यकीय तपासणीशिवाय कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणं चुकीचं आहे.

एक मानसशास्त्रज्ञ म्हणून मला अनेक विशेष मुलांचे पालक भेटतात. त्यांच्या डोळ्यांत मला एकच प्रश्न दिसतो — “आमची चूक काय होती?” अनेक पालक नैराश्य, चिंता, अपराधीपणा, सामाजिक दडपण आणि भविष्याच्या भीतीत जगत असतात. ते आपल्या मुलासाठी दिवस-रात्र झटत असतात, पण त्यांना भावनिक आधार देणारे हात फार कमी असतात.

विशेष मुलाला थेरपी, शिक्षण आणि प्रेम जितकं आवश्यक आहे, तितकाच त्याच्या पालकांनाही मानसिक आधार, समुपदेशन, समाजाची सकारात्मक साथ आणि स्वीकार आवश्यक आहे. दोषारोप करून कोणाचंही आयुष्य बदलत नाही; परंतु समजून घेतलेला एक शब्द, दिलासा देणारा एक हात आणि संवेदनशील वागणूक एका कुटुंबाला नव्याने जगण्याची ताकद देऊ शकते.

विशेष मुलाचा जन्म हा कोणाचाही गुन्हा नाही. तो आई-वडिलांच्या अपयशाचा पुरावा नाही. प्रत्येक विशेष मुलामागे आपल्या मुलासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, अनेक अश्रू लपवून हसणारे आणि प्रत्येक छोट्या प्रगतीत आनंद शोधणारे आई-वडील असतात.

चला, दोष देण्याऐवजी साथ देऊया. प्रश्न विचारण्याऐवजी समजून घेऊया. कारण सहानुभूती, स्वीकार आणि आधार हीच विशेष मुलांच्या पालकांसाठी सर्वात मोठी ताकद आहे.

गीता वारे

(मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक)

पुणे, महाराष्ट्र

स्वातंत्र्य भास्करा

हे स्वातंत्र्य भास्करा, तुला साष्टांग दंडवत
किती वदने करु स्तुति, शब्द गोठती मनात

दिले स्वातंत्र्य मिळवून
कदर ना तुझी आम्हा
किती कष्ट वेचले तू
ना जाणीव तुझी आम्हा ||१||

संसारी ठेविले तुळशीपत्र
देशाप्रती निष्ठा वाहिली
मिळवली अनेकांनी सन्मान पत्रे
तुझी मात्र चेष्टा झाली ||२||

जन्मठेप भोगली अंदमानी
सहज पचविले काळे पाणी
करुन मन, शरीर सशक्त
ब्रिटीशांची नीति केली अशक्त ||३||

दुर्मिळ दाखला जगामधे
दोघे बंधू कारागृहामध्ये
भेट नाही कुटुंबासवे
पतिव्रता न ढाळी आसवे ||४||

खुले केले मंदीर पतित पावन
हिंदुत्वाची,विज्ञानाची कास धरुन
केली बंदीगृहात कवनं
मुक्त झाले दंडबेड्या उखडून ||५||

केली होळी परदेशी कापडाची
देऊन आठवण मार्सेलिसची
गौरव केला मराठीचा अव्हेरुन आंग्ल भाषा
यांचा गौरव भारतरत्न
हीच मनीषा ||६||

श्रीप्रकाश सप्रे
ठाणे, महाराष्ट्र

दीपावली विशेषांक · DIWALI ANK

BMM कल्पवृक्ष

One tree, many fruits — every initiative grows from one community



एक मूळ,
अनेक फळे

Rooted in Maharashtra,
growing across North America

The fruits of our tree · उपक्रमांची फळे

Most sessions are online and free · bmmonline.org/initiatives

LEARNING & HERITAGE

1 **Marathi Shala** – Marathi classes for kids
2 **Bhasha** – learn new languages, weekly
3 **Gurupeeth** – Marathi professors' network
4 **Varasa** – stories of our pioneer families
5 **Book Publication** – our authors' books

COMMUNITY & SERVICE

6 **Reshimgathee** – matrimonial service
7 **B-Connect** – Marathi business network
8 **Adhar** – helpline in emergencies
9 **BVG** – member discounts in India
10 **Samajrang** – raising funds for NGOs
11 **Maitree Melave** – regional meet-ups
12 **BMM Awards** – honouring achievers

WELLNESS & WISDOM

13 **Arogya Sampada** – free health talks
14 **Dhyan** – free meditation, Sundays
15 **Arthmanthan** – free money talks
16 **Uttarrang** – senior citizens' forum
17 **Tatvadnyan** – philosophy sessions
18 **Samvad** – BMM's conversation podcast
19 **Kirtan** – learn devotional kirtan
20 **Paurohitya** – learn pujas and rituals
21 **Jyotish** – astrology classes

ARTS & ENTERTAINMENT

22 **Sangeet** – classical and light music
23 **Karaoke** – sing along, twice a month
24 **Chitrakala** – club for Marathi artists
25 **Film Club** – make films together
26 **NA Programming** – book local artists
27 **India Programming** – shows from India
28 **Antarang** – all mandal magazines online

YOUTH

29 **Yuva** – BMM's youth wing
30 **Krida** – cricket, carrom and ping-pong
31 **Summer Programs** – camps, mentoring
32 **Lakshyavedhi** – inspiring career paths
33 **Youth Scholarship** – support for students

शुभ दीपावली!

Pick a fruit and join in. Scan to follow BMM for events, classes and Vrutta updates.

Website | Facebook | Instagram | WhatsApp